Epaper : epaper.sinhvani.com
दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार
Reg. No : MHBIL/25/A4140
दिनांक : शनिवार, १५ ऑगस्ट २०२६
पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २४७ | किंमत : २ रूपये | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

15 स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

# मराठा वादळ पुन्हा सक्रिय

## सरकारला २८ ऑगस्टचा अल्टिमेटम

**वृत्तसंस्था, जालना**

मराठा आरक्षणाच्या नोंदी आणि प्रमाणपत्रांच्या मुद्यावरून राज्य सरकारला आणि बावनकुळेंना मनोज जरांगे यांनी इशारा दिला असून तुम्ही केलेली चूक २८ ऑगस्टच्या आत पत्र देऊन दुरुस्त करा. जी प्रमाणपत्रे रद्द केली आहेत, ती पुन्हा वैध करा आणि समाजाला द्या, आमचे काहीही म्हणणे असणार नाही. मात्र, जर ही चूक सुधारली नाही, तर पुन्हा मी तुम्हाला सोडणार नाही असा सक्त इशाराही मनोज जरांगे यांनी दिला आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकतीच माध्यमांशी बोलताना आपली कौटुंबिक पार्श्वभूमी सांगत अत्यंत भावुक प्रतिक्रिया दिली होती. बावनकुळेंच्या या भावुक व्हीडीओवर आता मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी आपली सविस्तर प्रतिक्रिया दिली



असून पत्रकारांशी संवाद साधताना मनोज जरांगे म्हणाले, मला पत्रकारांनी सांगितले की चंद्रशेखर बावनकुळे माध्यमांसमोर बोलताना भावुक झाले आणि त्यांच्या डोळ्यांत पाणी आले. रात्री मी त्यांचा तो व्हिडीओ पाहिला. त्यांनी त्यात त्यांच्या आईचा उल्लेख केला. तसेच, आपण मराठ्यांच्या विरोधात नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मी माझ्या मराठा समाजावर खूप प्रेम करतो. मराठा समाजाच्या विरोधात जर कुणी मराठा आला तरी मी त्याला सोडत नाही, मग दुसरा कुणी आला तर त्याला सोडण्याचा प्रश्नच येत नाही. पण तुम्ही व्हीडीओत आईचे नाव घेतले आणि तुम्ही व्यथित झालात, हे पाहून मलाही वाईट वाटले. आम्ही मराठे आहोत, आम्ही एकदा-दोनदा माफ करून सोडून देतो. त्यामुळे मी तुम्हाला यावेळी माफ करतो आणि इथून पुढे तुमच्यावर कोणतेही व्यंग करणार नाही.

**परळीच्या टोळीच्या नादी लागल्याने रडण्याची वेळ**

बावनकुळेंना माफ करत असतानाच जरांगे पाटलांनी त्यांच्यावर राजकीय निशाणाही साधला. ते म्हणाले, तुम्ही इतके रडकुंडीला आलात, कारण तुम्ही मराठ्यांच्या नादी लागलात. मला तुमच्याबद्दल इतके बोलण्याची गरज नव्हती, पण तुम्ही मोठी चूक केलीत. परळीच्या टोळीच्या नादी लागून आणि त्यांचे ऐकून तुम्ही मराठ्यांच्या लेकरांचे वाटोळे केले, म्हणूनच तुमच्यावर आज ही रडकुंडीची वेळ आली आहे. त्यामुळे इथून पुढे तरी तुम्ही त्यांचे ऐकणे बंद करा.

## राहुल गांधी २२ ऑगस्टला महाराष्ट्र दौऱ्यावर

**वृत्तसंस्था, मुंबई / पुणे**

काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी २२ ऑगस्ट रोजी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात ते पुणे येथे विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. राहुल गांधी यांच्या पुणे दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसकडून तयारी सुरू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांशी संवादाच्या कार्यक्रमात देशातील शिक्षण व्यवस्था, रोजगार, स्पर्धा परीक्षा, युवकांचे प्रश्न तसेच देशाच्या भविष्यासंदर्भातील विविध मुद्द्यांवर चर्चा होण्याची शक्यता आहे.



विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची संधीही या कार्यक्रमात मिळण्याची शक्यता आहे. देशातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर राहुल गांधी यांनी यापूर्वीही देशातील विविध शहरांमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधला आहे. नीट पेपरफुटी प्रकरणी त्यांनी राजस्थानमधील कोटा शहरात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला होता.

## राहुल गांधीविरोधातील सावरकरांशी संबंधीत प्रकरण रद्द

**नवी दिल्ली :** विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या विरोधात स्वातंर्त्यवीर सावरकर यांच्याशी संबंधित मानहानी प्रकरणी कनिष्ठ न्यायालयात दाखल असलेले प्रकरण रद्द करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी यासंदर्भातील निकाल दिला. हे प्रकरण उत्तर प्रदेशातील आहे. सर्वोच्च न्यायालयानेराहुल गांधी यांच्या विरोधात देण्यात आलेली तक्रार आणि न्यायाधीशांनी हजर राहण्याचे दिलेले आदेश रद्द केले आहेत. जेव्हा प्रकरणात कलम नोंदवणे गरजेचे असते आणि त्याची नोंद नसते, तेव्हा ते प्रकरण आपोआपच रद्द होते, असे न्यायालय म्हणाले. न्यायालय म्हणाले की, उत्तर प्रदेश सरकारकडून दाखल करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रात कलमांचा कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे गुन्हा आणि न्यायाधीशांनी काढलेला आदेश रद्द करत आहोत.







## मराठी सक्तीची, १८ पासून कारवाई

**पुणे :** राज्यातील ऑटो-रिक्षा आणि इलेक्ट्रॉनिक मीटर असलेल्या टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे ज्ञान असणे बंधनकारक करण्यात आले आहे. यासाठी १५ ऑगस्ट ही अंतिम मुदत देण्यात आली होती. ही मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवली जाणार नसल्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मधील प्रस्तावित सुधारणांनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. प्रवाशांशी योग्य संवाद साधता यावा, त्यांचे म्हणणे समजून घेता यावे आणि त्यांचा प्रवास सुरक्षित व सोयीस्कर व्हावा, यासाठी चालकांना स्थानिक(मराठी) भाषेचे व्यावहारिक ज्ञान असणे आवश्यक आहे. चालकांना १७ तारखेपर्यंत वेळ देण्यात आला असून १८ तारखेपासून कारवाईला सुरुवात केली जाईल असा इशारा त्यांनी दिला आहे.

**एचएसआरपी नंबर प्लेटसाठी मुदतवाढ**

वाहनांना हाय-सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) बसवण्याच्या निर्णयाबाबतही सरनाईक यांनी महत्त्वाची माहिती दिली. वाहनांवर एचएसआरपी नंबर प्लेट लावण्यासाठी ३१ डिसेंबर २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. त्यानंतर नवीन वर्षात १ जानेवारीपासून नियम मोडणाऱ्या वाहनधारकांवर थेट कारवाई सुरू केली जाईल असे त्यांनी स्पष्ट केले.

**बसस्थानकांवरील अस्वच्छतेवर संताप**

पुण्यातील बसस्थानकांवरील अस्वच्छता आणि ठेकेदारांच्या मनमानी कारभारावरून मंत्री प्रताप सरनाईक यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. ठेकेदारांनी एसटी कर्मचाऱ्यांना आणि प्रवाशांना मूलभूत सुविधा न दिल्यास कडक कारवाई करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.








Epaper : epaper.sinhvani.com
दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार
Reg. No : MHBIL/25/A4140
दिनांक : शनिवार, १५ ऑगस्ट २०२६
पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २४७ | किंमत : २ रूपये | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे
15 स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

# उत्तराखंड-चमोली बोगदा दुर्घटनेत ७ ठार

**वृत्तसंस्था, चमोली**

उत्तराखंडमधील चमोली जिल्ह्यातील पीपलकोटी येथे बांधकाम सुरू असलेल्या बोगद्यात झालेल्या अपघातानंतर १५ तासांपासून बचाव पथके सतत शोधकार्यात गुंतलेली आहेत. या अपघातात ७ लोकांचा मृत्यू झाला आहे, तर तीन लोक अजूनही बोगद्यात अडकले आहेत. बचाव दलाने १४ लोकांना सुरक्षित बाहेर काढले आहे.



या वाचवलेल्या लोकांपैकी १३ जखमींवर गोपेश्वर येथील जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर, एका गंभीर जखमी व्यक्तीला श्रीनगर येथील उच्च केंद्रात पाठवण्यात आले आहे. बोगद्यात पाणी आणि ढिगारा आल्यामुळे बचावकार्य आव्हानात्मक बनले आहे. अडकलेल्या लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी बचाव पथके सतत प्रयत्न करत आहेत.

प्रशासनासोबतच एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि लष्कराची पथके घटनास्थळी तैनात आहेत. बोगद्यात अडकलेल्या लोकांच्या बचावासाठी लष्कराचे पथकही तैनात करण्यात आले आहे. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी घटनास्थळी पोहोचले आहेत आणि ते स्वतः बोगद्यात जाऊन मदत आणि बचाव कायार्ची पाहणी करत आहेत. यानंतर मुख्यमंत्री गोपेश्वर येथील जिल्हा रुग्णालयात जातील, जिथे ते जखमींची भेट घेऊन त्यांची विचारपूस करतील.

# तुकाराम मुंढेंचा दणका

## ब्लिंकीट, झेप्टो, इन्स्टामार्टवर धाडसत्र, परवाने निलंबित

**वृत्तसंस्था, मुंबई**

महाराष्ट्रात ऑनलाइन फूड डिलिव्हरी करणाऱ्या ॲप्सचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र, या कंपन्यांच्या 'डार्क स्टोअर्स'मधून ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत आता गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली एफडीएने ब्लिंकीट, झेप्टो, इन्स्टामार्ट या प्रमुख कंपन्यांच्या डार्क स्टोअर्सवर राज्यभरात विशेष तपासणी मोहीम राबवून कठोर कारवाई केली आहे.





राज्यभरात ८६ ठिकाणी मारलेल्या धाडींनंतर अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अनेक आस्थापनांना ६० सुधारणा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत, तर १२ डार्क स्टोअर्सचे ऋरअक परवाने थेट निलंबित करण्यात आले आहेत.एफडीएच्या विशेष मोहिमेत ब्लिंकिट, झेप्टो आणि इन्स्टामार्टच्या एकूण १२ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेतः

ब्लिंकिट : ५ डार्क स्टोअर्सचे परवाने निलंबित.

झेप्टो : ५ डार्क स्टोअर्सचे परवाने निलंबित.

इन्स्टामार्ट : २ डार्क स्टोअर्सचे परवाने निलंबित.

यापैकी एकट्या मुंबई शहर व उपनगरात २४ ठिकाणी तपासणी करण्यात आली असून, त्यातील १० आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत तर १४ ठिकाणी सुधारणा नोटिसा देण्यात आल्या आहेत.

# उच्च न्यायालयाच्या आदेशाला हरताळ

## ताशेऱ्यांनंतरही पारशिवनीचे पोलीस अधिकारी शेरकी यांच्यावर कारवाई शून्य!

### न्यायालयीन आदेशाचा अवमान करून वाहन रोखल्याचा ठपका, उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतरही नागपूर ग्रामीण पोलिसांचे अभय?

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा-श्रीकांत जालंधर**

न्यायालयाच्या स्पष्ट आदेशाचे उल्लंघन करून जप्त केलेले वाहन बेकायदेशीरपणे ताब्यात ठेवल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने कडक शब्दांत ताशेरे ओढले आहेत असे असताना पारशिवनीचे पोलीस निरीक्षक किशोर शेरकी यांच्यावर नागपूर ग्रामीण पोलीस दलाकडून अद्याप कोणतीही विभागीय कारवाई करण्यात आलेली नाही.



उच्च न्यायालयाच्या स्पष्ट निर्देशांना पोलीस प्रशासनाने गुंडाळून ठेवल्याने आश्चर्य व्यक्त केले जात असून पोलीस दलातील या अभयामुळे खाकी वर्दीच्या कार्यपद्धतीवर आणि पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पारशिवनी पोलीस ठाणे हद्दीत अवैध वाळू वाहतूक प्रकरणी (गुन्हा क्र. १७२/२०२६) जप्त करण्यात आलेला अशोक लेलँड टिपर (MH-37-T-1976) सोडण्याचे स्पष्ट आदेश प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, पारशिवनी यांनी ९ जून २०२६ रोजी दिले होते.

न्यायालयीन आदेशानुसार याचिकाकर्ते कार्तिक येसने यांनी सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली पोलिसांनी कागदोपत्री वाहनाची किल्ली व ताबा हस्तांतरित केल्याचे भासवून (सुप्रतनामा) स्टेशन डायरीत नोंदही घेतली. मात्र, प्रत्यक्षात पोलीस अधिकारी किशोर शेरकी यांनी वाहनाची किल्ली हिसकावून घेत प्रत्यक्ष ताबा देण्यास नकार दिला आणि न्यायालयाच्या आदेशाचा उघड अवमान केला.

# नांदेडात ४ पिस्तुल, १३ जिवंत काडतुस जप्त

**वृत्तसंस्था, नांदेड**

प्रतिनिधी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नाळेश्वर - सुगाव जाणाऱ्या रस्त्यावर सापळा रचून ४ गावठी पिस्तुले व १३ जिवंत काडतुसे असा एकूण १ लाख ९१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी लिंबगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १३ ऑगस्ट २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय बातमीदारामार्फत तीन इसम दुचाकीवर अवैध अग्निशस्त्रे घेऊन येत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार वाघी शिवारातील नाळेश्वर - सुगाव रस्त्यावरील बालाजी हिलालपुरे यांच्या आखाड्यासमोर पोलिसांनी सापळा रचला. काही वेळाने दुचाकी (क्र. एमएच-२६-डीए-४१६९) तेथे आली असता पोलिसांनी ती थांबवून तपासणी केली.

पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या संशयितांची चौकशी केली असता त्यांची नावे आनंद ऊर्फ चिन्हू सरदार यादव, शेख जावेद ऊर्फ लड्या रेहमत शेख व शेख सोहेल ऊर्फ छोटा गुज्जर अशी समोर आली. त्यापैकी शेख सोहेल ऊर्फ छोटा गुजर हा घटनास्थळावरून फरार झाला असून त्याचा शोध सुरू आहे. घेण्यात आलेल्या अंगझडतीत आरोपींच्या ताब्यातून ४ गावठी पिस्तुले ( किंमत १ लाख २० हजार रुपये), १३ जिवंत काडतुसे ( २६ हजार रुपये) तसेच दुचाकी असा एकूण १ लाख ९१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.







15 ऑगस्ट
स्वातंत्र्य दिन

वंदे भारत

Epaper : epaper.sinhvani.com

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com

सर्व देशवासियांना
हार्दिक शुभेच्छा!

दैनिक सिंहवाणी वृत्त

# बाप्पूची स्वच्छता दशसूत्री : आजची गरज !



शशिकांत म.तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
मो : ९१३०८३५४५८

आज स्वातंत्र्य दिन साजरा करीत असतांना, पूज्यनिय बाप्पूना अभिवादन करताच बाप्पूंनी दर्शविलेला स्वच्छतेच्या मार्गाचे स्मरण होत होते. जेव्हाजेव्हा बाप्पूंचा जन्मदिन (गांधी जयंती) जवळ येते, तेव्हा गांधीजींनी स्वीकारलेला सत्य, अहिंसा, सेवा, स्वदेशीचा मंत्र,मौलिक विचारांचे स्मरण होत असते.हे गांधीजींच्या विचारांचे मोठेपण आणि आपल्या वैचारिक मागासलेपणाचे लक्षण मोठ्या मनाने मानले पाहिजे. तन- मन- धनाच्या स्वच्छतेबाबत महात्मा गांधींची जी आग्रही भूमिका होती; तशी आजपावतो कुठल्याही राजकीय पुढाऱ्यांची झाली नसेल असे वाटते. जिथे जिथे स्वच्छतेचा अभाव तिथे मोठ्या प्रमाणात रोगराईचा प्रादुर्भाव असायचा. अनेक साथींचे आजार दीर्घ काळापर्यंत कायम राहायचे. त्यात अनेकांचे प्राण जायचे. मनाला अस्वस्थ व विचलित करणारी दृश्यं बघून महात्मा गांधींनी स्वच्छतेसंबंधी दशसुत्रींचा स्वतःअवलंब केला.

**त्या दशसूत्री क्रमाने पाहूया**

"जर एखादी व्यक्ती स्वच्छ नसेल, तर ती निरोगी राहू शकत नाही" महात्मा गांधीच्या या विचारांवर कोण बरे असहमत होऊ शकेल. हा विचार ज्याच्या त्याच्या व्यक्तिगत पातळीवर असला तरी,त्याचे दुष्परिणाम स्वतःसह कुटुंबावर आणि समाजावर होत असतात.

"आपल्या ड्रॉइंग रूमप्रमाणे स्वच्छतागृहे स्वच्छ ठेवावे"हे विधान अतिशय महत्त्वाचे आहे. हे विधान ज्यावेळेसचे आहे, तेव्हा स्वच्छतागृहाची संख्या ही देशात मोजकीच होती.जी आज मोठ्या संख्येने आहे,परंतु हल्लीच्या काळात स्वच्छतागृह ही स्वच्छ असावी,अशी जाहिरात व्यावसायिक हेतूने सिने अभिनेता करताना दिसतात.

"नद्या स्वच्छ ठेवून आपण आपली सभ्यता जिवंत ठेवू शकतो."

परंतु आज दुर्दैवाने प्रदूषित नद्यांच्या यादीत जागतिक पातळीवर आपला देश प्रथम दहा क्रमांकात आहे.ज्या देशात नदीला माता मानले जाते, पूजन करतो त्याआज गटारगंगा झाल्याचे दिसतात.

"आंतरिक स्वच्छता ही पहिली गोष्ट आहे जी शिकविली पाहिजे."

आज समाजात शारीरिक स्वच्छतेबाबत बहुतांशी सुधारणा झालेली दिसते आणि तीही 'उपर से टामटूम,अंदर से राम जाने' या म्हणीप्रमाणे.पाच कर्मेंद्रिय एक वेळ स्वच्छ करू शकू! परंतु एक सूक्ष्म इंद्रिय आहे, ते म्हणजे मन. त्याची स्वच्छता होणे ही अत्यंत गरजेचे आहे.मन स्वच्छ झाले तर काया, वाचा,मने हिंसा होऊ होणार नाही,असे बापूजींना वाटायचे.

"मी कोणालाही माझ्या मनात घाणेरड्या पायांनी जाऊ देणार नाही"

मानवाच्या मनातील विकारांचे क्षालन होत नाही.तोपर्यंत कुठलीही कृती पवित्र होणारच नाही.



"मन करा रे प्रसन्न '
सर्व सिद्धीचे कारण ''
किंवा
"मनचंगा तो कटोरी मे गंगा"

हे संत वचनही कदापि विसरता कामा नये.शरीराच्या स्वच्छते सोबतच मनाची आंतरिक स्वच्छता ही तेवढीच महत्त्वाची नाही का?

"एखाद्याची चूक मान्य करणे, म्हणजे झाडू लावण्यासारखे आहे, त्यामुळे पृष्ठभाग चमकदार आणि स्वच्छ होतो."

परंतु बाप्पू आज तुमच्या विचारांना मूठमाती दिल्यासारखे वाटते. 'चुकीला माफी नाही' अशा विचारांचे स्टेटस ठेवणारे आजही कमी नाहीत. इथे खरं चुकतंय कोणाचं? याचे परिक्षण तर सोडाच, अवलोकन सुद्धा होत नाही. या उलट चूक दाखविणाऱ्याला दोषी ठरविले जातं आणि ते सुद्धा मुठभर चुकीच्या लोकांमुळे. त्यामुळे औदार्याची आता हिंसा होते.

" प्रत्येकाने स्वतःचा कचरा स्वच्छ करावा."

किती सोप्प वाक्य आहे बाप्पू. परंतु आम्ही अवघड करून टाकलंय. केळी खाल्ली की त्याची सालपट आहे तिथेच टाकून देणार. मावा, तंबाखू खाऊन तिथेच थुंकून घाण करणार. स्वतःच केलेल्या कचऱ्याची विल्हेवाट न लावता उघड्यावर फेकून देणाऱ्यांना बापूंचा सल्ला अत्यंत मोलाचा आहे."आपल्या आचरणात स्वच्छता अशा प्रकारे स्वीकारा किती आपली सवय बनेल!"

बाप्पूनी दर्शविलेली स्वच्छतेच्या दशसूत्रीचे पालन किंबहुना सवयींच्या रूपांतरित व्हायला अजून तरी फार मोठा अवकाश दिसतो,हेच फार मोठे दुर्भाग्य आहे.

"राजकीय स्वातंत्र्यांपेक्षा स्वच्छता महत्त्वाची."

बाप्पूचे शेवटचे स्वच्छतेबाबत सूत्र फार मनाला विचलित आणि अस्वस्थ करते.आज स्वच्छता दुय्यम स्थानी आली बाप्पू.राजकीय स्वातंत्र्याचा जिकडे तिकडे बोलबला आहे. पुढारी मोठे आणि वैचारिक, नीती, मूल्यें छोटी झाली आज. तुमच्या विचारांचे आचरण नव्हे, तर भांडवल होत आहे बाप्पू. तुमच्या वैचारिक स्वप्नांची पूर्तता करण्यास अद्याप तरी अवकाशात दिसतो. तुमची वैचारीक मूल्यें, आदर्श, शाश्वत आहेत. त्या मार्गाने चालणाऱ्यांचा प्रवास मात्र आज कासवगतीने आहे बरं का.. तुर्तास क्षमा करा!

# प्रिय भारत माता...



डॉ. राजेंद्र टेकाडे
काटोल, जि. नागपूर
मो. ९१४५७७९०५०

प्रिय भारत माता.
सप्रेम नमस्कार...

यंदा १५ ऑगस्ट २०२६ रोजी तू स्वातंत्र्य होऊन तब्बल ७९ वर्षे पूर्ण करत आहेस. देश तुझा ८०वा स्वातंत्र्यदिन साजरा करतो आहे. १९४७ साली मिळालेल्या या स्वातंत्र्याला आज इतकी वर्षं उलटून गेली, तरी तुझ्याविषयीचा अभिमान आणि तुझ्यासाठीची तळमळ जराही कमी झालेली नाही. या पवित्र दिनाच्या निमित्तानेच आज मन भरून आलं आणि वाटलं, तुला थेट पत्र लिहावं. तू माझी माती, तू माझा श्वास. तुज्याच अन्नावर वाढलो, तुज्याच नद्यांचं पाणी प्यालो आणि तुज्याच आकाशाखाली स्वप्नं पाहिली. आज मन तुज्याशी मोकळेपणाने बोलू इच्छितं आहे. माते, तू किती सोसलंस हे सर्व भारतीयांना माहिती आहे. शेकडो वर्षं परकीयांच्या पायाखाली तुझी माती तुडवली गेली, तुझी संपत्ती लुटली गेली, तुझ्या लेकरांना गुलाम बनवलं गेलं. पण तरीही तू हरली नाहीस. तुज्या याच मातीतून महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भगतसिंग, सुभाषचंद्र बोस असे वीर जन्माला आले आणि तुला पुन्हा स्वतंत्र केलं. आज स्वातंत्र्याच्या या ७९ वर्षांनंतरही तू अभिमानाने उभी आहेस, याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो.

माते, आज तुझी प्रगती पाहून माझं मन आनंदाने भरून येतं. तुझ्या याच मातीत आज डिजिटल क्रांती घडते आहे. गावखेड्यातला साधा शेतकरीही आज मोबाईलवर यू.पी.आय. द्वारे पैसे पाठवतो, आधार कार्डामुळे प्रत्येकाला ओळख मिळाली आहे. तुझी तरुण लेकरं, जगातील सर्वात मोठी तरुण शक्ती घेऊन, आज जगाला दिशा दाखवत आहेत. तुझी अर्थव्यवस्था आज जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक बनली आहे आणि हे पाहून ऊर भरून येतो. तुझ्या मातीतले तरुण आज आयटी क्षेत्रात, स्टार्टअप विश्वात जगावर आपली छाप सोडत आहेत. जगातील तिसऱ्या क्रमांकाची स्टार्टअप परिसंस्था तुझ्याच भूमीत उभी राहिली आहे. तुझं आकाशातलं यश तर अप्रतिम आहे. चांद्रयान चंद्रावर उतरलं, मंगळयानाने मंगळाला गवसणी घातली. इस्रोच्या शास्त्रज्ञांनी अवघ्या जगाला तुझी ताकद दाखवून दिली. तू जगातील सर्वात मोठी लोकशाही आहेस इथे सत्तांतर होतं ते बंदुकीच्या बळावर नाही तर मतपेटीतून शांततेच्या मार्गाने.

तुझ्या कुशीत असंख्य भाषा, धर्म, जाती, परंपरा नांदतात, तरीही "अनेकतेत एकता" हे तुझं ब्रीदवाक्य आजही खरं ठरतं. कृषी क्षेत्रातही तू स्वयंपूर्ण झाली आहेस, अन्नधान्याच्या बाबतीत आज तू परावलंबी नाहीस. रस्ते, मेट्रो, विमानतळ यांचं जाळं वेगाने विणलं जातंय आणि जागतिक व्यासपीठावर, जी-२० सारख्या मंचांवर तुझा आवाज आज ठामपणे ऐकला जातो. हे सगळं पाहून मन अभिमानाने फुलून येतं.

मात्र, याच अभिमानाच्या क्षणी मन काहीसं व्याकुळही होतं. तुज्या याच कुशीत आजही असंख्य लेकरं भुकेल्या पोटी झोपतात. गरिबी आणि आर्थिक विषमतेची दरी अजूनही रुंदावलेली दिसते. याच देशात इंडिया विरुद्ध भारत हे चित्र अनुभवायास मिळते. लाखो सुशिक्षित तरुण हातात पदवी घेऊन नोकरीच्या शोधात वणवण फिरतात आणि बेरोजगारीचं ओझं त्यांच्या मनावर दडपण आणतं. तुझ्या ग्रामीण भागातल्या शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहे. साध्या आरोग्य सुविधांसाठी लोकांना मैलोनमैल प्रवास करावा लागतो आणि वेळेवर उपचार न मिळाल्याने कित्येक जीव जातात. तुझी हवा, तुझं पाणी, तुझी माती या सगळ्यावर प्रदूषणाचा विळखा घट्ट होतो आहे, हे पाहून मन विषण्ण होतं. लोकसंख्येचा वाढता भार तुझ्या संसाधनांवर ताण आणतो आहे. भ्रष्टाचारासारखा रोग अजूनही तुझ्या प्रशासनाला पोखरतो आहे. तुझ्या लेकींवर होणारे अत्याचार, त्यांना न मिळणाऱ्या समान संधी हे पाहून मन खूप दुखते. तुझ्याच मुली तुज्याच भूमीत सुरक्षित का नाहीत? जातीय आणि सामाजिक भेदभावाच्या भिंती अजूनही काही ठिकाणी उभ्या आहेत. खेड्यापाड्यात आजही रस्ते, वीज, पाणी यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी लोकांना झगडावं लागतं.

माते, भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्त होण्याचं, आपले विचार मुक्तपणे मांडण्याचं स्वातंत्र्य बहाल केलं आहे. पण हे स्वातंत्र्य आज कुठेतरी डागाळलं जातंय असं वाटतं. वैद्यकीय क्षेत्रातील नीट परीक्षा असो की शिक्षण क्षेत्रातील शिक्षक पात्रता परीक्षा असो, स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटीसारखे प्रकार वारंवार घडताना दिसतात आणि यामुळे प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या लाखो तरुणांच्या स्वप्नांचा चुराडा होतो. या अन्यायाविरोधात आवाज उठवण्यासाठी युवक संघटित होतात. कधी आंदोलनं करतात, कधी नव्या पर्यायी संघटना उभ्या करतात, कारण त्यांना न्याय हवा असतो. माते, तुज्या या तरुण पिढीवर शासनाने अधिक गांभीर्याने लक्ष द्यायला हवं. परीक्षा पद्धतीत पारदर्शकता आणली, तरच तुज्या लेकरांचा तुझ्यावरचा आणि व्यवस्थेवरचा विश्वास अधिक दृढ होईल. माणसाला जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा, शुद्ध पाणी, आरोग्य सुविधा व शिक्षण आजही तुझ्या प्रत्येक लेकराला पुरेशा प्रमाणात मिळतात असं नाही. शहरी भागातही अनेक कुटुंबं झोपडपट्ट्यांमध्ये जगतात आणि ग्रामीण भागात साध्या सुविधांसाठीही झगडावं लागतं. प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगता यावं, यासाठी या मूलभूत गरजांची पूर्तता शंभर टक्के लोकांपर्यंत पोहोचायला हवी. जोवर एकही लेकरू उपाशी झोपतं, एकाही कुटुंबाला डोक्यावर छप्पर नसतं, तोवर तुझी प्रगती अपूर्णच राहील असं वाटतं. माते, ही तळमळ मनात घेऊनच मी हे शब्द तुझ्यापुढे मांडतो आहे.



माते, हे लिहिताना मन जड होतं, पण हे लिहिणं गरजेचं वाटतं. कारण तुझ्यावर प्रेम करणं म्हणजे फक्त तुझं कौतुक करणं नाही तर तुझ्या वेदनाही समजून घेणं आहे. तुझी प्रगती पाहून जसा अभिमान वाटतो, तसाच तुझ्या उणिवा पाहून बदल घडवण्याची जिद्दही मनात निर्माण होते. मला विश्वास आहे की, जसं तू परकीय सत्तेतून मुक्त झालीस, तशीच तू या समस्यांतूनही बाहेर पडशील. तुझी तरुण पिढी, तुझे शास्त्रज्ञ, तुझे शेतकरी, तुझे कष्टकरी, तुझे विद्यार्थी हे सगळे मिळून तुला पुन्हा एकदा "सोने की चिडिया" बनवतील. मीही, तुझा एक छोटासा लेक, माझ्या परीने तुझी सेवा करण्याचा प्रयत्न करेन. प्रामाणिकपणे काम करेन, कर्तव्य बजावेन आणि तुझं नाव उंचावण्यासाठी हातभार लावेन. तुझ्या चरणी माझा एकच संकल्प आहे. तुझ्यासाठी झिजेन, पण तुला कधीही झुकू देणार नाही. या ८०व्या स्वातंत्र्यदिनी मी हा संकल्प करतो की, तुझं नाव सदैव उंचावत ठेवीन. तू अशीच बहरत राहा, फुलत राहा आणि जगाला मार्गदर्शन करत राहा.

जय हिंद! जय भारत माता!

*तुझाच,*
*तुझा एक लेकरू*

# स्वातंत्र्याचा स्वैराचार होऊ नये याची काळजी प्रत्येकाने घ्यावी!



रवींद्र गोविंद पांडे
नागपूर

भारताच्या राजकीय इतिहासात आजचा दिवस फार महत्वाचा आहे. १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिलेला दिवस. आजपासून बरोबर ८० वर्षांपूर्वी याच दिवशी भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारताला गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी शेकडो लोकांच्या रक्ताने लाल झालेल्या भारताच्या मातीने स्वातंत्र्याचा आजचा दिवस पाहिला. अन् भारत ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला.

क्रांतिकारक मंगल पांडेला एका ब्रिटीश अधिकाऱ्याने गोळ्या घालून ठार केले त्या दिवसापासून खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य संग्रामाला सुरूवात झाली. त्यानंतर संपूर्ण देशवासीयांनी इंग्रज राजवटीच्या विरोधात आवाज उठवला. भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. त्यामुळे भारताला जे स्वातंत्र्य मिळाले ते सहजपणे मिळाले असे म्हणता येणार नाही. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी सुभाषचंद्र बोस,बाळ गंगाधर टिळक, विनायक दामोदर सावरकर, मंगल पांडे, महात्मा गांधी,लाला लजपतराय, खुदीराम बोस, मदनलाल धिंग्रा, वासुदेव बळवंत फडके अशा अनगीनत क्रांतिकारकांनी देशासाठी बलिदान दिले.

स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी सर्व भारतीयांच्या मनात देशभक्तीचा उत्साह असतो. या दिवशी देशबांधव सर्व भेदभाव विसरून एकत्र येऊन साजरा करतात.पण दुर्दैव असे की, हा उत्साह फक्त एकच दिवस दिसून येतो. अनेकदा देशातीलच काही लोकांकडून देशविघातक कृत्ये केली जातात.त्याला सामूहिकपणे, कठोरपणे सर्व राजकीय भेदभाव न करता जसा विरोध करायला हवा तो केला जात नाही.अशा देशविघातक शक्तींचे मनसुबे वेळीच ठेचून टाकले नाही तर त्यांची हिंमत वाढून देश अस्थिर कसा राहील याचेच प्रयत्न त्यांच्याकडून केले जातील.

नुकत्याच दिल्ली येथे जंतरमंतरवर जे प्रकार पहायला मिळाले त्यावरून इतर देशांत चुकीचा संदेश गेला.भारतीय संविधानाने प्रत्येकाला आपला हक्क मिळविण्याचा अधिकार दिला आहे. पण हा अधिकार मिळवत असतांनाच कोणावर कुरघोडी होणार नाही याची दक्षता घेतली गेली पाहिजे. आंदोलनाचे नेतृत्व तरूणाईच्या हातात होते. तरूण आंदोलकांमध्ये जोश होता.पण आंदोलनाच्या नेतृत्वाने आपले आंदोलन भरकटत तर नाही ना, लोकशाही मार्गाने पुढे जात आहे की नाही याची खातरजमा करून घ्यायला हवी होती. अन् नेमके जंतरमंतरवरील हे आंदोलन नेतृत्वाच्या हातून केव्हा निसटले त्यांना कळलेच नाही.शेवटी जो परिणाम व्हायचा तोच झाला. आंदोलन भरकटले, त्यात राजकारण आले,त्यात अनेक गंभीर गुन्हेगारीचे आरोप असलेल्यांचा शिरकाव झाला.त्या आंदोलनाला हिंसक वळण लागले. ज्या कारणासाठी, विषयासाठी आंदोलन केले तो विषय केंद्र सरकारने केव्हाच संपविला होता.पण फक्त राजकीय कारणांसाठी, आपल्या स्वार्थासाठी विरोधाला विरोध करून आगीत तेल ओतन्याचे काम केले गेले असे वाटायला लागले.

आजच्या तरूणांनी कुठलेही नेतृत्व करीत असतांना कोण्या एका तिसऱ्या पक्षाकडून आपला उपयोग केला जाणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. अन्यथा तरूणांच्या आयुष्याचा, भविष्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे तरूणांनी आपल्या भविष्याची काळजी घ्यावी. आपल्याला अधिकार मिळवण्याचे स्वातंत्र्य सर्वांनाच आहे पण त्याचे स्वैराचारात रूपांतर व्हायला नको याची जाणीव येथील नागरिकांना असायला हवी.

आज भारत देश ज्या वेगाने विकासाची वाटचाल करीत आहे ते पाहता जगाच्या पाठीवर असलेले अमेरिका, रशिया विशेषतः चीन हा देश तसेच इतर विकसित देश भारतात वेगवेगळ्या पध्दतीने अस्थिरता निर्माण करीत आहे.या बाह्य शक्ती आर्थिक अडचणीत आलेले शेजारच्या पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ,भूतानमध्ये आपले हातपाय पसरवत आहे.ही भारतासाठी धोक्याची घंटा आहे.

देशाच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्या या शक्तींचा वेळीच नायनाट केला पाहिजे. देशातील प्रत्येकाने राजकीय विरोध बाजूला ठेवून विरोधासाठी विरोध न करता फक्त आणि फक्त राष्ट्रहित जपण्यासाठी एकत्र येणे गरजेचे आहे. जे या देशाचे नागरिक असूनही निव्वळ स्वाथापोटी देशाचे अहित कसे होईल याकडे लक्ष देत काम करणाऱ्या व्यक्ती, संस्था, संघटनांची इत्यंभूत माहिती आपल्या जवळच्या सुरक्षा यंत्रणांना देणे आपले कर्तव्य आहे. आपण देशविघातक कृत्यापासून सतर्क राहून तर आपला देश सुरक्षित राहील हे प्रत्येकाने लक्षात ठेवावे.

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. तसेच या देशात विविध धर्माचे,पंथाचे लोक एकत्र राहून संपूर्ण जगात एक आदर्श निर्माण केला आहे. त्यामूळे या देशातील प्रत्येक व्यक्ती आपापल्या परीने, शक्तीने प्रत्येक सण साजरा करीत असते नव्हे तर एक दुसऱ्यांच्या आनंदात सहभागी सुध्दा होतांना आपण सर्व पहातो. यंदा आपण ७९ वा स्वातंत्र दिन साजरा करतो आहे.दरवर्षी भारताचा स्वातंत्र्य दिन देशात साजरा करतांना आपल्याच देशातील एक राज्य हा दिवस उल्हासीत वातावरणात साजरा करू शकत नव्हता.कारण कलम ३७० आणि पोट कलम ३५ ए या बेडीच्या बंधनात ते राज्य अडकले होते.

गेल्या ७१ वर्षांपासून प्रतिक्षेत असलेल्या,तेथील नागरिकांचे खऱ्या स्वातंत्र्य सुख हिरवणारे कलम ३७० आणि ३५ ए हे रद्द करण्याचे धाडस ज्याने आपले संपूर्ण आयुष्य या देशासाठी वाहिले असे कर्मठ देशभक्त, भारताचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी केले, आणि खऱ्या अर्थाने जम्मू काश्मीर मध्ये स्वातंत्र्य मिळाल्याचा अनुभव तेथील नागरिक घेत आहेत. त्याचबरोबर त्यांच्या संरक्षणाची, विकासाची जवाबदारी भारत सरकारने घेतली आहे. जम्मू काश्मीरकडे आपण सर्वजण याच नजरेने पाहत आलेलो आहे. आज काश्मीरचे ३७० कलम रद्द करून भारताच्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने तेथील सर्व जम्मू काश्मीर च्या बंधू भगिनींना संरक्षणाचे आपले कर्तव्य असल्याचे कृतीतून दाखवून दिले. देश एकसंध रहावा यासाठी, सामाजिक ऐक्याची भावना जागृत ठेवण्यासाठी या भारत देशात विविध सण खूप महत्वाची भुमिका वठवत असतात. स्वतःच्या नात्या व्यतिरिक्त आपल्या मनाप्रमाणे नाती जोडण्यास या सणांमूळे वाव मिळू शकतो. त्यामुळे आज जम्मू काश्मीर मध्ये पण हिंदू आणि इतर व्यक्ती विविध सण मोकळेपणाने साजरा करीत आहेत. हे स्वातंत्र्य जम्मू काश्मीर मधील नागरिकांना मिळालेलं आहे,ही आजच्या स्वातंत्र्य दिनाची फार मोठी बाब आहे.

देश सुरक्षित असेल तर आपण ताठ मानेने म्हणू शकतो की,ज्याच्या शिरावर हिमालयाचा ताज आहे, प्रत्येक भारतीयाच्या हृदयावर ज्याचे राज आहे.पूर्ण विश्वात ज्या राष्ट्राचा आवाज आहे, आम्ही अभिमानाने सांगतो तो देश माझा " भारत " आहे.

ज्याचा मुकूट आहे हिमालय
जिथे वाहते गंगा
जिथे आहे विविधतेत एकता
अन् "सत्यमेव जयते" आहे नारा
तोच आहे भारत देश माझा.

आपल्या सर्वांना ८०व्या स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

मो. ९३२५४५७०५२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

15 ऑगस्ट
स्वातंत्र्य दिन

वंदे भारत

Epaper : epaper.sinhvani.com

दैनिक सिंहवाणी वृत्त

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com

सर्व देशवासियांना हार्दिक शुभेच्छा !

# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अभियान: उंचावण्या देशाची आण, बाण, शान व मान



कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली

राज्यात १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने घरोघरी तिरंगा मोहीम राबवली जात आहे. ही मोहीम ९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान असणार आहे. मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस साहेबांनी नुकतेच या अभियानासाठी करण्यात येत असणाऱ्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. राज्यात सदर आठवडाभर घरोघरी तिरंगा मोहीम राबविण्यात येत आहे. हा आपला राष्ट्रीय सण असून यात सर्वांना सहभागी करुन घ्यावे आणि प्रत्येक घरापर्यंत तिरंगा पोहचवून हे अभियान यशस्वी करावे,असे आवाहन मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस साहेबांनी केले. सन-२०२३ साली मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत घरोघरी तिरंगा अभियानाच्या तयारीचा आढावा तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी घेतला.

त्यावेळी मुख्यमंत्र्यांचे अतिरीक्त मुख्य सचिव डॉ.आय. एस.चहल, विकास खारगे, महसूल विभागाचे अतिरीक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, परिवहन विभागाचे अतिरीक्त मुख्य सचिव संजय सेठी, जलसंपदा विभागाचे अतिरीक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांच्यासह विविध विभागांचे सचिव आणि विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि महापालिका आयुक्त उपस्थित होते. घरोघरी तिरंगा हे अभियान राष्ट्रभक्ती चेतवणारे अभियान असून या काळात प्रत्येक दिवशी रॅलीसह, मॅरेथॉन, सांस्कृतिक कार्यक्रमांसह अनेक अभिनव उपक्रमांचे आयोजन केले आहे. या उपक्रमांमुळे सगळीकडे देशभक्तीमय वातावरण तयार होणार आहे. या अभियानात व्यापक जनसहभाग वाढण्यासाठी समाजमाध्यमांसह विविध माध्यमातून जनजागृती करावी, असं आवाहन मुख्यमंत्री मा.फडणवीस साहेबांनी केलं आहे. घरोघरी राष्ट्रध्वज उपलब्ध करुन द्यावा याकरिता जिल्हास्तरावर नियोजन समितीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन द्या.

राज्यातील प्रमुख धरणांसह मुंबई ट्रान्सहार्बर लिंक, वरळी सी लिंक, गेटवे ऑफ इंडिया यासारख्या महत्वाच्या ठिकाणी तिरंग्याची रोषणाई करण्यात यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी त्यावेळी दिल्या. त्यावेळी मुख्यमंत्र्याचे अतिरीक्त मुख्य सचिव श्री.खारगे यांनी घरोघरी तिरंगा अभियानाबाबत सादरीकरण केले होते.

भारत देशात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या हृदयात भारतभूचा सार्थ अभिमान असावयास हवाच. देशाचा तिरंगा राष्ट्रध्वज उच्चस्थानी फडकत बघून आदराने मान वाकवून ध्वजवंदन करायलाच पाहिजे. हाच खरा देशप्रेमाचा, राष्ट्रभक्तीचा आणि राष्ट्रध्वज सन्मानाचा उत्तम दाखला ठरतो. मागील सन २०२२पासून संपूर्ण विश्वात भारतातील जनतेचे देशावरचे प्रेम व राष्ट्रीय ऐक्य दाखवून देण्याच्या महत्वाकांक्षेने केंद्र सरकारने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अभियानांतर्गत घरोघरी तिरंगा हा उपक्रम आयोजित केला आहे. हा निर्णय तसा देशाची आण, बाण, शान तथा मान उंचावण्याच्या उद्देशाने चांगला आहे. संपूर्ण भारतदेश तीन रंगाने शोभून जगावेगळा दृष्टीस पडत आहे, येथवर ठिक आहे. मात्र तेवढाच जनतेला राजद्रोही व देशद्रोही ठरविणाराही सिद्ध होत आहे आणि पुढेही होईलच, यात तिळमात्र शंका नाही. रोज रोटीतुकडा मागून पोटभरणाऱ्या काही लोकांना आजही राहण्यास घरे नाहीत, त्यांनी राष्ट्रध्वज उभारावीत तरी कोठे? उभारली नाहीत; म्हणून त्यांना सरकारने का राष्ट्रद्रोही ठरवावे? काही लोकांनी तिरंगा फडकविला, पुढेही फडकावतीलही, मात्र त्यांना कुठे माहित पडतं, की आपण ध्वज उलटं लावलं की सुलटं? उपक्रमाची यशस्वी सांगता झाल्यानंतर प्रत्येक घरातील ध्वज ठेवलं गेलं कुठं? पुढेही ठेवलं जावं कुठं? त्याची व्यवस्था योग्यरीत्या लावली गेली का? पुढेही लावली जाईल का? पूर्वी शौकीन व अतिव देशाभिमानी लोक मुलांच्या हातात प्लास्टिकचे ध्वज देत व नंतर दुसऱ्या दिवशी ते कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर कचरा म्हणून फेकली जात. काही ठिकाणी तसलेच चित्र दिसल्याचे समाज माध्यमांनी जगासमोर मांडले होते.

अगदी तसलीच गत पुढेही होतच राहणार तर नाही ना? अशा अनेक समस्या राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्यात उद्भवत आहेत, पुढेही उद्भवणार आहेतच. याच चुकांना गृहीत धरून संबंधित लोकांवर राष्ट्रध्वजाचा अवमान करणारे म्हणून गुन्हे दाखल करून त्यांना तुरूंगात डांबले गेले आणि पुढेही जाईल. याचा कोणीतरी तज्ज्ञांनी सांगोपांग विचार का केला नाही? आतातरी विचार केला जावा. मागील वर्षी अनेक किस्से उजेडात आले. राष्ट्रध्वज पुरविणारांनी ते कसेही अयोग्य ध्वज पुरविले. त्यात ते वाकडेतिकडे शिवलेले, फाटलेले, स्वप्रसिद्धीस्तव आपले नाव लिहिलेले, सही केलेले, दुसऱ्याच देशाचे चिन्ह लावलेले, अशा कितीतरी उणिवा किंवा भर घातलेले ध्वज होते. गडचिरोली नगरपरिषद तर्फे गडचिरोली शहरभर घरोघरी जाऊन ध्वज वाटले गेले. माझ्याकडेही ते घेऊन आले. मी ध्वज तपासून पाहिले, तेव्हा त्यात एकही ध्वज योग्य नव्हता. त्यात तिरंगी पट्ट्या असमांतर होत्या आणि अशोकचक्र केंद्रस्थानी नव्हते, तर ते कोणत्यातरी एका दिशेला अधिक सरकलेले दिसत होते; म्हणून मी एकही ध्वज पसंत करून घेतला नाही. त्या कर्मचाऱ्यांना मी फर्मावत म्हटले, कि मी असा ध्वज फडकवून राष्ट्रध्वजाची बेईज्जती करू इच्छित नाही, त्यापेक्षा मी ध्वज न फडकावण्याच्या गुन्ह्याला सामोरे जाण्यास तयार असेन.

ज्यांनी असा माज्यासारखा विचार केला असेल ते माज्या मते खरेच भारताचे सूज्ञ नागरिक होत. जे घरी ध्वजारोहण करू इच्छित नाही. या शुद्ध सात्विक विचाराने घरी तिरंगा न फडकावणाऱ्यांना राजद्रोही व देशद्रोही ठरविले जाऊ शकते का? घरोघरी ऐवजी चौका चौकात, मोहल्या मोहल्यात, टोल्या पाड्यात, गल्लोगल्ली किंवा गावोगावी यापैकी कोणताही पर्याय योग्य ठरला असता. कारण त्यामध्ये सामूहिक जबाबदारी राहिली असती. यासाठी सरकारने घरोघरी तिरंगा अभियानाच्या यशस्वितेसाठी पूर्वतयारी म्हणून गाव, वॉर्ड, नगर, शहर अशा प्रत्येक स्तरावर प्रशिक्षणाद्वारे ध्वजसंहिता आणि ध्वज फडकविण्याचे, हाताळण्याचे, निगा राखण्याचे नियम प्रत्येक नागरिकास अवगत करून देण्यात यावेत. घरोघरी यातील वैयक्तिक जबाबदारी राष्ट्रध्वज हाताळण्याविषयीच्या पुढील नियमांनुसार पार पाडणे खरेच अवघड आहे हो!

**शासनमान्य नियम:** ध्वज फडकावताना तो फाटलेला, मळलेला किंवा चुरगळलेला नसावा. तिरंगा व्यवस्थित ठिकाणी फडकवावा. ज्या उंचीवर तो फडकविला आहे, त्याच्या बरोबरीच्या उंचीवर इतर कोणताही ध्वज नसावा. कोणत्याही प्रकारच्या सजावटीत राष्ट्रध्वजाचा वापर करू नये. ध्वजारोहणासाठी झेंडा तयार करताना त्यात फुलं ठेवता येतील. ध्वज फडकविताना नारिंगी रंग वरच्या बाजूला राहील, याची दक्षता घ्यावी. ध्वजावर काहीही लिहू नये. कोणतीही वस्तू झाकण्यासाठी त्याचा वापर करू नये. राष्ट्रध्वज फरशीवर पडलेला नसावा, पाण्यावर तरंगलेला नसावा. कोणत्याही प्रकारच्या वेशभूषेवर राष्ट्रध्वजाचा वापर करू नये. तो कमरेच्या खाली गुंडाळू नये. रुमाल, सोफ्याचं कव्हर, नॅपकीन, अंतरवस्त्र यासाठी कापड म्हणून त्याचा वापर करू नये. जेव्हा ध्वज फडकावतो तेव्हा तो ध्वजस्तंभाच्या उजव्या बाजूला असावा.

एकच तारा समोर, आणिक पायतळी अंगार,
गर्जा जय जयकार क्रांतीचा गर्जा जय जयकार!"

कवी कुसुमाग्रजांनी केलेल्या या



आवाहनाचे सार्थक होण्यास दि.१५ ऑगस्ट १९४७चा दिवस उजाडला. पक्षी पिंजऱ्यातून उडाला. स्वातंत्र्याची रम्य प्रभात झाली. असंख्या बलिदानांचे सार्थक झाले आणि भारताला पारतंत्र्यातून मुक्तता मिळून स्वातंत्र्य मिळाले. बघता-बघता स्वातंत्र्याचा प्रवास ७५ वर्षांचा होता आहे. आज आपण भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. एखाद्या राष्ट्राच्या जीवनात ७५ वर्षांचा कालखंड हा जरी फार मोठा टप्पा नसला तरी, राष्ट्रातील नागरिकांच्या जीवनात स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण करणे अनन्यसाधारण महत्वाचे आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपली स्वातंत्र्याविषयी कोणती स्वप्ने होती? स्वातंत्र्याकडून आपल्या कोणत्या अपेक्षा होत्या? आज सत्य काय आहे? कुठे होतो आपण आणि आता कुठे आहोत? उणिवा काय राहिल्या आणि आता भविष्यात कशी पावले उचलावी लागतील? याचा विचार आपल्यालाच करावा लागेल. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपण काय कमावलं? आणि काय गमावलं? याचे सिंहावलोकन करण्याच्या टप्प्यावर आपण येऊन पोहोचलो आहोत. भारत हा नैसर्गिक साधनसंपत्ती आणि खनिज संपदेने समृद्ध देश आहे. माथी हिमालय उभा आहे.

पायी सागराच्या लाटा लोळण घाळत आहेत. देशातून गंगा-गोदावरी, ब्रह्मपुत्रासारख्या रक्त वाहिन्या वाहत आहेत. निजीत पक्षी आकाशी भरारी मारतो आहे. सैनिक आणि जवान डोळ्यात तेल घालून देशाच्या सीमारक्षण करत आहेत. किसान लोकराजा बनला आहे. आपल्या देशाला शिमला, कुलू, मनाली, उटी सारखी समृद्ध पर्यटन स्थळे लाभली आहेत. एकूणच आपला भारतदेश सुजलाम् सुफलाम् बनला आहे. आपल्या देशाला पैराणिक आणि ऐतिहासिक संस्कृतीचा वारसा लाभला आहे. अनेक जातींचे, धर्मांचे, भाषांचे लोक येथे गुण्यागोविंदाने एकत्र नांदत आहेत. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत कबीर यांच्यासारख्या थोर संतांची भूमी असलेल्या आपल्या देशाची संस्कृती आज जागतिक पातळीवर सर्वश्रेष्ठ संस्कृती मानली जाते. भारत एकाच वेळी अध्यात्मात आणि विज्ञानातही अग्रेसर होत आहे. अनेक खेळ प्रकारात भारताने जागतिक दजार्ची कामगिरी केली आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात गेली ७५ वर्षे साहित्य, कला, क्रीडा, संस्कृती या क्षेत्रामध्ये नामवंत लेखक, साहित्यिक व कलावंतांनी आपला अमीट ठसा उमटवला आहे.

पण असे असले तरी एकीकडे प्रगती होत आहे आणि दुसरीकडे अनेक गोष्टी आपल्याला वेदना देत आहेत. स्वातंत्र्यासाठी अनेक शूरवीरांनी ऐन तारुण्यात बलिदान दिले. आपले संपूर्ण आयुष्य स्वातंत्र्यासाठी समर्पित केले, स्वरक्ताचा सडा टाकला. परंतु आम्ही मात्र रक्ताचा घाऊक बाजार मांडला आहे, असं कधीकधी उगीचंच वाटते. त्या देशभक्तांनी राष्ट्रध्वजास प्राणाहून प्रिय मानले व तसे वागविलेही. ते साधे जमिनीवरही पडू दिले नाही. मात्र आम्ही ते पायदळी तुडवून देशाची शान उंचावित असल्याच्या आविभार्वात वागत आहोत, हीच खरी मोठ्या शरमेची गोष्ट नाही का? आज चीन-पाकिस्तान सारख्या परकीय शक्ती सीमेवर आक्रमणाच्या तयारीत असतात. देशांमध्ये दहशतवादी हल्ले होतात. उरी, पुलवामासारख्या रक्ताळलेल्या आठवणी आपल्याला दुःख देतात. या देशातल्या शेतकऱ्याला आपल्या हक्कांसाठी आंदोलन करावे लागते. अनेक गरिबांना एक वेळचे जेवणसुद्धा मिळत नाही. स्वर्गासारखा काश्मीर गुलाबाच्या सुगंधाने दरवळत रहाण्याऐवजी रक्तात रंगताना पाहायला मिळतो. धर्माच्या नावावरून जातीय दंगली होतात, तेव्हा स्वातंत्र्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडतात. भारत मातेच्या हृदयाचे शेकडों तुकडे होतात. एकाच आईची लेकरे एकमेकांच्या रक्तासाठी तहानलेली असतील, तर त्या आईची काय अवस्था होत असेल? या साऱ्या आक्रमणांमध्ये अतिशय सामान्य माणूस भरडला जातो. जळणारी झोपडी आणि करपणारे रक्त मात्र भारतीयच आहे, हे आपण का विसरतो? हा खरा प्रश्न आहे. भ्रष्टाचाररूपी यंत्रणेमुळे मोठी व्यवस्था पोखरली जाते. रीज मोठ्या अधिकाऱ्यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अटक होते, तेव्हा ज्यांच्या हाती आपण देशाची प्रशासन व्यवस्था सोपवली आहे, तेच भ्रष्टाचाराने बरबटलेले पाहून असंख्य वेदना होतात. तुरूंगात असताना अनेक गुन्हेगार निवडणुका जिंकतात. दरवर्षी मोठमोठे घोटाळे उघडकीस येतात. सामान्य माणसाच्या हक्काची भाकरी गिळंकृत करणारी मंडळी या देशाचे मारेकरी आहेत.

सत्यमेव जयते! हे ब्रीदवाक्य आपल्या देशाची शान आहे. परंतु अशा दृष्ट प्रवृत्तींमुळे देश शोकग्रस्त होतो. कधीकधी देशासाठी फासावर चढणारे तरुण, अवघ्या चौदाव्या वर्षी शरीरावर गोळी बार झेलणारे शिरीष कुमारसारखे तरुण पाहिले तर आजच्या या तरुण पिढीकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या स्वातंत्र्याचा अर्थ त्यांना कधी कळेल का? असा प्रश्न पडतो. दि.१२ मार्च २०२१पासून स्वातंत्र्याच्या ७५व्या वर्षानिमित्त आजादी का अमृत महोत्सव या केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत राज्यात विविध कार्यक्रमांच्या आयोजनास सुरुवात झालेली आहे. त्या अनुषंगाने दिनांक ११ ऑगस्ट २०२१ रोजी माननीय मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली आजादी का अमृत महोत्सव म्हणजेच स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या उपक्रमाच्या आयोजनाबाबत विविध मंत्रालयीन मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव यांच्यासमवेत बैठक संपन्न झालेली आहे. या बैठकीमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या उपक्रमांचे आयोजन देशाच्या स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त केंद्र शासनाने सुचित केल्यानुसार दि.१५ ऑगस्ट २०२३पर्यंत राज्यभर जनसामान्यांना सामावून घेऊन करण्याबाबत सूचना करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने संस्कृती मंत्रालय, भारत सरकार यांनी आजादी का अमृत महोत्सव याच्या प्रयोजनार्थ गठीत केलेल्या समितीच्या धर्तीवर राज्यातील कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी विविध क्षेत्रातील समितीला गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासनाने आजादी का अमृत महोत्सव या अभियानासाठी शासन निर्णय दि.१३ ऑक्टोबर २०२१ रोजी बैठकीत घेतलेला आहे. त्या अनेक उपक्रमांच्या रुपात कोणाच्या सुपीक डोक्यातील भन्नाट कल्पना आहेत? माहित नाही बुवा.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपल्याला एक गोष्ट मान्यच करावी लागेल, की भारतीय स्वातंत्र्याने आपल्याला खुप काही दिले आहे. परंतु जो असमाधानाचा, असंतोषाचा सूर आणि धूर निघत आहे, त्याला आपणच जबाबदार आहोत. आपली आर्थिक, सांस्कृतिक, औद्योगिक प्रगती झाली. पण...पण मूल्यांचा ऱ्हास होत गेला. म्हणूनच एकीकडे आपण वैज्ञानिक प्रगतीच्या मार्गाने झपाट्याने परिवर्तन करीत आहोत. परंतु त्याचवेळी दुसऱ्या बाजूने वेगाने वाढणाऱ्या भौतिक व अभौतिक समस्यांच्या दृष्ट विळख्यात आपण अडकल्याने स्वातंत्र्याचा श्वास गुदमरतोय. अशीच अवस्था पुढेही होऊ नये, म्हणूनच स्वातंत्र्याच्या या अमृत महोत्सवी वर्षानिमित राबविण्यात येणाऱ्या अभियानात सूज्ञ नागरिक बनून सावधपणे पावले टाकावीत. घरोघरी तिरंगा प्रत्येकानी उभारला पाहिजे, मात्र तत्पूर्वी त्या देशभक्ताने राष्ट्रध्वज संहिता व नियम आत्मसात केले पाहिजे. कारण तिरंगा हाताळणे माज्यासारख्या ऐऱ्यागैऱ्याचे काम नाहीच! विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

- ९४२३७१४८८३

# वणवा क्रांतीचा : भारत छोडो आंदोलन



डॉ. प्रकाश पांडे
वाशीम

८ ऑगस्ट भारतीय राष्ट्रीय काँग्रेस नेत्यांची बैठक होऊन त्यात इंग्रजांना भारत छोडो आंदोलनाचा प्रस्ताव पारित करण्यात आला व गांधीजींच्या नेतृत्वाखाली या आंदोलनाला सुरुवात झाली यापूर्वीच्या दोन आंदोलनाला इंग्रजांनी प्रतिसाद न दिल्याने गांधीजींनी करो या मरो हा नाराच देऊन टाकला व हे आंदोलन पूर्ण स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत मागे घेतल्या जाणार नसल्याचे इंग्रजांना खडसावून सांगितले.



याच दिवशी असहकारातून नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी नोकरी न सोडता कांग्रेस सोबत असल्याचे सांगितले आणि भारतीय सैनिकांनी आपल्या लोकांवर अजिबात गोळीबार करु नये असा प्रस्ताव पारित केला. याचवेळी विश्व युद्ध पेटले होते यात भारताकडून इंग्रजांना सहकार्याची अपेक्षा होती पण त्यावेळी गांधीजींनी स्पष्ट सांगितले की एकतर आम्हाला स्वातंत्र्य देऊन टाका नाहीतर जापान ब्रम्हदेश मॅनमार पर्यंत आला आहे भारतावर कधीही हल्ला होऊ शकतो.

आणि गांधीजींनी करो या मरोचा नारा दिल्याने हे आंदोलन आता जन आंदोलन झाले होते त्यामुळे स्वातंत्र्यासाठी जनतेतून प्रपंच प्रमाणात साथ मिळून भारताच्या कानाकोपऱ्यातून आणि सर्व स्तरातील लोक सामील झाले होते.

आणि या आंदोलनाला बऱ्याच ठिकाणी हिंसक वळण लागले लोक सरकारी मालमत्तेचे नुकसान करु लागले यात रेलपटरी उखाणे, जाळपोळ इत्यादी प्रकारे सरकारला त्रासदायक ठरू लागले, त्यावेळी इंग्रजांनी गांधीजींना प्रश्न केला की आपण तर अहिंसेचे पुजारी आहात मग हे कसे काय घडत त्यावेळी गांधीजींनी स्पष्ट सांगितले की ही अती अत्याचाराची प्रतिक्रिया आहे मी काही झाले तरी आंदोलन मागे घेणार नाही.

आणि ९ ऑगस्ट रोजी काँग्रेसच्या बहुतांश मोठ्या नेत्यांना तुरुंगात टाकले, तरीपण आंदोलनाची तीव्रता कमी झाली नाही.काही नेत्यांनी ऐनकेन प्रकारे सुटका करून भुमीगत आंदोलन सुरुच ठेवले. सरकार आणि आंदोलकामध्ये चांगलाच संघर्ष पेटला यात १९४२ या वर्षात ६० हजार लोकांना गीरप्तार करण्यात आले व हजारो लोंकाचा गोळीबारात मृत्यू झाला होता .

यावेळी तामलू, बलीयन, धारवाड सातारा,बालासोर याठिकाणी समांतर स्वतंत्र सरकार स्थापन करण्यात आले होते, साताऱ्याचे सरकारचे नेतृत्व वाय. बी. चव्हाण आणि नाना पाटील यांनी केले.

यात जयप्रकाश नारायण,राम मनोहर लोहिया,एस.एम जोशी . अच्युतराव पटवर्धन, सुचेता कृपलानी, अरुणा असफ अली, आर जी.गोयनका यांनी भूमिगत राहून आंदोलनाची दिशा ठरवीत होते. या अगोदर शेकडो क्रांतिकारकांनी स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले या अनेक विरांच्या बलीदानातून १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले.

मो. ९३२५४५७०५२

15 ऑगस्ट
स्वातंत्र्य दिन
Epaper : epaper.sinhvani.com

वंदे भारत

दैनिक सिंहवाणी वृत्त

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com

सर्व देशवासियांना हार्दिक शुभेच्छा!

# होय..आम्ही स्वातंत्र्य झालोत..!

देशाच्या सार्वभौमत्वाला तुडवून देशातील उच्च निचतेच्या अंतराचा, जाती धमार्तील कलहाचा फायदा उचलत परकियांनी देशाच्या अखंडतेवर आपले वर्चस्व प्रस्थापित करुन देशाचे स्वामित्व काबीज केले. अशा इंग्रजांच्या जाचक बेडी तोडून देशातील थोर स्वातंत्र्यसैनिकांनी, देशभक्तांनी, विचारवंतांनी, समाज सुधारकांनी आपापल्या क्षेत्रातून एकजुटीने इंग्रजांच्या गुलामगिरीला तोडण्याचा प्रयत्न करून देशाला स्वातंत्र्य प्राप्त करून दिले. चुकीच्या गोष्टीसाठी जेव्हा जनसमुदाय जागा होतो अनं चुकीच्या धोरणांची होळी करुन जो नवोदय साकारतोय तेव्हाच खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य जाहते. हे स्वातंत्र्य प्राप्त करून देताना कुणा एका राजकीय पक्षाची, घराण्याची, एका राजकीय विचारांची किंवा विशिष्ट वर्गांचाच वाटा होता असे नाही तर त्यासाठी संपूर्ण देशातून उठलेली इंग्रजविरुद्धची लाट, इंग्रज विरोधाच्या धोरणाची ना पसंती आणि प्रत्येकाच्या मनात स्वतःच्या राष्ट्राची अभिव्यक्ती व अभिरुची या साऱ्या बाबी आपल्या देशाला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्यासाठी कारणीभूत ठरल्या. या साऱ्या प्रयासातून १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश पूर्णतः इंग्रजांच्या



विशाल देवतळे
हिंगणा, जि.नागपूर

गुलामगिरीतून त्यांच्या अधिपत्यातून स्वतंत्र झाला आणि जगाच्या नकाशावर एक नवा भारत उदयास आला.

'स्वातंत्र्य' हा शब्द जेव्हाही आपण उच्चारतो तेव्हा एक जगावेगळ्या भावनांचा भाव रोमरोमी ओसंडून वाहतो. स्वतंत्र या शब्दाचा अर्थही बंधनाशिवाय दबावाशिवाय, नियंत्रणाशिवाय मनसोक्त आपल्या क्षमतांनुसर जगणे असा होतो. आपल्या भूमीवर मनासारखे जगण्याचे, राहण्याचे स्वातंत्र्य ..! आपल्या विचारांना पूर्णत्व देण्याचे स्वातंत्र्य..! आपापसातील संबंधांना योग्य न्याय व दिशा देण्याचे स्वातंत्र्य..! या भूमीवर राहणाऱ्या प्रत्येक नागरिकांच्या यातनांना सावरण्याचे स्वातंत्र्य..! जनहिताना जपण्याचे स्वातंत्र्य..! अन्यायाला चिरुन अन्यायाच्या विरुद्ध आवाज उठवण्याचे स्वातंत्र्य..! या साऱ्या बाबी 'स्वातंत्र्य झालो' या संकल्पनेशी मेळ खातात का..? देश स्वातंत्र्य होऊन इतके वर्ष लोटूनही प्रश्न मनाला पडतो की,

'आपण खरंच स्वातंत्र्य झालो आहोत का..?' देशाच्या विविध राज्यात, प्रांतात आज सभोवार घडणाऱ्या घटनांच्या अन्यायांचा ताळमेळ लक्षात घेऊन याचा एक भारतीय नागरिक या नात्याने कुठेतरी विचारांच्या तळाशी जाऊन नक्कीच चिंतन करणे गरजेचे आहे. चिंतन केले तर स्वातंत्र्याच्या संकल्पनेचे मतितार्थ मनाला चटके देत असल्याचे दिसून येईल.

होय...मान्य आहे की आपल्या देशाला स्वातंत्र्य होऊन ८० वर्षाचा बराच कालावधी पार झाला..! पण खऱ्या अर्थाने विचार केल्यास आपण केवळ इंग्रजांची गुलामगिरी तोडून, मोडून काढली पण 'जनसामान्यांच्या अनं माणुसकीच्या' विरोधात काम करणाऱ्या पांढऱ्या पेशातील आपल्या भारतीय राजकारण्यांच्या मक्तेदारीची गुलामगिरी आपण आजही निमूटपणे सहन करत आहोत किंबहुना त्या गुलामगिरी मध्ये आपण सारेच निपचित मुके जनावरे होऊन वावरत आहोत. हे जे स्वतःला स्वतंत्र भारताचे महामेरू राजकारणी म्हणून घेणारे जनतेला स्वतंत्रपणे जगू देत आहे का? मनातल्या प्रश्नांना तरी साधे जनमाणसांना



विचारण्याचे हक्क आहे का..? मग आपल्याला स्वातंत्र्य झालं असे म्हणता येईल का..! होय ..आम्ही स्वातंत्र्य झालोत..!असे अभिमानाने म्हणता येईल का..? भारतीय नागरिक या नात्याने याचा जरूर विचार प्रत्येकाने करावा. स्वातंत्यदिनाचे उत्सव साजरे करतांना भारतीय नागरिक या नात्याने आपल्या समस्त भारतीयांना अभिमान वाटतो आहे आणि वाटायलाही पाहिजेच..! पण देशाची वाटचाल जर चुकीची होत असेल जनसामान्यांचे कल्याण धोक्यात येत असेल तर त्या स्वातंत्र्याचा काय फायदा..? त्या स्वातंत्र्याला काय अर्थ उरतो. जिथे विचार, व्यवहार, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरच गदारोळ उत्पन्न होत असेल. तिथे उत्सवाचे काय फलीत याची खंत फक्त मनात कुजबूज करत राहते. जोपर्यंत देशपातळीवर निष्ठेने काम करण्याची पातळी समृद्ध होत नाही तोपर्यंत माणूस वैचारिक गुलामीतून मुक्तच होऊ शकणार नाही.

भारत देशाच्या या कुशीत विकास, सांस्कृतिक आणि शिक्षण अशा विविध क्षेत्रांमध्ये स्वयंपूर्ण असेलले आपले महाराष्ट्र एक अव्वल राज्य अस्तित्वात आहे. एकेकाळी शिक्षणाच्या सारस्वत्वाची दाखले निर्माण करणाऱ्या या राज्याचा खरंच 'स्वातंत्र्याच्या अथार्शी' ताळमेळ जुळतो काय ? महाराष्ट्र भूमीच्या सभोवार कटाक्ष टाकल्यास अनेक कानाकोपऱ्यात विविध प्रकारच्या प्रश्नाचे तांडव थैमान घातलेले नजरेत भरतात. त्यात शेतकऱ्यांच्या मालाच्या हमी भावाचा प्रश्न..? शेतकऱ्यांच्या अपार कष्टासमोर हातात मिळणारा तुटपुंज्या मोबदल्याचा प्रश्न? शेतकऱ्यांच्या डोक्यावरच्या न उतरणाऱ्या कर्जाचा प्रश्न...? शेतकऱ्यांच्या विपरीत निर्माण होणारे शेती धोरणांचा प्रश्न..? महिला व मुलींच्या सुरक्षितेचा प्रश्न? आज अनेक ठिकाणी महिला बिनधास्त रस्त्यावर चालू शकत नाही? कार्यालयात निडरपणे काम करु शकत नाही.? 'शिक्षणाची गंगा' ही ओळख पुसून टाकून बिनबुडाच्या शैक्षणिक धोरणांचा प्रश्न? शिक्षणाचे खाजगीकरणचा वाढता कल? दोन-तीन दशकापासून विना पगाराने काम करणारे लाखोच्या संख्येतील शिक्षक बांधव जे आजही अनुदानाच्या हक्कासाठी केवळ विद्यादानाच्या सेवेचा मोबदला मागण्यासाठी मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलन करायला बसतात. अशा शिक्षकांच्या पगाराचा प्रश्न? कर्मचाऱ्यांचा नियमित न होणाऱ्या वेतनांचा प्रश्न? अनावश्यक असणाऱ्या गैर सरकारी योजनांचा प्रश्न? देशाच्या चौकटीला समृद्ध करणारे युवक वर्ग पेपर फुटी सारख्या प्रकरणापासून आंदोलनासाठी प्रेरित होतात आंदोलन करूनही पेपर फुटी प्रकरणाला पाहिजे तसा न्याय न मिळण्याचा प्रश्न..? दिवसेंदिवस विक्राळ होत जाणाऱ्या बेरोजगारीचा प्रश्न? अविचारी सत्तेमुळे, बेभरवशाचे धोरणामुळे युवकांच्या मनात वाढणारा गैरविश्वासाचा प्रश्न?

मोलमजुरी करणारे गरीब लोकांच्या विपरीत नियमावली, धोरणांची आखणीचा प्रश्न..? केवळ विशिष्ट वगार्साठी या भूमीत निगरगट्ट पैसा कमावणाऱ्या मोजक्या श्रीमंतां बद्दलची दिवसागणिक वाढणारी आस्थेचा प्रश्न? यासारख्या प्रश्नांनी जन माणसाच्या विचार विश्वाची लक्तरेच उडवली आहे. मग खरंच या देशाला पूर्णतः स्वातंत्र्य झाले असे म्हणता येईल का? जर ही प्रश्न प्रत्येक सामान्यांच्या मनात कुजबुज करत असेल! यासारख्या समस्या या भूमीत उफाळून येत असेल तर ते राष्ट्र ते राज्य किंबहुना ती भूमी स्वातंत्र्य झाली आहेत का याचा विचार करणे गरजेचे आहे. एक देश म्हणून एक भूमी म्हणून याला परकीय लोकांचे अधिपथ्य नसल्याने याला स्वातंत्र्य म्हणता येईल पण आपल्याच भूमीमध्ये सत्ता सांभाळणारे जर या जनतेच्या विचारांना कुचलण्याचा प्रयत्न करत असेल, पायदळी तुडवण्याचा प्रयत्न करत असेल तर आपण खरंच स्वातंत्र्य झालो आहोत का याचा सखोल विचार करायलाच पाहिजे..!

दिवसागणिक देशात वाढणारी पेट्रोल इथेनॉलची समस्या..! सुसज्ज असणारे डांबरी रस्ते बदलून सिमेंटीकरण रस्ते आणा फज्जाच फज्जा..! गरिबांच्या खिशाला मोठ्या प्रमाणात कात्री अनं मोजक्या श्रीमंत वर्गांना पैशाच्या पुंजीची दात्री..!अनेक सरकारी क्षेत्रांचा खाजगीकरणाकडे वाढता कल..! या वाढत्या कलातून गरिबांच्या उरावर लादले जाणारे ओझे या देशाला स्वातंत्र्याच्या अथार्ला डफमळीत करतात. जोपर्यंत या देशातील सामान्य नागरिक आनंदाने खुशालीने आपलं जीवन व्यतीत करत आहे अगदी बिनधास्तपणे असं चित्र दिसत नाही तोपर्यंत हा देश नियतीतून स्वातंत्र्य झाला असे म्हणता येणार नाही. एकीकडे सामान्य जनतांच्या डोक्यावर विचित्र धोरणांच्या अटी लादल्या जातात आणि दुसरीकडे आम्ही लोकशाही असणाऱ्या विशाल देशाचे पुढारी तो कुठेच ताळमेळ जुळत नाही. तेव्हा देशाची सत्ता सांभाळणाऱ्या राजकारणांनो स्वतःच्या स्वार्थासाठी तुम्ही हे सर्व जनतेचे अहित साधत आहात या जाचापासून जनता मुक्त झाली तरच म्हणता येईल की,'होय..आम्ही स्वातंत्र्य झालोय..! आम्ही खरंच स्वातंत्र्य झालोय...! नाही तर नाही.

मो. ९७६४९१५१७५

# स्वातंत्र्याचा श्वास घेताना, आपण खरेच स्वतंत्र झालो का?

१५ ऑगस्टला सकाळी तिरंगा आकाशात डौलाने फडकतो, राष्ट्रगीताचे स्वर वातावरण भारून टाकतात, शाळांच्या मैदानावर लहान हात सलामीसाठी उंचावतात आणि आपण अभिमानाने म्हणतो– भारत स्वतंत्र झाला!

'भारत माता की जय वंदे मातरम' सगळीकडे आनंदाचे वातावरण असते सगळ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहतो हृदयामध्ये लहानापासून तर मोठ्यापर्यंत सगळ्यांच्या मनात देशभक्ती जागी होते, 'आनंदी आनंद गडे इकडे तिकडे चोहिकडे' असे वातावरण सगळीकडे पाहायला मिळतात. पण या उत्सवाच्या गजरात एक प्रश्न मात्र शांतपणे आपल्या मनाच्या कोपऱ्यात उभा राहतो. स्वातंत्र्य मिळाले, पण आपण खरेच स्वतंत्र झालो का?

हा प्रश्न परकीय सत्तेविरुद्ध नाही. हा प्रश्न आपल्या आतल्या गुलामगिरीविरुद्ध आहे. कारण देशाच्या सीमा स्वतंत्र झाल्या, सत्ता आपल्या हातात आली, परंतु विचारांना अजूनही पूर्वग्रहांच्या बेड्या असतील, माणसाला माणूस म्हणून स्वीकारण्याची तयारी नसेल, स्त्रीला समानतेचा अधिकार देताना समाजाची पावले अडखळत असतील, गरिबाच्या वेदनेकडे पाहण्याची संवेदना बोथट झाली असेल, तर मग स्वातंत्र्याचा अर्थ केवळ ध्वजारोहणापुरता उरत नाही का?

१५ ऑगस्ट १९४७ हा दिवस असंख्य स्वप्नांचा, त्यागाचा, संघषार्चा आणि बलिदानाचा



मनिषा कांबळे
यवतमाळ

परिपाक होता. ज्यांनी स्वतःच्या आयुष्याची होळी करून देशाच्या स्वातंत्र्याची मशाल तेवत ठेवली, त्यांच्या त्यागामुळे आज आपण मोकळ्या आकाशाखाली श्वास घेत आहोत. कुणाच्या तुरुंगवासात, कुणाच्या फासावर, कुणाच्या रक्तात आणि कुणाच्या अश्रूंमध्ये या स्वातंत्र्याची किंमत लिहिलेली आहे. म्हणूनच स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करताना केवळ भूतकाळाची आठवण पुरेशी नाही,त्या स्वातंत्र्याचा वर्तमानाशी संवाद घडवणे गरजेचे आहे.

आपल्या स्वातंत्र्यलढ्याने आपल्याला केवळ परकीय सत्ता उलथून टाकण्याची शिकवण दिली नाही, त्याने अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ताकद दिली. महात्मा गांधींच्या सत्याग्रहापासून भगतसिंगांच्या निर्भीड विचारांपर्यंत, सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षणक्रांतीपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्यायाच्या संघर्षापर्यंत भारताच्या स्वातंत्र्याची कहाणी ही केवळ राजकीय मुक्तीची कहाणी नाही. ती माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून देण्याचीही कहाणी आहे.

विशेषत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले संविधान आपल्या स्वातंत्र्याला मूल्यांची दिशा देते. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय हे भारतीय लोकशाहीच्या अस्तित्वाचे प्राण आहेत. त्यामुळे आज आपण स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे–आपल्या व्यवहारात संविधान किती आहे? आपण तिरंग्याला सलाम करतो; पण माणसामाणसातील भेदभावाला सलाम करणे कधी थांबवणार? आपण स्वातंत्र्यवीरांच्या जयघोषाने आकाश दुमदुमवतो, पण अन्यायाविरुद्ध आवाज उठवताना आपला आवाज का क्षीण होतो? आपण देशाच्या प्रगतीचे आकडे मोजतो,पण शेवटच्या माणसाच्या डोळ्यातील आशा किती वाढली, याचा हिशेब कोण ठेवणार?

स्वातंत्र्य म्हणजे केवळ आपल्याला हवे ते बोलण्याचा अधिकार नव्हे, तर दुसऱ्याला त्याचे मत मांडण्याचा अधिकार मान्य करण्याची उदारता आहे. स्वातंत्र्य म्हणजे केवळ आपल्या पसंतीच्या धमार्चा, जातीचा, भाषेचा किंवा विचारांचा अभिमान नव्हेतर वेगळेपणाचा आदर करण्याची संस्कृती आहे. आज तंत्रज्ञानाने जग आपल्या हाताच्या तळव्यावर आणले आहे. एका क्षणात बातमी जगभर पोहोचते. मोबाईलच्या पडद्यावर ज्ञानाचा महासागर उपलब्ध आहे. भारत अंतराळात झेप घेतो आहे, डिजिटल युगात नवे अध्याय लिहितो आहे, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात जगाचे लक्ष









वेधून घेत आहे. ही नक्कीच अभिमानाची बाब आहे.

पण दुसरीकडे खोटी माहिती, द्वेषपूर्ण भाषा, सामाजिक माध्यमांवरील विषारी वाद, अफवा आणि माणसांना विभागणारी मानसिकता वाढत असेल तर या प्रगतीकडे आपण कोणत्या नजरेने पाहायचे? रॉकेट आकाशात झेपावणे ही प्रगती आहे, पण माणसाचे मन द्वेषातून वर उठणे ही त्याहून मोठी प्रगती आहे. देश उंच इमारतींनी मोठा होत नाही. देश मोठा होतो तो आपल्या नागरिकांच्या विचारांनी, संवेदनांनी आणि प्रामाणिकपणाने.

आजची तरुण पिढी ही भारताच्या उद्याची आशा आहे. तिच्या हातात मोबाईल आहे, पण त्याच हातात देशाचे भविष्यही आहे. त्या हातांनी केवळ स्क्रीनवर बोटे फिरू नयेत, त्यांनी पुस्तकांची पानेही उलटली पाहिजेत. प्रश्न विचारले पाहिजेत. चुकीच्या गोष्टींना विरोध केला पाहिजे. विज्ञान स्वीकारले पाहिजे. संविधान समजून घेतले पाहिजे. स्त्री-पुरुष समानतेचा विचार जगला पाहिजे. जात, धर्म, भाषा, प्रांत यांच्या पलीकडे माणूसपणाची ओळख जपली पाहिजे. कारण देशभक्ती ही केवळ राष्ट्रगीताच्या वेळी उभी राहण्यात नाही,ती राष्ट्राच्या प्रत्येक नागरिकासाठी उभे राहण्यात आहे.

आपल्या देशातील शेतकरी उन्हात राबतो, कामगार शहरांची चाके फिरवतो, सैनिक सीमेवर जागा राहतो, शिक्षक पिढ्या घडवतो, डॉक्टर रुग्णाचे प्राण वाचवतो, सफाई कर्मचारी शहर स्वच्छ ठेवतो, कलाकार समाजाला संवेदनशील ठेवतो आणि लेखक प्रश्न विचारण्याची हिंमत देतो. या प्रत्येकाच्या कष्टात भारताची खरी ताकद आहे. म्हणूनच स्वातंत्र्यदिन हा फक्त सरकारी कार्यक्रमांचा दिवस न राहता आत्मपरीक्षणाचा दिवस व्हायला हवा.

आपण स्वतःला विचारूया, मी माझ्या देशासाठी काय करतो? मी माझ्या समाजातील अन्यायाकडे डोळेझाक तर करत नाही ना? मी स्त्रीचा सन्मान करतो का? मी जातीय आणि धार्मिक द्वेषापासून स्वतःला दूर ठेवतो का? मी सार्वजनिक संपत्तीला माझीच संपत्ती समजतो का? मी माझे काम प्रामाणिकपणे करतो का? या प्रश्नांची उत्तरे आपल्या मनाला अस्वस्थ करतील कदाचित. पण त्या अस्वस्थतेतूनच परिवर्तन जन्माला येते. स्वातंत्र्यवीरांनी आपल्याला मोकळा देश दिला, आता आपली पिढी त्यांना सुंदर देश देण्याची जबाबदारी स्वीकारणार आहे का, हा खरा प्रश्न आहे.

आज तिरंगा आकाशात फडकताना त्याच्या तीन रंगांकडे केवळ रंग म्हणून पाहू नये. त्यात त्यागाची आठवण आहे, शांततेची आकांक्षा आहे, प्रगतीची स्वप्ने आहेत. अशोकचक्र आपल्याला सतत गतिमान राहण्याची शिकवण देते. देश थांबला तर विकास थांबतो,समाज थांबला तर विचार थांबतात, आणि विचार थांबले की स्वातंत्र्याची खरी वाटचालही थांबते.

म्हणून १५ ऑगस्टला आपण केवळ 'भारत माता की जय' म्हणू नये; तर भारताला अधिक न्याय्य, समताधिष्ठित, संवेदनशील आणि विवेकी बनवण्याचा संकल्पही करावा. आपल्या देशाला आज शत्रूंच्या बंदुकीपेक्षा आपल्या मनातील द्वेष, अंधानुकरण, भ्रष्टाचार, असमानता आणि उदासीनतेशी अधिक मोठी लढाई लढायची आहे. स्वातंत्र्याचा झेंडा आपल्या घरावर फडकतो आहे; आता तो आपल्या विचारांवरही फडकला पाहिजे. देश स्वतंत्र झाला, ही इतिहासाची उपलब्धी आहे. पण प्रत्येक माणूस सन्मानाने, समानतेने आणि निर्भयपणे जगू लागला, तरच त्या स्वातंत्र्याला पूर्णत्व येईल. या १५ ऑगस्टला तिरंग्याला सलाम करताना हात कपाळापर्यंत जाऊ दे पण त्याच वेळी मनही प्रश्न विचारू दे. कारण स्वातंत्र्याचा खरा उत्सव फुलांच्या माळांनी, मिठाईच्या वाटपाने किंवा घोषणांच्या गजराने होत नाही.

तो होतो, जेव्हा माणूस माणसाला माणूस म्हणून स्वीकारतो. तो होतो, जेव्हा अन्यायासमोर मान झुकत नाही.

तो होतो, जेव्हा विचारांना भीती उरत नाही. आणि तो खऱ्या अर्थाने होतो, जेव्हा आपण स्वतःच्या स्वातंत्र्यासोबत दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचीही किंमत जाणतो. यंदाचा १५ ऑगस्ट म्हणूनच केवळ उत्सवाचा दिवस नको तो स्वतःकडे पाहण्याचा, चुका स्वीकारण्याचा आणि अधिक सुंदर भारत घडवण्याचा संकल्पदिन ठरू दे. तिरंगा आकाशात उंच फडकत राहीलच. प्रश्न एवढाच, आपले विचार त्याच्या उंचीपर्यंत पोहोचतील का?

15 ऑगस्ट
स्वातंत्र्य दिन

# वंदे भारत

Epaper : epaper.sinhvani.com

दैनिक सिंहवाणी वृत्त

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com

सर्व देशवासियांना
हार्दिक शुभेच्छा !

# लोकशाहीचा खरा वाली: राष्ट्रनिर्मितीत तरुणांची भूमिका



प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल,
वर्धा

आजच्या दिवशी, १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. आजमितीला भारताला स्वतंत्र राष्ट्र म्हणून ७९ वर्षे पूर्ण होऊन भारत देश यंदा ८० वा स्वातंत्र्यदिन साजरा करत आहे. प्रत्येक भारतीय नागरिकांना ही अभिमानाची गोष्ट आहे.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताच्या आकाशात स्वातंत्र्याचा सुवर्णसूर्य उगवला. हे स्वातंत्र्य सहज मिळालेले नव्हते; त्यामागे हजारो हुतात्म्यांचा त्याग, संघर्ष आणि समर्पण दडले होते. स्वातंत्र्याच्या या लढ्यात भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, चंद्रशेखर आझाद आणि बाबू गेनू यांसारख्या अगणित तरुणांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. स्वातंत्र्यापूर्वीच्या युवा पिढीचे मुख्य ध्येय देशाला पारतंत्र्याच्या शृंखलांमधून मुक्त करणे हे होते. आज आपण स्वतंत्र भारतात श्वास घेत आहोत, परंतु आजच्या बदलत्या घडामोडींच्या आणि वेगवान प्रवाहाच्या काळात युवा पिढीपुढील आव्हाने वेगळी आहेत. आजचे मुख्य ध्येय देशाला केवळ स्वतंत्र ठेवणे एवढेच नसून, त्याला जागतिक स्तरावर समृद्ध, शक्तिशाली, स्वावलंबी आणि आदर्शात्मक राष्ट्र म्हणून उभे करणे हे आहे. भारताकडे सध्या जगातील सर्वात मोठी युवा लोकसंख्या आहे. ही युवाशक्ती म्हणजे केवळ एक संख्या नसून ती राष्ट्राच्या प्रगतीचे इंजिन आहे. त्यामुळे राष्ट्र उभारणीमध्ये तरुणांचे कर्तव्य, विविध क्षेत्रांतील योगदान आणि विशेषतः बदलत्या घडामोडींमध्ये त्यांचा सहभाग सकारात्मक असणे अत्यंत आवश्यक ठरते.

लोकशाहीचा खरा कणा आणि राष्ट्रनिर्मितीची शक्ती म्हणजे तरुण पिढी होय. देशाच्या प्रगतीत, सामाजिक बदलात आणि राजकीय जाणिवा प्रगल्भ करण्यात युवकांचे योगदान सर्वात मोठे असते.तरुण पिढी ही कोणत्याही देशाची सर्वात मोठी शक्ती आणि संपत्ती असते. लोकशाही व्यवस्था केवळ कायद्यांवर चालत नाही, तर ती नागरिकांच्या जागरूकतेवर टिकून राहते. आजचा तरुण हा केवळ देशाचे भविष्य नाही, तर तो वर्तमानाचा शिल्पकार आणि 'लोकशाहीचा खरा वाली' आहे. तरुण वर्ग नवीन विचारांनी आणि ऊर्जेने समाजात सुधारणा घडवून आणतो. मतदान आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रिय राहून तरुण सुदृढ शासन व्यवस्थेचा पाया मजबूत करतात. डिजिटल युगात तरुण तंत्रज्ञानाचा वापर करून पारदर्शक आणि वेगवान प्रशासन घडविण्यास हातभार लावतात. जातीभेदाच्या पलीकडे जाऊन तरुण समाजसेवा, पर्यावरण रक्षण व आपत्ती व्यवस्थापनात आघाडीवर असतात.

आजचे युग हे ज्ञान, विज्ञान आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे युग आहे. या डिजिटल क्रांतीच्या काळात भारतीय तरुणांनी आपल्या कल्पकतेच्या जोरावर जगावर स्वतःचा ठसा उमटवला आहे. शिक्षण आणि कौशल्याने समृद्ध झालेली युवा पिढी ही देशाची खरी संपत्ती आहे. माहिती तंत्रज्ञान कृत्रिम बुद्धिमत्ता अवकाश संशोधन वैद्यकीय क्षेत्र आणि हरित तंत्रज्ञान यांसारख्या अत्याधुनिक विषयांत भारतीय तरुण आघाडीवर आहेत. इस्रोसारख्या संस्थांमध्ये रात्रंदिवस मेहनत करणारे तरुण संशोधक असोत किंवा जगभरातील बड्या तंत्रज्ञान कंपन्यांचे नेतृत्व करणारे भारतीय असोत, तरुणांच्या बुद्धिमत्तेमुळे भारताची मान जगात उंचावली आहे. शिक्षण केवळ स्वतःच्या नोकरीपुरते मर्यादित न ठेवता, त्या ज्ञानाचा उपयोग देशापुढील जटिल समस्या सोडवण्यासाठी करणे हे प्रत्येक तरुण संशोधक आणि विद्यार्थ्यांचे आद्य कर्तव्य आहे.

आर्थिक व व्यावसायिक दृष्टिकोनातून विचार केल्यास, आजच्या तरुणांच्या मानसिकतेत एक मोठा आणि सकारात्मक बदल दिसून येत आहे. आजचा तरुण केवळ 'नोकरी शोधणारा' राहिला नसून तो 'नोकरी देणारा' बनत आहे. देशात उभे राहणारे नवनवीन 'स्टार्टअप्स' हे या बदलत्या विचारसरणीचे प्रतीक आहेत. 'मेक इन इंडिया' आणि स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देत तरुण पिढी नवनवीन व्यवसायांची निर्मिती करत आहे. कृषी क्षेत्र असो वा उद्योग क्षेत्र, तंत्रज्ञानाची जोड देऊन ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यात तरुण उद्योजकांचे योगदान मोलाचे ठरत आहे. जेव्हा तरुण स्वतःच्या पायावर उभा राहतो आणि इतरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतो, तेव्हा देशाच्या अर्थव्यवस्थेला आपोआपच मोठी गती मिळते.

राष्ट्र केवळ आर्थिक किंवा भौतिक प्रगतीने महान बनत नाही, तर त्याचा सामाजिक आणि नैतिक पाया किती भक्कम आहे यावर देशाचे भवितव्य अवलंबून असते. दुर्दैवाने, आजही आपल्या समाजात अंधश्रद्धा, जातीभेद, लिंगभेद आणि भ्रष्टाचारासारख्या अनिष्ट रूढी-परंपरांचे सावट पाहायला मिळते. या सामाजिक कुरीतींना मूठमाती देण्याचे धाडस आणि क्षमता केवळ तरुणांमध्येच आहे. समाजात समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी तरुणांनी पुढाकार घेतला पाहिजे. याशिवाय, आजच्या काळात पर्यावरण संवर्धन ही अत्यंत गंभीर बाब बनली आहे. हवामान बदल, प्रदूषण आणि वाढता कचरा यांसारख्या आव्हानांचा सामना करण्यासाठी तरुणांनी सकारात्मक सहभाग नोंदवणे गरजेचे आहे. वृक्षारोपण करणे, प्लास्टिकचा वापर टाळणे, जलसंवर्धन करणे आणि हरित ऊर्जेचा वापर वाढवणे यांसारख्या मोहिमांमध्ये तरुणांचे सक्रिय योगदान हे येणाऱ्या पिढ्यांसाठी वरदान ठरणार आहे.

या सर्व योगदानासोबतच, आजच्या काळात सर्वात जास्त गरज आहे ती म्हणजे लोकशाही आणि नागरिक म्हणून कर्तव्यांची जाणीव असण्याची. स्वातंत्र्यानंतरच्या दशकांमध्ये आपण नागरिकांच्या हक्कांवर आणि अधिकारांवर खूप भर दिला, परंतु हक्क आणि कर्तव्ये या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. नागरिक जेव्हा केवळ स्वतःच्या हक्कांची मागणी करतात आणि देशाचे कायदे पाळणे, वेळेवर कर भरणे, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे या मूलभूत कर्तव्यांकडे दुर्लक्ष करतात, तेव्हा समाजात असंतुलन आणि अराजकता निर्माण होते. लोकशाही ही केवळ पाच वर्षांतून एकदा मतदान करून सरकार निवडण्यापुरती मर्यादित प्रणाली नाही, तर ती नागरिकांच्या दैनंदिन सहभागावर आणि सजगतेवर जिवंत राहणारी जीवनशैली आहे.

आजच्या बदलत्या जागतिक व सामाजिक घडामोडींमध्ये तरुणांचा सहभाग हा नकारात्मक किंवा आक्रमक मार्गाने न जाता विधायक आणि सकारात्मक मार्गानेच जायला हवा. देशाचे सार्वभौमत्व, एकता आणि अखंडता अबाधित राखणे हे प्रत्येक तरुणाचे आद्य कर्तव्य आहे. युवकांनी देशाच्या सार्वभौमत्वाला, सुरक्षेला किंवा आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेला बाधा पोहोचेल असे कोणतेही वर्तन करू नये. आजच्या डिजिटल युगात परकीय ताकदी किंवा देशविरोधी मूलतत्त्वे अनेकदा सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. भडकाऊ भाषणे, बनावट म्हणजे फेक बातम्या, जातीय वा धार्मिक विद्वेष पसरवणारा मजकूर आणि देशविरोधी अपप्रचार यांमुळे समाजातील सलोखा धोक्यात येऊ शकतो. अशा वेळी कोणत्याही अपप्रचाराला बळी न पडता, विवेकाने आणि संयमाने परिस्थिती समजून घेणे ही आजच्या तरुणाची मोठी जबाबदारी आहे. बदलत्या घडामोडींवर मते व्यक्त करताना किंवा सहभाग नोंदवताना अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा वापर संविधानाच्या मर्यादांमध्ये राहूनच केला पाहिजे.

आजच्या संवेदनशील आणि नागरिकत्व, न्याय आणि राजकारण सारख्या जटिल सामाजिक- राजकीय घडामोडींच्या वातावरणात तरुणांनी कोणत्याही आक्रमकतेपेक्षा विवेक आणि भावनेपेक्षा कर्तव्याला प्राधान्य देणे नितांत गरजेचे आहे. अशा तणावपूर्ण काळात सोशल मीडियावरील चिथावणीखोर मजकूर, अफवा किंवा राजकीय अपप्रचाराला बळी न पडता प्रत्येक माहितीची सत्यता पडताळून पाहणे आणि कोणत्याही विघातक मोहिमेचे बाहुले न बनने हे सुजाण नागरिकाचे पहिले कर्तव्य ठरते. नागरिकत्व, न्याय आणि राजकारणाच्या पार्श्वभूमीवर समोर येणाऱ्या विविध कायदेशीर आणि सामाजिक मुद्द्यांवर मत मांडताना कायदा हातात न घेता संविधानाने दिलेल्या मर्यादांमध्ये राहून, शांततापूर्ण व सनदशीर मार्गानेच आपला विचार मांडला पाहिजे. बाह्य वातावरणातील नकारात्मकतेचा स्वतःच्या भविष्यावर परिणाम होऊ न देता तरुणांनी आपली ऊर्जा शिक्षण, कौशल्यविकास, नाविन्यपूर्ण उद्योग आणि आर्थिक स्वावलंबनावर केंद्रित केली पाहिजे. शेवटी, समाजात भेद निर्माण करणाऱ्या ताकदींना दूर ठेवून अशा काळातही सामाजिक सलोखा, बंधुता आणि ऐक्य टिकवून ठेवणे हीच आजच्या युवा पिढीची राष्ट्र उभारणीतील सर्वात मोठी आणि सकारात्मक भूमिका ठरेल.

हिंसाचारापासून पूर्णपणे दूर राहणे आणि राष्ट्रध्वज, संविधान व सैन्य यांसारख्या राष्ट्रीय अस्मितेच्या घटकांचा सदैव सन्मान राखणे अत्यंत आवश्यक आहे. विरोधाच्या नावाखाली देशाचे नुकसान करणे किंवा वैयक्तिक हितसंबंधांना राष्ट्रहितापेक्षा मोठे मानणे हे सार्वभौमत्वाला छेद देणारे ठरते. विशेषतः लोकशाहीचा सर्वात मोठा स्तंभ असलेल्या मतदानाबाबत दाखवली जाणारी उदासीनता दूर होणे अत्यंत गरजेचे आहे. बदलत्या राजकीय पटलावर जात, धर्म, पैसा किंवा वैयक्तिक फायद्याच्या पलीकडे जाऊन केवळ उमेदवाराची योग्यता, विकास आणि प्रामाणिकपणा या आधारावर सुजाणपणे मतदान करणे हीच लोकशाहीला मजबूत करण्याची खरी गुरुकिल्ली आहे. विविधतेने नटलेल्या आपल्या देशात जात, धर्म आणि भाषेच्या नावावर होणारे ध्रुवीकरण रोखून संविधानाने दिलेल्या बंधुता आणि सहिष्णुता या मूल्यांचे जतन करणे ही आजच्या काळातील नितांत गरज आहे. राष्ट्रप्रेमाची व्याख्या केवळ सीमेवर जाऊन लढण्यापुरती मर्यादित नसते; तर दैनंदिन जीवनात कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे, पाण्याचा अपव्यय टाळणे, वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे आणि सार्वजनिक जागा स्वच्छ ठेवणे यांसारख्या साध्या-सोप्या गोष्टींमधूनच खऱ्या देशभक्तीची परीक्षा होत असते.

आपण भारतीय या नात्याने, एक चांगला आणि जबाबदार नागरिक बनण्याची शपथ घेऊ आणि ती पाळू...

'मी शपथ घेतो/घेते की,

मी माझ्या भारताचा एक जबाबदार, सुजाण आणि स्वाभिमानी नागरिक बनेन. मी देशाचे संविधान, कायदे आणि लोकशाही मूल्यांचा सदैव आदर करेन. मी माझ्या शिक्षणाचा आणि कौशल्यांचा उपयोग राष्ट्राच्या प्रगतीसाठी आणि समाजाच्या कल्याणासाठी करेन. मी जात, धर्म, भाषा आणि लिंग यांवर आधारित भेदभाव निर्मूलन करून समाजात बंधुता आणि शांतता टिकवून ठेवण्यासाठी कटिबद्ध राहीन. मी सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करेन, पर्यावरणाचे संवर्धन करेन आणि माज्या सभोवतालचा परिसर स्वच्छ व सुंदर ठेवेन. मी देशाच्या सार्वभौमत्वाला, एकतेला आणि अखंडतेला बाधा पोहोचेल असे कोणतेही वर्तन करणार नाही. राष्ट्राची एकता, अखंडता आणि प्रगती यासाठी मी निरंतर प्रयत्नशील राहीन.'

भारताकडे असलेली प्रचंड युवा लोकसंख्या ही देशासाठी केवळ एक आकडेवारी नसून ती राष्ट्राचे भवितव्य बदलू शकणारी अभूतपूर्व शक्ती आहे. इतिहासाच्या प्रत्येक वळणावर जेव्हा जेव्हा राष्ट्रावर संकटे आली किंवा मोठ्या परिवर्तनाची गरज निर्माण झाली, तेव्हा तरुणांनीच आपल्या शौर्याने आणि विचारांनी नवीन दिशा दाखवली आहे. स्वातंत्र्यसंग्रामात ज्या रक्ताने आणि त्यागाने भारतमातेला पारतंत्र्यातून मुक्त केले गेले, त्याच आदर्शांना आणि मूल्यांना स्मरून आजच्या तरुण पिढीने राष्ट्र उभारणीच्या महायज्ञात आपले योगदान दिले पाहिजे. १५ ऑगस्टसारखे राष्ट्रीय सण हे केवळ औपचारिक ध्वजारोहण आणि उत्सवापुरते मर्यादित न ठेवता, "देशाने मला काय दिले?" यापेक्षा "मी देशासाठी काय करू शकतो?" या विचाराचे आत्मपरीक्षण करण्याचा आणि नव्या संकल्पांची पूर्तता करण्याचा मार्ग बनले पाहिजेत.

आजचा भारत हा आर्थिक, तांत्रिक आणि सामाजिक दृष्टीने जगज्जेता बनण्याच्या उंबरठ्यावर उभा आहे. अशा ऐतिहासिक काळात तरुणांचे प्रत्येक कृत्य, त्यांचा दृष्टिकोन आणि त्यांची जीवनशैली देशाची गती निश्चित करणार आहे. तरुणांनी केवळ वैयक्तिक यश किंवा भौतिक प्रगतीमागे न धावता, आपल्या ज्ञानाची आणि ऊर्जेची जोड संविधानावरील निष्ठा, सामाजिक सलोखा आणि नागरिक म्हणून बजावायच्या कर्तव्यांशी घातली पाहिजे. जेव्हा देशातील प्रत्येक तरुण स्वतःच्या जबाबदारीची जाणीव ठेवून देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देईल, तेव्हाच भारताचे सार्वभौमत्व खऱ्या अर्थाने अक्षय राहील. तरुणांचे आजचे निष्ठावंत प्रयत्न, विधायक सहभाग आणि कठोर परिश्रम हेच उद्याच्या समृद्ध, शक्तिशाली आणि आत्मनिर्भर भारताचा भक्कम पाया रचतील.

मो. ९५६१५९४३०६

## अर्थ

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचा तिरंगा ध्वज
हळूहळू जसजसा वर जात होता...
इवलासा कुणी मुलगा आपल्या
गोड आवाजात
राष्ट्रगीत गात होता...
बाकी सारेच उपस्थित
उगाच ओठ हलवत होते
काहीतरी म्हटल्यासारखे...

न रहावून मी विचारलं एकास...
कुणी लिहिलं हो राष्ट्रगीत?
कुणी कुणी दिलं " बलिदान "...?
या देशाच्या स्वातंत्र्यासाठी
आणि कुणी त्यागलं आपलं हित?
खादीचे स्वच्छ वस्त्र घातलेल्या
त्या महाशयाने माझ्याकडे बघितले ...
जरासे हसले... जवळ येऊन बसले...
अन् म्हणाले... काय माहित!
माझ्या नसानसांतून तेव्हा
नुसती अंगार वाहून गेली
अन् ओठांतली ओळ माझ्या
ओठांतच राहून गेली...
म्हटलं हे देशभक्तांनो...!
स्वातंत्र्याच्या वेदीवर प्राणाची
आहुती देणाऱ्या
हे क्रांतिकारकांनो...!
उगाच झटले तुम्ही... उगाच लढले
बघा...! स्वातंत्र्यानंतर या देशात
काय काय घडते आहे!



विसरून गेले इथले कृतघ्न
तुमचं बलिदान... तुमचा त्याग
परकीय सत्तेबद्दलचा
तुमच्या मनातील राग
तुमची चार नावं सुद्धा यांना
आठवत नाही
त्यांच्याच हातात या देशाचे सूत्र आहे
अन् धनदांडग्यांवर यांचेच
कृपाछत्र आहे...
हे क्रांतीकारकांनो...!
तुमचा लढा... तुमचं बलिदान...
वाटतं आता जात आहे व्यर्थ
सांगा...! या स्वातंत्र्य सोहळ्याला
मग उरतो का कुठला अर्थ?

- लीलाधर दवंडे
कामठी (नागपूर)
मो. ८४१२८७७२२०

## स्वातंत्र्यदिन देशाच्या इतिहासातील एक सुवर्णक्षण आणि नव्या पर्वाची सुरुवात



सुनील शिरपुरे
यवतमाळ

१५ ऑगस्ट २०२६ रोजी भारत देशाच्या इतिहासातील एक सुवर्णक्षण अवतरला असून, संपूर्ण देश आपला ८० वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात, अभिमानात आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करत आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या २०० वर्षांच्या गुलामगिरीच्या शृंखला तोडून १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झालेल्या भारताच्या अमृतकालानंतरच्या या प्रवासाला आज ७९ वर्षे पूर्ण झाली असून देश एका नव्या समर्थ पर्वाची सुरुवात करत आहे.

१५ ऑगस्ट १९४७ हा तो सुवर्णक्षण होता, जेव्हा भारताने ब्रिटिशांच्या दीर्घकालीन गुलामगिरीतून मुक्त होत स्वातंत्र्याची पहाट अनुभवली. या दिवशी सर्व धर्म, जाती, प्रांत आणि संस्कृतींचे लोक एकत्र येऊन देशभक्तीचा उत्सव साजरा करतात. स्वातंत्र्यदिन हा केवळ आनंदाचा दिवस नसून तो आपल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या अथक संघर्ष, त्याग आणि दृढनिश्चयाची आठवण करून देणारा प्रसंग आहे. शतकानुशतके चाललेल्या बलिदानाच्या कहाण्यांमुळे हा दिवस अधिक महत्त्वाचा ठरतो. दिल्लीतील लाल किल्ल्यावर आणि महाराष्ट्रात मंत्रालयावर तसेच सर्व जिल्हा मुख्यालयांमध्ये हा राष्ट्रोत्सव मोठ्या उत्साहात पार पडत आहे. यावर्षीच्या स्वातंत्र्यदिनाची थिम 'वंदे मातरम्‌ची १५० वर्षे' आणि 'विकसित भारत २०४७ साठी युवा शक्ती' या दोन प्रमुख पैलूंवर आधारित आहे. ज्यात स्वदेशी तंत्रज्ञानातील ६जी चाचण्या, सेमीकंडक्टर मिशन आणि एआय, हरित संक्रमण मध्ये मिशन लाईफ सौर उर्जेवर चालणारी गावे, हरित हायड्रोजन मिशन आणि आत्मनिर्भर संरक्षण यावर लक्ष केंद्रित केले आहे. या संकल्पना राष्ट्रगीताला आदरांजली वाहतात आणि विज्ञान, नवोपक्रम व उद्योजकतेमधील भारतीय युवकांच्या भूमिकेवर प्रकाश टाकतील, जी २०४७ मध्ये एका विकसित भारताच्या उभारणीत योगदान देईल. तसेच पहिल्यांदाच लाल किल्ल्यात वापरली जाणारी सर्व उपकरणे स्वदेशी बनावटीची असतील.

भारताच्या स्वातंत्र्याची तारीख १५ ऑगस्ट, १९४७ आहे. या दिवशी भारतातील सुमारे २०० वर्षांच्या ब्रिटिश वसाहतवादी राजवटीचा अंत झाला आणि एका सार्वभौम राष्ट्राचा जन्म झाला, म्हणून हा दिवस साजरा केला जातो. भारताला स्वातंत्र्य मिळवण्याची प्रक्रिया प्रदीर्घ स्वातंत्र्यलढ्यातून साध्य झाली. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींनी इंग्रजांना 'चले जाव' चा नारा दिला. महात्मा गांधींच्या या ना-याने देशभर ब्रिटिशांविरोधात तीव्र संतापाची लाट निर्माण झाली. सर्वत्र क्रांतीच्या मशाली पेटून उठल्या. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली जनतेने यात सहभाग घेतला.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढलेल्या अनेक स्वातंत्र्यसैनिकांच्या शौयार्चा आणि त्यागाचा हा दिवस गौरव करतो. हा दिवस भारतीय संविधानात समाविष्ट असलेल्या लोकशाही, एकता, समानता आणि स्व-शासन या मूल्यांचे प्रतिनिधित्व करतो. वाढत्या जातीय संघर्षांमुळे भारताला स्वतःकडे ठेवणे अशक्य झाल्याने, ब्रिटिश सरकारने १९४७ मध्ये माउंटबॅटनची फाळणी केली. ब्रिटिश संसदेने भारतीय स्वातंत्र्य कायदा १९४७ लागू केला, ज्यानुसार भारत आणि पाकिस्तान ही दोन स्वतंत्र अधिराज्ये निर्माण झालीत. १४ आणि १५ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री सत्तांतर झाले. ८० वा स्वातंत्र्यदिन नवरोज म्हणजेच पारशी नववर्ष या सणासोबतच येत असल्याने, विशेषतः महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये अभूतपूर्व सांस्कृतिक उत्सव साजरा होताना दिसतो. डिजिटल इंडिया भाषानी पंतप्रधानांच्या भाषणाचे २२ हून अधिक भारतीय भाषांमध्ये रिअल-टाइममध्ये एआय आधारित अनुवाद अर्थात भाषांतर करेल, जेणेकरून प्रत्येक भारतीयाला 'विकसित भारत २०४७' ची संकल्पना आपल्या मातृभाषेत समजेल.

या स्वातंत्र्य सप्ताह २०२६ मध्ये युवा नेते संवाद देखील आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये जनरेशन-झेड आणि तरुण उद्योजक कृषी, फिटनेस आणि स्टार्टअप्ससाठीचे उपाय थेट राष्ट्रीय नेत्यांसमोर सादर करतील आणि स्वातंत्र्य दिन २०२६ हा देशाच्या युवकांचा आहे यावर जोर देतील.

- ७४९८८८५०६१

# वंदे भारत

15 ऑगस्ट
स्वातंत्र्य दिन

Epaper : epaper.sinhvani.com

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com

सर्व देशवासियांना
हार्दिक शुभेच्छा!

दैनिक सिंहवाणी वृत्त


# स्वातंत्र्य न मिळताही फडकवला, फडकताना बघितला तिरंगा!



विनोद देशमुख
नागपूर

१४-१५ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री भारताला स्वातंत्र्य मिळालं म्हणून देशभर जागोजागी तिरंगा झेंडा फडकवला जाणं स्वाभाविक होतं. परंतु, निझाम स्टेट मात्र तेव्हा भारतात विलीन झालं नसल्यानं या भागात तिरंगा झेंडावंदन होण्याचं तसं कारण नव्हतं. तरीही राजुरा (आता जिल्हा चंद्रपूर) येथे असा प्रसंग घडला आणि हे धाडसाचं काम केलं एका २५ वर्षीय युवकानं. या युवकाचं नाव होतं- शंकर सीतारामराव देशमुख. गावाच्या बाजारातील गांधी चौकात आपल्या काही सहकाऱ्यांसह येऊन त्यानं गांधीभवनावर मध्यरात्री तिरंगा झेंडा फडकवला आणि अंधाराचा फायदा घेत हे सर्व युवक पसारही झाले.

या घटनेनं निझामांच्या अधिकाऱ्यांचा जळफळाट झाला. नंतर शंकर आणि साथीदार रझाकारांमुळे पकडले गेले आणि आताच्या तेलंगणातील आसिफाबादच्या तुरुंगात काही काळ कैदेत राहिले. पुढे १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद स्टेटमधील तेलंगणा आणि मराठवाड्यासह राजुराही स्वतंत्र झाला त्यादिवशी येथे स्वातंत्र्यदिन धडाक्यात साजरा झाला आणि सध्याही होत असतो. त्याअर्थानं आजचा स्वातंत्र्यदिन या भागात फक्त उपचार तेवढा आहे.

वकिली शिकण्यासाठी हैदराबादला गेलेले हे शंकरराव देशमुख तेव्हापासूनच मुक्ती संग्रामाच्या कारवायांमध्ये सहभागी झाले होते. मुक्ती संग्रामाचे नेते स्वामी रामानंद तीर्थ यांचे शिष्य माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव आणि माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण हे दोन दिग्गज काँग्रेसनेते त्यांचे सहाध्यायी होते आणि निझामाविरुद्धच्या लढ्यातही एकत्र होते. ही मैत्री दीर्घकाळ टिकली. ऐन आणिबाणीत मुख्यमंत्री झालेल्या चव्हाणांनी १९७६ मध्ये विधान परिषदेत नामनियुक्त सदस्य म्हणून शंकररावांना आमदार बनविलं. वास्तविक शंकरराव सलग २३ वर्षे राजुरा नगर परिषदेचे अध्यक्ष होते आणि त्यांनी गावाचा विकासही भरपूर केला. परंतु काँग्रेसच्या राजकारणात त्यांना पुढे वाव मिळत नव्हता. तो अन्याय चव्हाणांनी दूर केला. १८ सप्टेम्बर १९९२ रोजी शंकररावांचं निधन झालं तेव्हा पंतप्रधान असलेले पी. व्ही. नरसिंहराव यांनी दूरध्वनीवरून देशमुख कुटुंबाचं सांत्वन केलं होतं.

## राजुऱ्याचे विकास पुरुष

नगराध्यक्ष आणि विधान परिषदेचे आमदार या दोन्ही पदांचा वापर शंकररावांनी राजुरा आणि परिसराचा विकास करण्यासाठीच केला. त्याअर्थानं त्यांना राजुऱ्याचे 'विकास पुरुष' म्हणणं चुकीचं ठरणार नाही. नवं जिल्हा मुख्यालय चंद्रपूर आणि महाराष्ट्र यांच्याशी राजुऱ्याचा संपर्क फक्त रेल्वेनंच होता. लगतच्या वर्धा/पैनगंगा नदीवर पूलच नव्हता. नगराध्यक्ष होताच तेव्हाचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, नंतरचे मारोतराव कन्नमवार यांच्याकडे सतत पाठपुरावा करून शंकररावांनीच नदीवरील पूल मार्गी लावला आणि जनतेची मोठी सोय केली. पूर्वीच्या निझाम स्टेटचा हा भाग या पुलामुळेच महाराष्ट्राशी थेट जोडला गेला. नंतरच्या काळात गावाच्या विकासाकडे प्राधान्यानं लक्ष देऊन रस्ते, नाल्या, दिवाबत्ती, लेआऊट या व्यवस्थाही त्यांनीच बसवल्या आणि राजुरा नगरीला एक आकार आणला. यात स्वतःचं खाजगी योगदानही त्यांनी दिलं. १९५९ च्या महापुराच्या काळात अनेकांची घरं उध्वस्त झाली. त्यातील बहुतांश लोकांना आजच्या सोमनाथपूर भागातील स्वतःची जमीन मोफत देऊन ही नवीन वस्ती निर्माण करण्याचं औदार्य त्यांनी दाखवलं.

निझामाविरुद्ध काँग्रेसचं आंदोलन असो की स्वातंत्र्यानंतरची आचार्य विनोबा भावे यांची भूदान चळवळ असो, प्रत्येक कामात स्वतः आघाडीवर राहून स्थानिक जनतेची काळजी घेणारे शंकरराव हे अनोखे लोकनेता होते. मराठी, हिंदी, इंग्लिश, उर्दू, तेलुगू आणि गोंडी अशा सहा भाषांवर त्यांचं प्रभुत्व होतं. गोंडी भाषेत जाहीर भाषण करू शकणारे ते एकमेव नेते होते. त्यांच्या धाडसामुळेच भारतीय स्वातंत्र्याचा तिरंगा झेंडा निझामशासित राजुरा येथे फडकू शकला, याची आज ७९ व्या स्वातंत्र्यदिनी प्रकर्षानं आठवण होते.



स्व. ॲड. शंकरराव देशमुख

## हैदराबादचे बंधू नागपुरात

योगायोग पाहा. शंकरराव राजुऱ्यात भारताचा तिरंगा फडकवत होते, त्याचवेळी त्यांचे हैदराबादनिवासी चुलत बंधू नारायण जयरामराव देशमुख हे नागपुरात सीताबर्डी किल्ल्यावर तिरंगा फडकवला जात असताना पाहत होते! हे कर्नल डॉ. नारायण देशमुख गेली ५७ वर्षे अमेरिकेत राहत आहेत आणि ४ अपत्यांसह त्यांचं संपूर्ण कुटुंबच आज अमेरिकन नागरिक आहे. त्यांचे सुपुत्र डॉ. दीपक हेही वडिलांसारखेच कर्नल आणि सर्जन आहेत.



डॉ. नारायण देशमुख

नारायण यांचे वडील आणि शंकररावांचे काका जयरामराव हैदराबादला ख्यातनाम वकील होते. परंतु, निझामाचे अत्याचार वाढले तेव्हा १९४५-४६ दरम्यान ते कुटुंबासह विदर्भात आले आणि आधी चंद्रपूरला अन् मग नागपूरला राहू लागले. त्यामुळे १४ ऑगस्ट १९४७ च्या रात्री नागपुरातील स्वातंत्र्याचा उत्साह मित्रांसोबत अनुभवण्याची संधी नारायण यांना मिळाली. "बर्डी किल्ल्यावर फडकणारा इंग्रजांचा युनियन जॅक खाली उतरताना आणि भारताचा तिरंगा वर चढून फडकताना मी मध्यरात्री पाहिला. नंतर मिठाईही खाल्ली", अशी आठवण डॉ. नारायण आज वयाच्या ८९ व्या वर्षीही उत्साहानं आणि आनंदानं सांगतात.

निझाम स्टेटच्या पारतंत्र्यात जगलेल्या दोन भावांना १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र भारताचा तिरंगा फडकताना पाहता आला, हे विलक्षणच नाही का.

मो. ९८५०५८७६२२

## 'कहानी वंदे मातरम् की' नृत्य नाटिकेतून स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास उलगडणार

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताला यावर्षी १५० वर्षे पूर्ण होत आहेत. या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर राधिका क्रिएशन्स प्रस्तुत व ताराराणी फाउंडेशन निर्मित 'कहानी वंदे मातरम् की' ही दीड तासांची भव्य नृत्य नाटिका स्वातंत्र्यदिनाच्या औचित्याने १५ ऑगस्ट रोजी सादर करण्यात येणार आहे. कविवर्य सुरेशभट सभागृह, रेशीमबाग येथे सायंकाळी ७ वाजता नागपूर महानगरपालिकेच्या सौजन्याने हा कार्यक्रम होणार असल्याची माहिती दिग्दर्शक संजय पेंडसे यांनी पत्रकार परिषदेत दिली. 'कहानी वंदे मातरम् की' या नृत्य नाटिकेत नृत्य, नाट्य आणि स्क्रीन या तिन्ही माध्यमांचा प्रभावी संगम करण्यात आला आहे. वंदे मातरम् या गीताची निर्मिती, त्याचा स्वातंत्र्यलढ्यातील प्रवास आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांची गाथा या माध्यमातून साकारण्यात येणार आहे. आजच्या तरुण पिढीला वंदे मातरम् म्हणजे काय, त्याचा इतिहास काय आहे आणि स्वातंत्र्यलढ्यात या गीताने निर्माण केलेली राष्ट्रभावना किती प्रभावी होती, याची माहिती मनोरंजक व प्रभावी पद्धतीने या नाटिकेतून दिली जाणार आहे. स्वातंत्र्यसैनिकांनी देशासाठी केलेला त्याग, संघर्ष आणि बलिदान यांचे दर्शन नृत्य, अभिनय व दृक्श्राव्य माध्यमातून घडविले जाणार आहे. या कार्यक्रमाचे लेखन श्रीधर गाडगे, दिग्दर्शन संजय पेंडसे यांचे असून रवींद्र भुसारी यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

नाटिकेत सारिका पेंडसे, प्रवीण पारधी, रवींद्र भुसारी, शशांक गाडगे, अभिनव नखाते, शैलेश भलमे, मेघश्याम बडकेस, हेमंत जिचकार, रसिका रिसालदार, मुकुल ब्रह्मापुरकर, विकास वडदेवार, छकुली जाधव यांच्यासह अनेक कलाकार सहभागी होणार आहेत. नृत्यकलावंत देहली तेलंग, सानिका मुंडले, अपूर्वा दसरे, रश्मी श्रीवास, यशश्री मोरे आदी कलाकार नृत्य सादर करणार आहेत. नृत्यदिग्दर्शक अंतरा देशपांडे, वैदेही तेलंग, नेपथ्य हेमंत जिचकार, संगीत प्रशांत फासे, प्राची सखदेव, ध्वनी संयोजन सुनील ऑडिओ एँड, व्हिडिओ ग्राफी शैलेश भलमे व विलास चाफके यांचे सहकार्य लाभले आहे. निर्मिती सहाय्य नीलिमा बावणे, मिनल मुंडले, ज्ञानबंधू शुक्ला, डॉ. सर्वेश कुमार वर्मा, बालकृष्ण भरतीया यांचे असून विशेष सहाय्य व मार्गदर्शन डॉ. पंकज चांदे, प्रकाश पाठक धुळे, रमण सेनाड, अनुजा परचुरे यांचे लाभले आहे. या नाटिकेचे शुभारंभाचे प्रयोग १५ ऑगस्ट रोजी नागपूर, १७ ऑगस्ट रोजी पुणे, २० व २४ ऑगस्ट रोजी भंडारा, २५ ऑगस्ट रोजी अमरावती आणि अकोला येथे होणार असल्याची माहिती देण्यात आली. नागपूरमधील १५ ऑगस्टचा प्रयोग व त्यानंतरचे सर्व शुभारंभाचे प्रयोग रसिकांसाठी निःशुल्क ठेवण्यात आले आहेत.

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने नव्या पिढीला राष्ट्रभक्ती, स्वातंत्र्यलढा आणि वंदे मातरम्च्या ऐतिहासिक महत्त्वाची प्रेरणा मिळावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे संजय पेंडसे यांनी सांगितले. नागपूरकर रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या नृत्य नाटिकेला प्रतिसाद द्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# स्वातंत्र्य दिन चिरायू हो...!



सचिन चव्हाण
रामटेक, जि.नागपूर

१५ ऑगस्ट... आपल्या भारताच्या इतिहासातील एक अत्यंत अभिमानाचा, भावस्पर्शी आणि प्रेरणादायी दिवस! हा दिवस केवळ दिनदर्शिकेतील एक तारीख नाही; तो आपल्या स्वातंत्र्याचा, आपल्या अस्मितेचा आणि आपल्या पूर्वजांच्या त्यागाचा जिवंत स्मारक आहे. या दिवशी आपण तिरंगा अभिमानाने फडकवतो, राष्ट्रगीत गातो आणि 'जय हिंद'च्या घोषणांनी वातावरण दुमदुमून टाकतो. पण या उत्सवाच्या आनंदासोबत आपल्या मनात एक प्रश्नही उमटला पाहिजे, ज्यांनी आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले, त्यांच्या स्वप्नातील भारत आपण घडवत आहोत का?

शेकडो क्रांतिकारक, समाजसुधारक, शेतकरी, कामगार, विद्यार्थी आणि असंख्य सामान्य नागरिकांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. अनेकांनी सुखाचा त्याग केला, अनेकांनी तुरुंगवास सहन केला आणि अनेकांनी आपल्या मातृभूमीसाठी आयुष्य समर्पित केले. त्यांच्या त्यागामुळे आज आपण स्वतंत्र भारतात श्वास घेत आहोत. आपल्याला आपले मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे, शिक्षण घेण्याचा अधिकार आहे, आपल्या आवडीचे क्षेत्र निवडण्याची संधी आहे आणि लोकशाही व्यवस्थेत आपला सहभाग नोंदवता येतो. ही स्वातंत्र्याची अमूल्य देणगी आहे. पण स्वातंत्र्याचा खरा अर्थ केवळ परकीय सत्तेपासून मुक्त होणे एवढाच नाही. स्वातंत्र्य म्हणजे जबाबदारीसुद्धा! म्हणूनच आज प्रत्येक भारतीयाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे, 'मी माझ्या देशासाठी काय करत आहे?'

देशभक्ती म्हणजे केवळ तिरंगा हातात घेणे नाही. सोशल मीडियावर 'जय हिंद' लिहिणे किंवा स्वातंत्र्यदिनी देशभक्तीपर गाणी ऐकणे एवढीच देशभक्ती नाही. ही भावना आपल्या रोजच्या कृतीत उतरली पाहिजे. आपण प्रामाणिकपणे आपले काम करतो का? सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखतो का? वाहतुकीचे नियम पाळतो का? सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करतो का? पर्यावरणाची काळजी घेतो का? गरजू व्यक्तीला मदतीचा हात देतो का? इतरांच्या हक्कांचा आणि मतांचा आदर करतो का? या प्रत्येक प्रश्नाचे उत्तरच आपल्या देशभक्तीचे खरे मोजमाप आहे.

आपल्या देशासमोर आज अनेक आव्हाने आहेत. भ्रष्टाचार, अज्ञान, असहिष्णुता, जातीय भेदभाव, स्त्रीद्वेष, पर्यावरणाची हानी, अस्वच्छता आणि सामाजिक विषमता यांसारख्या समस्या देशाच्या प्रगतीच्या मार्गातील अडथळे आहेत. देशाचे रक्षण केवळ सीमेवर उभे राहून होत नाही. समाजातील या समस्यांविरुद्ध लढणे हेदेखील देशसेवाच आहे. जेव्हा एखादा नागरिक भ्रष्टाचाराला नकार देतो, जेव्हा एखादा विद्यार्थी मन लावून शिक्षण घेतो, जेव्हा एखादा शिक्षक विद्यार्थ्याला चांगला नागरिक बनवतो, जेव्हा एखादा शेतकरी प्रामाणिकपणे अन्न पिकवतो, तेव्हाही देशसेवाच घडत असते.

आजचा तरुण हा भारताच्या भविष्याचा सर्वात महत्त्वाचा आधार आहे. तरुणांच्या हातात देशाचे उद्याचे भविष्य आहे. शिक्षण म्हणजे केवळ चांगली नोकरी मिळवण्याचे साधन नाही; शिक्षण म्हणजे विचार करण्याची क्षमता, योग्य-अयोग्य ओळखण्याची बुद्धी आणि समाजासाठी काहीतरी करण्याची जाणीव. डॉक्टर, अभियंता, शिक्षक, शास्त्रज्ञ, सैनिक, प्रशासक, शेतकरी, उद्योजक किंवा कलाकार कोणतेही क्षेत्र निवडा; आपल्या कार्यातून देशाच्या विकासाला हातभार लावता येतो.

आपल्याला चांगले रस्ते, शुद्ध पाणी, दर्जेदार शिक्षण आणि उत्तम आरोग्यसेवा हवी आहे. या सुविधा निर्माण करण्याची जबाबदारी सरकारची आहेच; परंतु नागरिक म्हणून आपली जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. आपण सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड करणार नाही, कचरा कुठेही फेकणार नाही, पाणी वाया घालवणार नाही, झाडांचे संरक्षण करू आणि आपल्या परिसराची स्वच्छता राख,अशा छोट्या कृतींमधून मोठा बदल घडतो. आपल्या महान व्यक्तिमत्त्वांनी आपल्याला केवळ स्वातंत्र्याचा इतिहास दिला नाही, तर देश घडवण्याचे विचारही दिले. महात्मा गांधींनी सत्य, अहिंसा आणि शांततामय संघर्षाचा मार्ग दाखवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून समानता, स्वातंत्र्य आणि सामाजिक न्यायाचा मजबूत पाया घातला. भगतसिंगांनी आपल्या धैर्याने आणि त्यागाने तरुणांच्या मनात राष्ट्रप्रेमाची ज्योत पेटवली. या महान व्यक्तींचे स्मरण केवळ त्यांच्या जयंती किंवा पुण्यतिथीलाच नको; त्यांच्या विचारांचे पालन आपल्या जीवनात झाले पाहिजे. आजच्या काळात सोशल मीडियामुळे देशभक्ती व्यक्त करणे खूप सोपे झाले आहे. एका पोस्टमधून, एका स्टेटसद्वारे किंवा एका संदेशातून आपण देशप्रेम व्यक्त करू शकतो. पण खरी कसोटी त्या पोस्टनंतर सुरू होते. आपण प्रत्यक्ष जीवनात काय करतो, हे अधिक महत्त्वाचे आहे. देशभक्ती दाखवायची नसते; ती जगायची असते.

लोकशाही ही आपल्या स्वातंत्र्याची मोठी देणगी आहे. आपल्याला मतदानाचा अधिकार मिळाला आहे. परंतु मतदान हा केवळ अधिकार नसून जबाबदारीही आहे. योग्य माहिती घेऊन विचारपूर्वक निर्णय घेणे, कायद्याचा आदर करणे, चुकीच्या गोष्टींविरुद्ध आवाज उठवणे आणि विविधतेचा सन्मान करणे ही आधुनिक देशभक्तीचीच रूपे आहेत.

आपला भारत विविधतेने नटलेला देश आहे. अनेक भाषा, धर्म, संस्कृती, परंपरा आणि विचारधारा असूनही आपण एक राष्ट्र म्हणून एकत्र उभे आहोत. म्हणूनच 'एकता हीच आपली शक्ती' हे आपण कधीही विसरता कामा नये. आपल्यापेक्षा वेगळा विचार करणाऱ्या व्यक्तीचा द्वेष न करता तिच्या मताचा आदर करणे, जात-धर्म-भाषेच्या आधारावर भेदभाव न करणे आणि प्रत्येक नागरिकाला समान सन्मान देणे हीच खरी राष्ट्रनिष्ठा आहे.



या स्वातंत्र्यदिनी आपण स्वतःशी एक छोटासा पण अर्थपूर्ण संकल्प करूया. आपण आपल्या पालकांचा आणि ज्येष्ठांचा सन्मान करू. गरजू व्यक्तीला शक्य ती मदत करू. पर्यावरणाचे रक्षण करू. पाणी आणि वीज वाया घालवणार नाही. सार्वजनिक मालमत्तेची काळजी घेऊ. आपल्या कामात प्रामाणिक राहू. खोटेपणा, अन्याय आणि चुकीच्या गोष्टींना समर्थन देणार नाही. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आपल्या कृतीमुळे आपल्या देशाचा अभिमान वाढेल, अशीच प्रत्येक कृती करण्याचा प्रयत्न करू.

आज तिरंगा आकाशात डौलाने फडकताना आपण त्याच्याकडे अभिमानाने पाहूया. पण त्या तिरंग्यामागे असलेल्या असंख्य बलिदानांची आठवणही ठेवूया. त्याचा भगवा रंग आपल्याला त्याग आणि धैर्याची प्रेरणा देवो; पांढरा रंग सत्य, शांतता आणि प्रामाणिकपणाची आठवण करून देवो; हिरवा रंग प्रगती, समृद्धी आणि निसर्गसंवर्धनाची प्रेरणा देवो; आणि अशोकचक्र आपल्याला सतत पुढे जाण्याची शिकवण देवो. स्वातंत्र्य आपल्याला सहज मिळालेले नाही. ते अनेकांच्या संघर्षातून आणि त्यागातून मिळाले आहे. म्हणून या स्वातंत्र्याचे रक्षण करणे आणि त्याला योग्य दिशा देणे ही आजच्या पिढीची जबाबदारी आहे. चला, या स्वातंत्र्यदिनी आपण केवळ उत्सव साजरा करू नये; तर स्वतःमध्ये एक सकारात्मक बदल घडवूया. आपल्या घरापासून, आपल्या शाळेपासून, आपल्या गावापासून आणि आपल्या समाजापासून देश घडवण्याची सुरुवात करूया.

तिरंग्याला वंदन करताना केवळ हात कपाळापर्यंत जाऊ नयेत, तर मनही देशाप्रती नतमस्तक झाले पाहिजे. देशासाठी काहीतरी मोठे करण्याची वाट पाहू नका. आपल्या हातातील छोटेसे चांगले कामही राष्ट्रनिर्मितीची एक वीट असते. लाखो नागरिकांनी अशा छोट्या-छोट्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडल्या, तर भारत अधिक स्वच्छ, सुंदर, सक्षम, समृद्ध आणि न्याय्य बनेल.

म्हणूनच या स्वातंत्र्यदिनी आपण एकच संकल्प करूया, 'मी माझ्या देशाचा जबाबदार नागरिक बनेन. माझ्या कृतीने देशाचा सन्मान वाढवेन. सत्य, प्रामाणिकपणा, समानता, बंधुभाव आणि कर्तव्य या मूल्यांवर माझे जीवन उभे करेन. हीच आपल्या स्वातंत्र्यसैनिकांना खरी आदरांजली ठरेल.

स्वातंत्र्य दिन चिरायू हो!
भारत माता की जय!
जय हिंद!
वंदे मातरम्!

- ९१५८३९३२६०

15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिन
वंदे भारत
Epaper : epaper.sinhvani.com
दैनिक सिंहवाणी वृत्त
Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
सर्व देशवासियांना हार्दिक शुभेच्छा!

# स्वातंत्र्योत्तर भारताच्या प्रगतीतील वाटा, वळणे व आव्हाने



गणेश पांडे
जि. नागपूर

१५ ऑगस्ट १९४७ ला आपला भारत देश स्वतंत्र होऊन आता ७९ वर्ष झालीत . ब्रिटीशांच्या परदास्यातून मुक्त झाल्यापासून सांसदीय लोकशाहीचा अंगिकार करणाऱ्या, स्वातंत्र्योत्तर काळातील भारताच्या या वाटचालीचे अनेक टप्पे राहिले आहेत. स्वातंत्र्य प्राप्त झालेला भारत विस्कळीत, गुलामीने पिचलेला, गरीबीने ग्रासलेला, गरीब-श्रीमंतां मधील दरीने दुभंगलेला, जाती-धर्माच्या घट्ट पाशात जखडलेला, उच्च नीचतेने पोखरलेला, ज्ञानापासून वंचित राहिलेल्या, अज्ञानात खितपत पडलेल्या व अवार्चीन वैज्ञानिक दृष्टीकोनापासुन अनभिज्ञ, प्राचीन पुराणमतवादी जाचक रूढी व परंपरा रूजलेल्या समाज व्यवस्थेला जोपासणारा, दिशाहीन भरकटलेला भारत होता. अशा या दिडशे वर्ष परकीय सत्तेचे जू आपल्या मानेवर वाहून सर्व बाजूंनी व सर्व प्रकारच्या समस्या व आव्हानांनी घेरलेल्या शोषित, पिडीत भारताला एका सुत्रात बांधून पुन्हा एक स्वतंत्र, लोकशाही वादी व स्वाभिमानी राष्ट्र म्हणून, घडविण्याचे व जगात आपली वेगळी ओळख निर्माण करण्याचे महत्व कठीण उद्दिष्ट व कार्य त्यावेळच्या देशाच्या कर्णधारांपुढे होते व त्या दिशेने त्यांनी दुरदृष्टीने व योजनाबद्ध पद्धतीने आणि प्रयत्नपूर्वक कार्य करीत नव्या भारताची मजबूत पायाभरणी केली व एक महत्वाचा टप्पा गाठला.

ज्यात प्रामुख्याने पायाभूत सुविधा, देशभर शिक्षणाचे जाळे विणणे, आय आय टी, आय आय एम.सारख्या उच्च शिक्षण संस्था उभारून देशाला लागणारे शिक्षित मनुष्यबळ तयार करणे, देशभरात, गावा गावात वैद्यकीय सुविधा उपलब्ध देणे व एम्स सारख्या सर्व सोयींनी युक्त वैद्यकीय संस्था निर्माण करणे, देशाच्या प्रगतीचे खऱ्या अर्थाने द्योतक व वाहक असलेल्या रस्ते व रेल्वेचे जाळे विणणे, देशात शास्त्रीय आणि औद्योगिक संशोधनावर आधारित औद्योगिकीकरण, सरंक्षण, अणुसंशोधन / अंतराळ संशोधन क्षेत्रात भरीव कामगिरी करीत इस्त्रो सारख्या संस्था स्थापन करणे, विमान निर्मिती, जहाज बांधणी, शस्त्रास्त्र निर्मिती कारखाने, औष्णिक विद्युत निर्मिती, जल विद्युत निर्मिती, अणुऊर्जा निर्मिती प्रकल्पांची उभारणी करणे, मोठमोठी धरणे बांधणे व



शेतीशी निगडित संशोधन, रासायनिक खतांचा वापर करून एकरी उत्पादन वाढवणे, सरकार व सहकार यांचा मेळ साधत, जवळपास प्रत्येक महत्वाच्या क्षेत्रात सार्वजनिक मालकीचे उपक्रम राबवुन अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी ठेवणे या बाबींचा अंतर्भाव होता.

स्वातंत्र्योत्तर काळातील देशाच्या वाटचालीचा पुढचा टप्पा म्हणजे ज्ञान, विज्ञान व अद्ययावत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नवी क्रांती घडवून सर्वच क्षेत्रांत स्वयंपूर्णता गाठून जगात एक शक्तिशाली राष्ट्र म्हणून प्रस्थापित करणे व आपला दबदबा निर्माण करणे, ज्यात आपल्या देशाने मागील शतका अखेरीस व चालू शतकातील पुर्वार्धात उल्लेखनीय कामगिरी करीत व प्रगतीची नवनवी उंची गाठत व वैश्विक राजकारणातील तथाकथित कोणत्याही बड्या देशांच्या वा महाशक्तींच्या वळचणीला न जाता वा दबावाला बळी न पडता आपले स्वतःचे अलिप्तता धोरण कायम ठेवून आपला हा आलेख सतत उंचावत ठेवलेला आहे व जगात आपले स्वतंत्र अस्तित्व, ओळख व स्थान निर्माण केले आहे.

देशाच्या वाटचालीचा पुढचा टप्पा म्हणजे आज आपल्याला अनुभवास येणारे वर्तमान व वास्तव. जसा जसा काळ पुढे जात राहतो तशी तशी परीस्थिती सुद्धा बदलत असते व बदलत्या परिस्थितीनुसार काही समस्या उद्भवतात व नवी आव्हाने उभी टाकतात, आणि त्याच धर्तीवर आज आपल्या देशात सुद्धा नव्या समस्या भेडसावत आहेत,ज्यात वेगाने वाढत जाणारी लोकसंख्या हा मुळ व महत्त्वाचा घटक आहे. कारण आपले क्षेत्रफळ मर्यादित आहे, व त्यामुळे भूभागाच्या वापरावर मयार्दा आहेत आणि त्यामुळे संसाधनांवर सुद्धा मर्यादा येतात. वाढत्या लोकसंख्येमुळे अन्न धान्य,आर्थिक व वापरात असलेली सर्वच उपलब्ध संसाधने अपुरी पडत असतात व त्यांच्या उत्पादतेत वा वाढीस मर्यादित भुभागाच्या सीमा असल्याने आलेल्या मागणी व पुरवठा यांच्यातील तफावतीमुळे देशाला वाढत्या महागाईचा, वाढत्या बेकारीचा व बेरोजगारीचा भस्मासुर भेडसावतो आहे, त्यामुळे पुन्हा आर्थिक विषमता वाढत आहे व गरीब व श्रीमंत हि दरी रुंदावत आहे. शिक्षणाच्या बाबतीत सुद्धा याचे परिणाम दिसून येत आहेत, दर्जेदार शिक्षण घेणे महाग होत आहे त्यामुळे शिक्षितांच्या तुलनेने, अर्धशिक्षित व निरक्षरांचे प्रमाण वाढतांना जाणवत आहे व नोकरी धंद्यात अगदी अलीकडेच आलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरामुळे आधीच कमी असलेल्या नोकऱ्यांवर कुठाराघात झालेला आहे व यांचा एकत्रित परिणाम म्हणजे तरुणांमध्ये नैराश्य वाढून व्यसनाधीनता, गुन्हेगारी व हिंसक प्रवृत्ती बळावण्याचा महाराक्षस उभा ठाकला आहे व ज्याची चाहुल व झळ आजच आपल्याला जाणवत असल्याचा अनुभव घेत आहोत व उद्याची देशाचे भविष्य असलेली परंतु आजच वाट हरवलेली तरुण पिढी निर्माण होण्याचा अत्यंत गंभीर व प्रत्येक सुजाण भारतीयाला चिंताग्रस्त करणारा प्रश्न निर्माण होण्याचा धोका आज आपली भयप्रद चाहूल देतो आहे आणि जो पर्यायाने देशाच्या भविष्याविषयी अनिश्चिततेचे संकेत देणारा आहे.

म्हणूनच आज प्रत्येक भारतीयाने, आपल्या परीने मनन, चिंतन करून आणि वर्तन व आचरण ठेवून मागचे पुढचे व भविष्यातील धोके ओळखून देशाप्रती प्रामाणिकपणे व प्रयत्नपुर्वक आपल्या जबाबदारीचे व कर्तव्याचे व निर्वहण करणे हिच भारताचे सुजाण व कर्तव्यदक्ष नागरीक म्हणून प्रत्येकाचे नैतिक कर्तव्य आहे व हेच आज आज आपले आपल्या भारत देशाप्रती खरे समर्पण आहे व हाच आपल्या तिरंग्याचा गौरव व सन्मान आहे. जय हिंद

- ९५०३३५०५७४

# स्वतंत्र पुर्वकाळात युवा लढला स्वातंत्र्यासाठी, आता जेन-झी लढतेय हक्कासाठी!



रमेश लांजेवार
नागपूर

देशात जेन-झी आपल्या हक्कांसाठी लढत आहे आणि सरकार व पक्ष-विपक्ष स्वाथार्साठी राजकारण करीत आहे. आता युवा पिढी कोणतेही राजकारण खपवून घेणाच्या तयारीत नाही.कारण त्यांची सहनशीलता संपली असून आरपारच्या लढाईत असल्याचे दिसून येते.जेन-झीवर होत असलेला अन्याय फक्त जंतरमंतर किंवा नीट किंवा झारखंड पुरता सिमीत रहाला नसून हा संपूर्ण देशभरातील जेन-झीवर होत असलेल्या अन्यायाविरूद्धचा मोठा लढा आहे. याची जाणीव सरकारने, पक्ष-विपक्षांनी व राजकारण्यांनी ठेवली पाहिजे. देशातील प्रत्येक राज्यात कोणत्या-ना- कोणत्या विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला दिसुन येतो याचे जिवंत उदाहरण देशाच्या १४५ कोटी जनतेच्या डोळ्यांपुढे आहे. त्यामुळे सर्वच राज्यातील भ्रष्ट नितीचा उलगडा करण्यासाठी प्रत्येक राज्यामध्ये तुकाराम मुंढे सारखे कर्तव्यनिष्ठ प्रशासकीय अधिकारी (मुख्य सचिवपदी) असने आवश्यक आहे आणि याचे स्वागत सर्वच स्तरातून होईल.

कारण शिक्षण, आरोग्य, खानपान, महागाई, रोजगार या संपूर्ण ठिकाणी भ्रष्टाचाराची किड लागली आहे.या भ्रष्ट नितीचा नायनाट करण्यासाठी जेन-झीचा उदय झाला. आज जेन-झी जंतरमंतर पासून तर झारखंड पर्यंत आणि झारखंड पासून संपूर्ण देशात जेन-झी आपल्या हक्कांसाठी संपूर्ण शक्तीनिशी संघर्ष करीत आहेत. जंतरमंतरवर नीट पेपर फुटीसाठी आंदोलन झाले;तर झारखंडमध्ये ढासळती शिक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी आंदोलन सुरू आहे. परंतु यात सर्व विद्यार्थांचा एक उद्देश आहे की, राज्यासह देशातील शिक्षण व्यवस्था पारदर्शक, स्वच्छ आणि सुरक्षित रहाली पाहिजे व विद्यार्थ्यांच्या परीश्रमाला आणि मेहनतीला यश यावे हाच उद्देश देशातील युवा पिढीचा आहे त्यासाठीच राज्यात किंवा देशात युवा पिढी आंदोलन करतांना दिसतात. आपण पहाले की, जंतरमंतरवर विद्यार्थ्यांचे तब्बल ३५ दिवस आंदोलन चालले यात सोनम वांगचूक यांनी २० दिवस उपोषण सुध्दा केले यानंतर विद्यार्थ्यांच्या आग्रहाखातर त्यांनी उपोषण मागे घेतले.



आंदोलनादरम्यान लाठीचार्ज, पायलट गनचा वापर, बिहारमध्ये एके-४७ चा वापर अशा प्रकारे बळाचा वापर करण्यात आला व शेवटी धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला व ३६ व्या दिवशी जंतरमंतरवरील आंदोलन समाप्त झाले.या आंदोलनात संपूर्ण विपक्ष एकत्र झालेला आपण पाहिला. कारण केंद्र सरकारने सांगितले की, राजीनामा पध्दत आमच्या सरकारमध्ये नाही. अशाप्रकारचे सत्तेचे घमंड केंद्र सरकारला असल्याने सरकार झुकायला तयार नव्हते.परंतु जेन-झी ची आक्रमकता व संपूर्ण एकवटलेला विपक्ष पाहून शेवटी धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला. यानंतर पंजाबमध्ये पेपर फुटीप्रकरण उघडकीस आले यात भाजपने पंजाब सरकारला घेरने सुरू केले व विरोधकांवय वार-प्रतीवार सुरू झाला. यानंतर विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला झारखंडमध्ये सुरुवात झाली. झारखंडमध्ये गैरभाजपा सरकार असल्याने झारखंडच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ भाजपा संपूर्ण शक्तीनिशी उतरला व याचे पडसाद लोकसभेत सुध्दा दिसून आले. त्यामुळे आता केंद्र सरकार विरोधकांना विचारत आहे की, आपण झारखंडच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या दरम्यान चुप का? असे अनेक प्रश्न झारखंडमधील विरोधी पक्ष भाजप व केंद्र सरकार, विरोधकांना व झारखंड सरकारला विचारत आहे.

परंतु जंतरमंतरवरील आंदोलन असो अथवा पंजाब मधील आंदोलन असो अथवा झारखंडमधील विद्यार्थ्यांचे आंदोलन असो यावर तोडगा काढायला कोणीही तयार नाही. कारण केंद्र सरकारला ज्या राज्यात त्यांची सरकार नाही त्या राज्यात त्यांना राजकारण करायचे आहे; तर विरोधकांना भाजप शासीत प्रदेशात व केंद्र सरकारच्या विरूद्ध राजकारण करून आपापला हेतू साध्य करण्यासाठी लागले आहेत. अशा घाणेरड्या व घृणास्पद राजकारणामुळे युवा पिढीचे मोठ्या प्रमाणात भविष्याचे नुकसान होत आहे.याकरीता देशातील संपूर्ण राजकारण्यांनी (पक्ष-विपक्ष) यांनी एकत्र येऊन जेन-झी च्या मागण्यांवर गांभीर्याने विचार करायला पाहिजे. पक्ष-विपक्ष स्वतःच्या स्वाथार्साठी कितीही राजकारण करीत असले तरी आता जेन-झी थांबणार नसल्याचे दिसून येते.कारण जेन-झीचे आंदोलन जरी जंतरमंतरवरून सुरू झाले असले तरी त्याची ठिणगी येत्या काही दिवसांत संपूर्ण देशभर पसरण्याची दाट शक्यता असुन वनवा लागु शकते याला नाकारता येत नाही. कारण देशातील राजकीय प्रणालीने विद्यार्थ्यांच्या साधनांवर आणि आयुष्यावर घणाघाती प्रहार करून संपूर्ण तमाशा मांडला आहे.त्यामुळे नीट पेपर फुटी प्रकरणाच्या दरम्यान २२ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या.

स्वतंत्र पुर्वकाळात युवा वर्ग देशाला स्वातंत्र्य मिळावे यासाठी एकत्र झाला होता व आपल्या प्राणांची आहुती देऊन देश स्वतंत्र केला.परंतु आता स्वतंत्र भारताला पक्ष-विपक्षांच्या राजकारण्यांनी देशाला भ्रष्टाचाराच्या माध्यमातून पोखरून टाकले असून अनेक गंभीर समस्या निर्माण केल्या आहेत. या भ्रष्ट व्यवस्थेपासुन देशाला मुक्ती मिळावी यासाठी जेन-झीचा उदय झाल्याचे दिसून येते.स्वतंत्र पुर्व काळात युवा पिढी स्वातंत्र्यासाठी लढले व आजचा युवा वर्ग आपल्या हक्कांसाठी लढत आहे.त्यामुळे जेन-झीचे वादळ आणि तुकारामांची सुनामी आता कोणीही रोखू शकत नाही. कारण जेन-झी सारखी तुकाराम मुंढे यांची आक्रमकता संपूर्ण देशभरात दिसायला लागली आहे. जंतरमंतरच्या आंदोलनाला विरोधकांचा साथ आणि झारखंडच्या आंदोलनाला एनडीएचा साथ असा भेदाभेद जेन-झी सोबत होत असल्याने आजचा युवा वर्ग सतर्क झाला आहे.कारण जेन-झीच्या लक्षात आले की, प्रत्येक पक्ष आपली राजकीय पोळी शेकण्याच्या तयारीत आहे.

राजकीय पुढाऱ्यांनो लक्षात ठेवा आपल्या पुर्वजानी, थोर महात्मे, क्रांतिकारक अशा लाखो देशभक्तांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन देश स्वतंत्र केला. कारण त्यांचा एकच उद्देश होता की,भारत सुजलाम सुफलाम व्हावा व देशातील प्रत्येक नागरिकाला न्याय मिळावा.परंतु राजकीय पुढाऱ्यांनी सर्वत्र भ्रष्टाचाराचे बिज रोवले व त्यामुळे महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या, ढासळती शिक्षण प्रणाली, ढासळती आरोग्य सुविधा, करोडोंची दानचोरी, अन्नधान्य व दुग्धजन्य पदार्थामध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ अशा अनेक गोष्टींना वाव देऊन देशाचे वाटोळे केले असून भ्रष्टाचाराच्या बाबतीत भारताला अव्वल स्थानावर राजकीय पुढाऱ्यांनी नेऊन ठेवले व आज मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी वाममार्गाने पैसा कमवून करोडपती झाल्याचे दिसून येते व सर्वसामान्यांना गरीबीच्या खाईत गुदमरत आहे.

याला प्रत्युत्तर म्हणून जेन-झी चा जन्म झाल्याचे दिसून येते आणि याचे पडसाद देशभरात दिसत आहे व काही काळात प्रत्येक राज्यात दिसून येईल.त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांनो सावधान आता तुमची खैर नाही. जय हिंद!

- स्वतंत्र पत्रकार
मो. ९९२१६९०७७९

# 'जयोऽस्तुते'मधून राष्ट्रभक्ती आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा सुरेल आविष्कार

**सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे १५ ऑगस्ट रोजी नागपूर येथे विशेष देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त 'जयोऽस्तुते' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता बी.आर.ए. मुंडले, प्लॅटिनम ज्युबिली सभागृह, दीक्षाभूमीजवळ, नागपूर येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमास विनामूल्य प्रवेश असून, नागपूर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. स्वातंत्र्यदिन हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमान, राष्ट्रनिष्ठा आणि देशभक्तीची प्रेरणा देणारा दिवस आहे. स्वातंत्र्यलढ्यातील वीरांचे त्याग व बलिदान स्मरणात ठेवून राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव आणि राष्ट्रप्रेमाची भावना अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने विविध सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. 'जयोऽस्तुते' या कार्यक्रमातून देशभक्ती आणि सांस्कृतिक अभिव्यक्तीचा सुरेख संगम रसिकांना अनुभवता येणार आहे.

देशभक्तीपर गीत, संगीत आणि विविध कलाविष्कारांच्या माध्यमातून भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा गौरव, राष्ट्रप्रेमाची भावना तसेच महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे दर्शन या कार्यक्रमातून घडविण्यात येणार आहे. भारतीय संस्कृती, राष्ट्रभावना आणि कलात्मक अभिव्यक्ती यांचा संगम असलेला हा कार्यक्रम रसिकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे. या कार्यक्रमाचे संयोजन अमर कुळकर्णी करणार असून, संगीत नियोजन आनंद मास्टे यांचे आहे. कार्यक्रमाचे समन्वयक गजानन रानडे आहेत. संगीत आणि सांस्कृतिक सादरीकरणाच्या माध्यमातून स्वातंत्र्यदिनाचा उत्साह आणि राष्ट्रभक्तीची भावना जनमानसात अधिक दृढ करण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात येणार आहे.

देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास आणि राष्ट्रनायकांचे योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे, राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करणे तसेच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. सदर कार्यक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास मंत्री अँड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येत आहे. राज्यभर विविध सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून राष्ट्रभावना आणि सांस्कृतिक मूल्यांचा प्रसार करण्याचे कार्य सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत सातत्याने करण्यात येत आहे. नागपूर व परिसरातील नागरिक, विद्यार्थी, युवक, कलाकार, सांस्कृतिकप्रेमी आणि रसिकांनी 'जयोऽस्तुते' या विशेष कार्यक्रमाचा लाभ घ्यावा व मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.

थोडक्यात

## एडुसन फाऊंडेशनतर्फे सायबर जनजागृती कार्यशाळेत २४६ विद्यार्थ्यांना डिजिटल सुरक्षेचे प्रशिक्षण




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नंदनवन, नागपूर येथील श्रीमती जानकीदेवी जैस्वाल विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात मंगळवारी सायबर हायजीन आणि सायबर एथिक्स या विषयावर सायबर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात २४६ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. हा कार्यक्रम एडुसन फाउंडेशन यांच्या वतीने आणि सायबर सेल, नागपूर पोलीस यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता. सायबर सेल, नागपूर पोलीसचे तन्मय रायसने हे कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना रायसने यांनी सायबर हायजीन, तंत्रज्ञानाचा नैतिक वापर तसेच सायबर फसवणुकीच्या विविध प्रकारांबाबत माहिती दिली. गेमिंग अँप्स, टास्कच्या नावाखाली होणारी फसवणूक, संशयास्पद फाइल्स तसेच सध्या चर्चेत असलेल्या डिजिटल अरेस्ट या फसवणुकीच्या प्रकाराबाबत त्यांनी प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जागरूक केले.

यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या प्रश्नांची उत्तरेही दिली. निलेश काळे यांनी सोशल मीडियाच्या अतिवापराचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व वैयक्तिक विकासावर होणाऱ्या परिणामांवर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी शिक्षण व कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करावे आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा जबाबदारीने वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच चांगले चारित्र्य, सायबर बुलिंग आणि सोशल मीडियावरील जबाबदार वर्तनाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. तांदळे गुरुजी रिसोर्स अँड डेव्हलपमेंट सोसायटीचे अध्यक्ष दिलीप एम. तांदळे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करण्यासंदर्भात त्यांनी आपले अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले. कार्यक्रमाला मुख्याध्यापिका संध्या जैस्वाल, उपमुख्याध्यापक विनोद काळे, विजय, एडुसन फाऊंडेशनचे संचालक व कार्यक्रम समन्वयक निलेश काळे आणि दिलीप एम. तांडले यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शाळेचे वरिष्ठ शिक्षक व कार्यक्रम समन्वयक उमेश ठाकरे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी तसेच विद्यार्थ्यांची शिस्तबद्ध उपस्थिती व व्यवस्थापनासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांनी प्रमुख मार्गदर्शकांचा परिचय करून दिला. विनोद काळे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले आणि कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी विद्यार्थ्यांनी सायबर हायजीन आणि सायबर एथिक्सचे पालन करण्याची शपथ घेतली. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून डिजिटल तंत्रज्ञानाचा सुरक्षित, जबाबदार आणि योग्य वापर करण्याचा संकल्प केला.

## एकात्मता उच्च प्राथमिक विद्यालय येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम उत्साहात संपन्न




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

एकात्मता उच्च प्राथमिक विद्यालय, एकात्मता नगर, जयताळा, नागपूर येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्रद्धापूर्वक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी उपस्थित शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याला अभिवादन केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना सौ शुभांगी कातोरे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्याची, त्यांच्या लोककल्याणकारी कार्याची, न्यायप्रियतेची तसेच समाजहितासाठी केलेल्या योगदानाची माहिती देण्यात आली.

विद्यार्थ्यांनीही अहिल्यादेवींच्या कार्याविषयी मनोगत व्यक्त करून त्यांच्या आदर्श विचारांचा अंगीकार करण्याचा संदेश दिला. तसेच 'लोककल्याण, न्याय, सेवा आणि समतेचा आदर्श' अशी ओळख निर्माण करणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी, असे आवाहन शाळेचे मुख्याध्यापक शरद उरकुडे यांनी केले. कार्यक्रमाला शाळेतील शिक्षकवृंद, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुनीता गावंडे, धनश्री ढेगेकर, सोनल फुंदे यांनी सहकार्य केले.

## स्वातंत्रदिनी पालकमंत्री बावनकुळे यांच्या हस्ते विभागीय आयुक्त कार्यालयात ध्वजारोहण

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारतीय स्वातंत्र्य दिनाचा मुख्य शासकीय समारंभ विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०५ वाजता आयोजित करण्यात आला आहे. राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहणानंतर पालकमंत्री मंत्री बावनकुळे सशस्त्र पोलीस दलाची मानवंदना स्विकारतील. त्यानंतर जनतेला उद्देशून संबोधित करतील. मुख्य शासकीय समारंभास उपस्थित रहावे, असे आवाहन विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी केले आहे. स्वातंत्र्य दिनानिमित्य उत्कृष्ट कार्याबद्दल अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देवून पालकमंत्री यांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील तसेच विभागीय स्तरावरील राष्ट्रपती पदक जाहीर झालेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा यावेळी गौरव करण्यात येणार आहे. विविध योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात केलेल्या कार्याबद्दल विविध विभाग तसेच संस्था व व्यक्तींचा यावेळी गौरव करण्यात येणार आहे.

# एमआयडीसीचे भूखंड वर्षानुवर्षे पडीत ठेवणाऱ्यांवर कारवाई : ६७ भूखंड रद्द

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**
**(धनंजय पांढरे)**




उद्योग उभारणीसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून एमआयडीसी भूखंड घेऊनही वर्षानुवर्षे उद्योग सुरू न करणाऱ्या भूखंडधारकांवर आता कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. चंद्रपूर जिल्ह्यात अशा २०० भूखंडधारकांना नोटिसा बजावण्यात आल्या असून, त्यापैकी ६७ भूखंड रद्द करण्यात आले आहेत. उद्योगासाठी दिलेली एमआयडीसीची जमीन विनावापर ठेवून तिचा गैरवापर सहन केला जाणार नाही. रद्द झालेले भूखंड नवीन आणि उद्योग सुरू करण्यास इच्छुक उद्योजकांना उपलब्ध करून द्यावेत, असे स्पष्ट निर्देश उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी उद्योग विभाग, एमआयडीसी तसेच खादी व ग्रामोद्योग विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला.

यावेळी डॉ. सामंत यांनी अधिकाऱ्यांना विविध सूचना केल्या. जिल्हाधिकारी वसुमना पंत दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होत्या. अतिरिक्त जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी पोटे, मुख्य अभियंता राजेश जंजाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्वाती कारले, प्रादेशिक अधिकारी निशांत गिरी, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अनमोल कोरे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील एमआयडीसी क्षेत्रातील सुमारे २०० भूखंड अनेक वर्षांपासून पडीत असल्याचे आढळून आले आहे. या भूखंडधारकांना नोटिसा देण्यात आल्या असून ६७ भूखंड रद्द करण्याची कारवाई करण्यात आली आहे. एमआयडीसीची जमीन केवळ उद्योग उभारणीसाठी देण्यात येते. त्यामुळे भूखंड घेऊन उद्योग सुरू न करणाऱ्यांकडून भूखंड परत घेऊन ते उद्योग सुरू करण्यास इच्छुक असलेल्या नवीन उद्योजकांना देण्याची प्रक्रिया राबवावी, असे निर्देश डॉ. सामंत यांनी दिले.

दरम्यान, एमआयडीसीच्या नावावर भूखंड वाटप झाले असताना प्रत्यक्षात त्याचा वापर अन्य व्यक्तीकडून केला जात असल्यास अशा प्रकरणांची तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले. भूखंडांचा वापर अवैध व्यवसायांसाठी होत असल्याचे आढळल्यास तातडीने कारवाई करावी. एमआयडीसी परिसरातील अनधिकृत बांधकामांवरही कठोर कारवाई करून भूखंड मोकळे करण्याचे निर्देश डॉ. सामंत यांनी दिले.

**गोंडपिपरीत औद्योगिक विकासाला चालना**

गोंडपिपरी औद्योगिक परिसरासाठी ६७.६७ हेक्टर जमीन उपलब्ध झाली आहे. ज्या ठिकाणी भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे, तेथे पायाभूत सुविधांची कामे तातडीने सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले. या परिसरात ट्रायबल क्लस्टर विकसित करण्याचे नियोजन असल्याची माहितीही डॉ. सामंत यांनी दिली.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाचा लाभ अधिकाधिक युवक-युवतींपर्यंत पोहोचविण्यासाठी नियमित प्रशिक्षण देण्यावर भर देण्याच्या सूचना करण्यात आल्या. ऑनलाइन प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध असल्याने त्याचा व्यापक वापर करावा. स्वयंरोजगारासाठी पुढे येणाऱ्या पात्र युवक-युवतींची कर्जप्रकरणे बँकांनी विनाकारण नाकारू नयेत, असे निर्देशही उद्योगमंत्र्यांनी दिले.

**चंद्रपुरात कौशल्य विकास केंद्र उभारणार**

जिल्ह्यात येणाऱ्या उद्योगांना आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्यासाठी चंद्रपुरात उत्कृष्ट कौशल्य विकास केंद्र उभारण्यात येणार आहे. उद्योगांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाच्या गरजेनुसार स्थानिक युवक-युवतींना प्रशिक्षण देण्यात येईल. जिल्ह्यातील आयटीआय संस्थांना उद्योगांशी जोडून उद्योगाभिमुख प्रशिक्षण देण्यावरही भर दिला जाणार आहे. यामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन जिल्ह्यातील बेरोजगारी कमी करण्यास मदत होईल, असे डॉ. सामंत यांनी सांगितले.

**एमआयडीसीतील अवैध व्यवसायांवर धडक कारवाई**

चंद्रपूर पोलिसांनी एमआयडीसी परिसरात सुरू केलेल्या छापेमारीमुळे अवैध व्यवसायांना आळा घालण्यास मदत होत असल्याचे उद्योगमंत्र्यांनी नमूद केले. चंद्रपूरमध्ये राबविण्यात येत असलेला हा उपक्रम राज्यातील इतर औद्योगिक क्षेत्रांतही राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन भूसंपादन**

नवीन औद्योगिक क्षेत्रांसाठी भूसंपादन करताना शेतकरी व जमीनधारकांना विश्वासात घेऊन प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. गोंडपिपरी येथील एमआयडीसीसंदर्भात शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतले जाणार आहे. यासाठी लवकरच जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात येणार असून, या बैठकीला आपण स्वतः ऑनलाइन उपस्थित राहणार असल्याचे डॉ. सामंत यांनी सांगितले.

## जिल्ह्यात ३१ लाख ३० हजार २१३ मतदारांचे गणना प्रपत्र प्राप्त

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारत निवडणूक आयोगाच्या निदेर्शानुसार नागपूर जिल्ह्यात विधानसभा मतदारसंघांच्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाचे काम सुरू आहे. जिल्ह्यात एकूण ४६ लाख ३८ हजार ५८९ मतदार असून, त्यापैकी ३१ लाख ३० हजार २१३ (६७.४८ टक्के) मतदारांचे गणना प्रपत्र भरून व स्वाक्षरी करून प्राप्त झाले आहे. गणना प्रपत्र भरण्याची अंतिम मुदत १७ ऑगस्ट २०२६ आहे.

जिल्ह्यातील १० लाख ८१ हजार २१४ (२३.३१ टक्के) मतदार गणना प्रपत्र जमा न होणे या वर्गात नोंदविण्यात आले आहेत. यामध्ये प्रत्यक्ष भेटीनंतरही सापडू न शकलेले किंवा गैरहजर असलेले २ लाख ९९ हजार ६४७ (६.४६ टक्के), कायमस्वरूपी स्थलांतरित ४ लाख ४८ हजार २२३ (९.६६ टक्के), मृत २ लाख २५ हजार ६२७ (४.८६ टक्के), अन्यत्र नोंदणी केलेले अथवा दुबार नोंदणी केलेले १ लाख ४ हजार ४४७ (२.२५ टक्के) आणि इतर ३ हजार २७० (०.०७ टक्के) मतदारांचा समावेश आहे. दरम्यान, जिल्ह्यातील एकूण ४६ लाख ३८ हजार ५८९ मतदारांपैकी ४२ लाख ११ हजार ४२७ (९०.७९ टक्के) मतदारांबाबतची पडताळणी पूर्ण झाली आहे. ४ लाख २७ हजार १६२ (९.२१ टक्के) मतदारांबाबतची पडताळणी अद्याप प्रलंबित आहे.

गणना प्रपत्र जमा न झालेल्या मतदारांच्या नावांच्या याद्या संबंधित विधानसभा मतदारसंघातील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनी नियुक्त केलेल्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींना उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या अधिकृत संकेतस्थळावर या याद्या विधानसभा मतदारसंघनिहाय प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

या याद्यांमधील मतदारांच्या वास्तव्याबाबत संबंधित मतदार किंवा मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींनी माहिती संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना उपलब्ध करून दिल्यास, प्रत्यक्ष पडताळणी करून १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत गणना प्रपत्र भरून घेता येणार आहे.

# महावितरणचा लोकाभिमुख उपक्रम!

## नागपुरात आता प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या बुधवारी होणार 'ग्राहक समाधान शिबिर'

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**




वीज ग्राहकांच्या अडीअडचणींचे स्थानिक पातळीवर आणि अत्यंत तातडीने 'ऑन द स्पॉट' निराकरण करण्यासाठी महावितरणच्या नागपूर शहर मंडलातर्फे एक अत्यंत स्तुत्य, पारदर्शक आणि लोकाभिमुख उपक्रम हाती घेण्यात आला आहे. ग्राहकांना उत्कृष्ट, विनाव्यत्यय आणि दर्जेदार सेवा देण्यासाठी सदैव कटिबद्ध असलेल्या महावितरणने आता नागपुरात दर महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या बुधवारी ग्राहक समाधान शिबिराचे आयोजन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे ग्राहकांना आता आपल्या समस्यांच्या निवारणासाठी कार्यालयांच्या फेऱ्या मारण्याची गरज उरणार नसून, त्यांना थेट संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधून एकाच छताखाली तक्रारीचे निवारण करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे.

नागपूर शहर मंडलांतर्गत समाविष्ट असलेल्या सर्व १९ उपविभागीय कार्यालयांमध्ये या शिबिराचे अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने आयोजन केले जाणार आहे. येत्या बुधवारपासून म्हणजेच १९ ऑगस्ट २०२६ रोजी या महत्त्वपूर्ण उपक्रमाचा अधिकृत शुभारंभ होत असून, त्यानंतर नियमितपणे दर महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या बुधवारी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत शहरातील सर्व संबंधित उपविभागीय कार्यालयांत ही शिबिरे पार पडतील. या वेळेत संबंधित अधिकारीवर्ग प्रत्यक्ष उपस्थित राहून ग्राहकांच्या अर्जांची व तक्रारींची तात्काळ दखल घेणार आहेत.

या विशेष ग्राहक समाधान शिबिरामध्ये ग्राहकांच्या वीजबिलांसंबंधीच्या तक्रारी, बिलांची अचूकता, वीजपुरवठ्यातील तांत्रिक अडथळे, नावात बदल, संलग्न वीज भारात बदल करणे, नवीन वीजजोडण्या मिळण्यात येणाऱ्या अडचणी, सदोष मीटर बदलणे यांसारख्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करून जागेवरच मार्ग काढण्यात येणार आहे. विशेषतः, सध्या काही ग्राहकांमध्ये स्मार्ट मीटरबाबत असलेला संभ्रम आणि विविध गैरसमज दूर करण्यावर या शिबिरात विशेष भर दिला जाणार आहे. या माध्यमातून ग्राहकांना स्मार्ट मीटरची अचूक कार्यप्रणाली, त्याचा पारदर्शक कारभार आणि वीजवापरावरील नियंत्रण यासारख्या दीर्घकालीन फायद्यांची माहिती अगदी सोप्या भाषेत समजवून सांगितली जाईल.

स्थानिक पातळीवरच नागरिकांच्या तक्रारींचे त्वरित व पारदर्शक निवारण व्हावे, यासाठी महावितरणने घेतलेले हे पाऊल अत्यंत सकारात्मक आणि स्वागतार्ह आहे. ग्राहकांचा अमूल्य वेळ वाचावा आणि त्यांच्या प्रत्येक समस्येचे जलद गतीने समाधान व्हावे, हा यामागचा मूळ उद्देश आहे. त्यामुळे नागपूर शहरातील सर्व सन्माननीय वीजग्राहकांनी या लोकहिताच्या उपक्रमाचा जास्तीत जास्त संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

# केंद्रीय ओबीसी यादीतील प्रलंबित २७ जातींचा तत्काळ समावेश करा!

### महाराष्ट्र ओबीसी काँग्रेसच्या वतीने पंतप्रधानांना निवेदन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



महाराष्ट्रातील केंद्रीय ओबीसी यादीत प्रलंबित असलेल्या २७ जातींचा तत्काळ समावेश करावा, तसेच मंडल आयोगाची संपूर्ण अंमलबजावणी करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या ओबीसी विभागाच्या वतीने करण्यात आली.

या मागण्यांचे निवेदन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना नागपूरचे निवासी उपजिल्हाधिकारी अमित खांडे यांच्यामार्फत सादर करण्यात आले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाच्या वतीने पूर्व विदर्भ-नागपूर विभागात ७ ते ११ ऑगस्ट २०२६ या कालावधीत मंडल आयोग सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. मंडल आयोगाचे तत्कालीन अध्यक्ष बी. पी. मंडल यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मंडल यात्रा काढण्यात आली. ७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता संविधान चौक येथून या यात्रेला प्रारंभ झाला. त्यानंतर गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर आणि वर्धा या जिल्ह्यांतून मार्गक्रमण करीत ११ ऑगस्ट रोजी सेवाग्राम येथील चरखा सभागृहात यात्रेचा उत्साहात समारोप झाला.

या मंडल यात्रेदरम्यान गावपातळीपासून तालुका व जिल्हास्तरापर्यंत ओबीसी कार्यकर्त्यांचे मेळावे, संवाद सभा आणि चर्चा सत्रांचे आयोजन करण्यात आले. या चर्चांमधून ओबीसी समाजाच्या अनेक मागण्या केंद्र व राज्य सरकारकडे अद्याप प्रलंबित असल्याचे समोर आले. ओबीसी समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी केंद्र व राज्य सरकार विरोधात लोकशाही मार्गाने संघर्ष करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. केंद्र सरकारकडे करण्यात आलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये मंडल आयोगाची पूर्णपणे अंमलबजावणी करावी, २०२७ मध्ये होणाऱ्या जातिनिहाय जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम ठेवावा, महाराष्ट्रातील केंद्रीय ओबीसी यादीत प्रलंबित २७ जातींचा तत्काळ समावेश करावा, राष्ट्रीय ओबीसी आयोगाची दोन विभागीय कार्यालये स्थापन करावीत आणि केंद्र सरकारमध्ये स्वतंत्र ओबीसी मंत्रालय सुरू करावे, या मागण्यांचा समावेश आहे.

या मागण्यांचे निवेदन मोरेश्वर भादे, वरिष्ठ उपाध्यक्ष तथा नागपूर विभाग समन्वयक यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आले.

यावेळी शिष्टमंडळात अजय हटेवार, राष्ट्रीय समन्वयक ओबीसी काँग्रेस भूषण तल्हार, संजय भिलकर व सचिन वैद्य, उपाध्यक्ष चंद्रकांत हिंगे, महासचिव संध्या बिसेन व प्रमोद शिंगणे, सचिव; प्रशांत पवार, नागपूर शहर अध्यक्ष संतोष गोटाफोडे, शहर महासचिव अरविंद क्षीरसागर, दक्षिण नागपूर अध्यक्ष अशोक निखाडे, महादेव दयने, तेजस तायडे आदी उपस्थित होते.

थोडक्यात

## आचार्य अत्रे यांना वरळी नाका येथे अभिवादन

### ज्येष्ठ संपादक पराग करंदीकर यांना समितीच्यावतीने पुरस्कार घोषित

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई (रवींद्र मालुसरे)**



संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार आणि बहुआयामी व्यक्तिमत्व आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्या १२८ व्या जयंती दिनानिमित्त त्यांच्या वरळी नाका येथील पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ज्यांच्या नावाचा उच्चार होताच मराठी माणसाच्या डोळ्यांसमोर एकाच वेळी लेखक, पत्रकार, वक्ता, शिक्षक, नाटककार, चित्रपटकार आणि महाराष्ट्राच्या अस्मितेसाठी लढणारा योद्धा उभा राहतो. महाराष्ट्राच्या सामाजिक, साहित्यिक, पत्रकारिता, शैक्षणिक आणि राजकीय जीवनावर आपल्या कर्तृत्वाची अमिट छाप पाडणाऱ्या आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्याविषयी भावना याप्रसंगी व्यक्त करण्यात आल्या.

सन २०२६ चा ज्येष्ठ संपादक कै. काकासाहेब पुरंदरे सन्मान पुरस्कार यावेळी महाराष्ट्र टाइम्सचे संपादक पराग करंदीकर यांना पत्रकारितेतील बहुमोल योगदानाबद्दल जाहीर करण्यात आला, त्याची घोषणा समितीच्या अध्यक्षा आरती पुरंदरे सदावर्ते यांनी यावेळी केली. पुरस्कार वितरण कार्यक्रमाची माहिती लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. याप्रसंगी आचार्य अत्रे यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी अत्रे कुटुंबीय अँड. राजेंद्र व अँड. बिना पै, संपादक महेश म्हात्रे, प्राध्यापक विसुभाऊ व सौ उमाताई बापट, पत्रकार शिबानी जोशी, शरद बरडे, श्रीकांत मयेकर, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे, दीपक देवगोंडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाची पूर्वतयारी आणि सूत्र संचालन अरविंद भोसले यांनी केले.

## भव्य तिरंगा रॅलीने भिवापूर दुमदुमले




**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला गुरुवारी (१४ ऑगस्ट) शहरात आयोजित करण्यात आलेल्या भव्य तिरंगा रॅलीने शहरात देशभक्तीचा उत्साह संचारला. नगरपंचायत कार्यालयापासून सकाळी १० वाजता रॅलीला सुरुवात झाली. विद्यार्थी, अधिकारी, पदाधिकारी, शिक्षक आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. हातात तिरंगा घेतलेल्या विद्यार्थ्यांनी वंदे मातरम्, भारत माता की जय आणि जय हिंदच्या घोषणांनी शहर दणाणून सोडले. रॅलीत तहसीलदार संजय राठोड, नगराध्यक्ष सुषमा श्रीरामे, मुख्याधिकारी पार्थ सिडाम, उपनगराध्यक्ष प्रकाश पंजलवार, भूमी अभिलेख विभागाच्या उपअधीक्षक सोनसरे, ठाणेदार रवींद्र मस्कर, नायब तहसीलदार रेशमा निकम यांच्यासह नगरसेवक, अधिकारी-कर्मचारी आणि शिक्षक सहभागी झाले. शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण केल्यानंतर रॅलीचा नगरपंचायत कार्यालय परिसरात समारोप झाला. तिरंग्यांनी सजलेले रस्ते आणि देशभक्तीच्या घोषणांनी भिवापूरमध्ये स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येचा उत्साह अधिकच द्विगुणित झाला.

### मल्लिकार्जुन खर्गे यांच्या सभेनंतर करण्यात आलेल्या गंगाजल शुद्धीकरणाच्या कृत्याचा तीव्र निषेध

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या उत्तराखंड येथील सभेनंतर काही हिंदुत्ववादी उजव्या विचारसरणीच्या संघटनांनी गंगाजलाने शुद्धीकरणाचा विधी केल्याचे समोर आले आहे. हे कृत्य अत्यंत निंदनीय, लज्जास्पद आणि सामाजिक सलोखा व लोकशाही मूल्यांना धक्का देणारे आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला आहे. देशातील कोणत्याही राजकीय नेत्याच्या सभा अथवा विचारांशी मतभेद असू शकतात; मात्र एखाद्या व्यक्तीच्या उपस्थितीनंतर त्या ठिकाणाचे तथाकथित शुद्धीकरण करणे ही मानसिकता सामाजिक भेदभाव आणि जातीय-धार्मिक पूर्वग्रहांना प्रोत्साहन देणारी आहे.

मा. मल्लिकार्जुनजी खर्गे हे देशातील ज्येष्ठ नेते असून संविधान, सामाजिक न्याय, समता आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी सातत्याने आवाज उठवत आहेत. त्यांच्या सभेनंतर अशा प्रकारचे शुद्धीकरण करणे म्हणजे केवळ एका व्यक्तीचा अपमान नसून भारतीय संविधानाच्या समानता आणि बंधुतेच्या मूलभूत मूल्यांचा अवमान आहे. अशा घटनांमुळे समाजात द्वेष आणि तेढ निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे संबंधितांनी अशा प्रकारच्या कृतींपासून दूर राहावे आणि प्रशासनानेही अशा घटनांची गांभीर्याने दखल घेऊन सामाजिक शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक कारवाई करावी. भारतीय संविधानाचा सन्मान, सामाजिक समता आणि बंधुता हीच देशाची खरी ओळख आहे. कोणत्याही व्यक्तीचा जात, धर्म किंवा विचारसरणीच्या आधारावर अपमान करण्याचा अधिकार कोणालाही नाही. निंदनीय कृत्याचा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी, अनुसूचित जाती विभागातर्फे प्रदेश उपाध्यक्ष काँग्रेस कमिटी, किशोर कान्हेरे, प्रदेश सचिव राजेश रंगारी, अनुसूचित जाती विभाग, श्यामजी चौधरी यांचेकडून तीव्र निषेध करण्यात येत आहे.

# इनाम देवस्थान जमिनींच्या शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी शासन प्रयत्नशील

### २ लाख ३१ हजार प्रकरणांपैकी ६० हजारांवर मार्ग, उर्वरित शेतकऱ्यांसाठी महिनाभरात तोडगा काढणार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे संकेत

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कायदेशीर अडचणींमुळे प्रॉपर्टी कार्ड आणि सातबारा उतारा मिळू न शकलेल्या इनाम देवस्थान जमिनीवरील शेतकऱ्यांना पीक विमा, पीक कर्जासह आवश्यक शासकीय सुविधांचा लाभ मिळवून देण्यासाठी शासन पुढाकार घेत आहे. २ लाख ३१ हजार प्रकरणांपैकी आतापर्यंत ६० हजारांहून अधिक प्रकरणांवर मार्ग काढण्यात आला असून, उर्वरित सुमारे १ लाख ६० हजार शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरही पुढील महिनाभरात तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे महसूलमंत्री तथा नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे प्रसारमाध्यमांशी नागपुरात बोलत होते.

विविध भागांत जमिनींच्या स्वरूपानुसार वेगवेगळे कायदे आणि नियम लागू आहेत. पालघर-ठाणे येथे वर्कर्स, रत्नागिरी-सिंधुदुर्गमध्ये कबुलायतदार, मराठवाड्यात निजामाच्या जमिनी, नंदुरबारमध्ये जहागीरदारांच्या जमिनी, तर पश्चिम महाराष्ट्रात देवस्थान इनाम व देशमुख इनाम अशा विविध प्रकारच्या जमिनी आहेत. या सर्व प्रकरणांचा अभ्यास करून आवश्यक त्या कायद्यात बदल करण्याची शासनाची भूमिका आहे. शेतकरी कसत असलेल्या जमिनी त्यांच्या नावावर करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून, कोणत्याही शेतकऱ्यावर अन्याय होऊ देणार नाही, हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा शब्द आहे, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले. आदिवासी शेतकऱ्यांना नवीन सातबारा देण्याच्या प्रक्रियेमुळे त्यांच्या जमिनी त्यांच्या नावावर होण्याचा मार्ग मोकळा होत असल्याचे त्यांनी सांगितले.

टीका करून काही साध्य होणार नाही.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर टीका करून काही साध्य होणार नाही. देशाच्या सुरक्षेसाठी अमित शाह यांनी मोठी भूमिका बजावली आहे. त्यामुळे केंद्रीय गृहमंत्र्यांवर टीका करायची असेल तर त्याला अर्थ असलेली आणि तथ्याधारित टीका झाली पाहिजे, असे ते म्हणाले.

**ओबीसी संघटनांना आंदोलन टाळण्याचे आवाहन**

ओबीसी संघटनांकडून सुरू असलेल्या आंदोलनांबाबत बावनकुळे म्हणाले की, या विषयावर आपण कालच भूमिका स्पष्ट केली आहे. मात्र,



ओबीसी संघटनांना माध्यमांच्या माध्यमातून माझी विनंती आहे की, रस्त्यावरचे वाद, मोर्चे आणि आंदोलनांमुळे राज्याची कायदा-सुव्यवस्था बिघडणे योग्य नाही. समाजा-समाजात वाद निर्माण होणे ही महाराष्ट्राची संस्कृती नाही. त्यामुळे कोणत्याही ओबीसी संघटनेने आंदोलन किंवा मोर्चे काढू नयेत, असे आवाहन त्यांनी केले.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी नागपूर दौऱ्यात पक्षाच्या सोशल मीडिया यंत्रणेला अधिक सक्षम करण्याबाबत केलेल्या सूचनेचे स्वागत करताना बावनकुळे म्हणाले की, प्रदेशाध्यक्षांनी योग्य सल्ला दिला आहे. सोशल मीडिया, रील्स आणि बदलत्या अल्गोरिदमचा प्रभाव लक्षात घेऊन पक्षाने पुढे जाणे आवश्यक आहे. प्रदेशाध्यक्षांनी दिलेल्या सूचनांचे आम्ही सर्वजण पालन करू.

भाजप-शिवसेना युती गेल्या ३० वर्षांपासून असून, दोन्ही पक्षांनी एकमेकांना भावा-भावाप्रमाणे सांभाळले आहे. त्यामुळे काही वक्तव्ये कोणत्या उद्देशाने केली आहेत, याबाबत मला माहिती नाही; मात्र संबंधितांशी याबाबत चर्चा करणार असल्याचेही बावनकुळे यांनी सांगितले.

## आत्मसमर्पण केलेल्या आरोपीची तुरुंगात रवानगी

### दगडी चाळ गँगवार प्रकरण, शहर पोलिसांची हायटेक यंत्रणा दगडी चाळ टोळीसमोर फेल, दोन आठवड्या नंतरही आरोपी मोकाट, खापरखेडा पोलिस ठाण्यात गुन्हेगारीचा ग्राफ वाढला



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा-श्रीकांत जालंधर**

स्थानिक मुख्य बाजारपेठेतील बहुचर्चित दगडी चाळ गँगवार प्रकरणातील आरोपी चेतन पटमासे याने शहर गुन्हे शाखेसमोर आत्मसमर्पण केले होते पोलीस कोठडी संपल्याने १४ ऑगस्ट रोजी त्याला न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने तुरुंगात रवानगी केली आहे.

मोहन ठाकूर खुरावत,प्रियांशू विद्याधर रक्षित, युगांत राजेश सारवे, हेमंत उर्फ सुदामा मधुकर चापाडहाके, शंतनू उर्फ दद्दू राजेंद्र बागडे, जीतू रामचंद्र कनोजिया, चेतन पटमासे या आठ आरोपींची तुरुंगात रवानगी करण्यात आली असून तीन अल्पवयीन आरोपीना बालसुधारगृहात पाठविण्यात आले आहे.

दगडी चाळ गँगवार घटनेला तब्बल दोन आठवडे पूर्ण होत आहेत मात्र शहर पोलिसांची हायटेक यंत्रणा पोलीस प्रशासनाची हायटेक यंत्रणा दगडी चाळ टोळी समोर फेल ठरली आहे अजूनही मुख्य सूत्रधार आणि इतर आरोपी पोलिसाना गवसले नाहीत.

खापरखेडा पोलीस ठाणे ग्रामीण पोलीस दलातून १५ ऑगस्ट रोजी शहर पोलीस आयुक्तालयात वर्ग करण्यात आले होते या एका वर्षाच्या कार्यकाळात परिसरात गुन्हेगारीचा ग्राफ मोठ्या प्रमाणात वाढला आहे खापरखेडा पोलिसांनी अनेक सराईत व तडीपार गुन्हेगारांना पाठीशी घातल्याचा आरोप होतो आहे.

दगडी चाळ गँगवारचा मुख्य सूत्रधार तडीपार आरोपी सूरज कावळे व शुभम उर्फ शेरू उईके हे खापरखेडा पोलिसांच्या आशीवार्दाने सर्रास अमली पदार्थ व एमडी विक्रीचा धंदा चालवत होते दगडी चाळीत एमडी खरेदी करण्यासाठी नागपूर शहरातून तरुणांच्या रांगा लागत असल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे मात्र आर्थिक लाभापोटी खापरखेडा पोलिसांनी या अवैध धंद्यांवर कारवाई केली नाही असा आरोप नागरिक करत आहेत.

शहर पोलिसांकडे अत्याधुनिक तपास यंत्रणा व मोठा फौजफाटा आहे मात्र एका टोळीच्या मुख्य सूत्रधाराला पकडण्यात अपयश आल्याने नागपूर शहर पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे गुन्हेगारांना पाठशी घालणाऱ्या व हप्ता वसुलीत व्यस्त असलेल्या दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर शहर पोलीस आयुक्त कधी कारवाई करणार? असा संतप्त सवाल आता सामान्य जनता विचारत आहे.

## राज्यस्तरीय 'खासदार चषक' आंतरशालेय देशभक्तीपर समूहगान स्पर्धेची अंतिम फेरी १६ ऑगस्ट रोजी

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते बक्षिस वितरण

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, बालकला अकादमी आणि नागपूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने यंदा प्रथमच राज्यस्तरावर आयोजित करण्यात आलेल्या खासदार चषक आंतरशालेय देशभक्तीपर समूहगान स्पर्धेची स्पर्धेची अंतिम फेरी रविवार, १६ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजेपासून सुरेश भट सभागृह, रेशीमबाग येथे रंगणार आहे.

सुरेश भट सभागृहात नुकत्याच पार पडलेल्या प्राथमिक फेरीत नागपूर शहर व जिल्ह्यासह मुंबई, पुणे, ठाणे, देवाची आळंदी, धामणगाव, अमरावती, वर्धा, वरूड, उमरेड, यवतमाळ, सावनेर, भिवापूर, चंद्रपूर, बुलढाणा आदी ठिकाणांहून १०६ शालेय चमूंनी सहभाग घेतला. त्यातून अंतिम फेरीत पोचलेल्या इयत्ता पहिली ते पाचवी व इयत्ता सहावी ते दहावी अशा दोन गटातील एकूण ३० चमू सादरीकरण करतील.

रविवारी सायंकाळी ५.३० वाजता होणाऱ्या बक्षीस वितरण सोहळ्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची तसेच, महापौर नीता ठाकरे, विभागीय शिक्षण उपसंचालक माधुरी सावरकर, आमदार संजय भेंडे, आमदार मोहन मते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके, विजेत्या संघांना प्रतिष्ठेचा खासदार चषक प्रदान करण्यात येणार आहे. स्पधेर्तील प्रत्येक सहभागी चमूला प्रशस्तीपत्र देण्यात येणार असून अंतिम फेरीतील विजेत्या चमूंमधील प्रत्येक विद्यार्थ्याला रोख पारितोषिक दिली जाणार आहेत.

अंतिम फेरी व बक्षिस वितरण कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रविंद्र फडणवीस व बालकला अकादमीच्या अध्यक्ष मधुरा गडकरी यांनी केले आहे.

## १,८४३ किमीचा सायकल प्रवास करणाऱ्या निलेश गुरुनुलेचा सायकल भेट देऊन गौरव

### संघर्षातून यशाची प्रेरणादायी वाटचाल; सायकल स्नेही मंडळाचा कौतुकास्पद उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली**

जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर गडचिरोली ते केदारनाथ असा तब्बल १,८४३ किलोमीटरचा प्रवास एकट्याने सायकलवर पूर्ण करणाऱ्या युवा सायकलपटू निलेश विलास गुरुनुले याचा सायकल स्नेही मंडळ, गडचिरोलीच्या वतीने नवीन सायकल भेट देऊन सन्मान करण्यात आला. गरीब परिस्थितीवर मात करून वृत्तपत्र वितरणाचे काम करत आपल्या ध्येयाचा पाठलाग करणाऱ्या निलेशच्या या कामगिरीचे उपस्थितांनी कौतुक केले.




सायकल चालवा, आरोग्यवान व्हा, प्रदूषण टाळा हा संदेश घेऊन गेल्या नऊ वर्षांपासून कार्यरत असलेल्या सायकल स्नेही मंडळाच्या वतीने वसंत विद्यालयात हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सायकल स्नेही मंडळाचे संस्थापक ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर होते. ज्येष्ठ पत्रकार अनिल धामोडे, मंडळाचे जिल्हाध्यक्ष प्रा. विलास पारखी, जिल्हा सरचिटणीस उदय धकाते, वसंत विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुचिता कामडी, मीरा बिसेन यांच्यासह सायकल स्नेही मंडळाचे पदाधिकारी, सदस्य आणि वृत्तपत्र वितरक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संघषार्तून उभ्या राहणाऱ्या तरुणांना साथ देण्याचा निर्धार ज्येष्ठ पत्रकार अनिल धामोडे यांनी जिल्ह्यातील वृत्तपत्र वितरणाचे काम करत संघषार्तून पुढे आलेल्या चार सायकल स्नेही युवकांच्या प्रेरणादायी वाटचालीचा उल्लेख केला. शुभम गावतुरे याने वृत्तपत्र वितरण करत इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले, रुपेश भांडारे वृत्तपत्र क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहे, तर वृत्तपत्र वाटप करत आर्ट शाखेतून जिल्ह्यात अव्वल आलेल्या साहिल लोणबले याची पुण्यातील उच्च शिक्षणानंतर पॅरिस विद्यापीठातील मास्टर्स इन पब्लिक पॉलिसी अभ्यासक्रमासाठी निवड झाल्याचे त्यांनी सांगितले.

निलेशच्या जिद्दीला सलाम करत त्याच्या पुढील शिक्षणाची जबाबदारी घेण्याबरोबरच रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठीही प्रयत्न करू, असा निर्धार जेष्ठ पत्रकार अनिल धामोडे यांनी व्यक्त केला.

**अनेक अडचणी आल्या, पण केदारनाथ गाठले**

यावेळी निलेश गुरुनुले याने आपल्या १,८४३ किलोमीटरच्या सायकल प्रवासातील थक्क करणारे अनुभव सांगितले. प्रवासात अनेक अडचणी आणि आव्हाने आली; मात्र जिद्द कायम ठेवत अखेर केदारनाथ गाठून दर्शन घेतल्याचा आनंद अविस्मरणीय असल्याचे त्याने सांगितले.

**सायकल म्हणजे आरोग्यासाठी संजीवनी**

अध्यक्षीय भाषणात बंडोपंत बोढेकर म्हणाले, सायकल ही माणसाची खरा मित्र आहे. ती आपल्या आरोग्यासाठी संजीवनीसारखी आहे. सायकल स्नेही होणे हे आजच्या काळातील शहाणपणाचे लक्षण आहे. आरोग्य, पर्यावरण आणि प्रदूषणाचा विचार करता आज प्रत्येकाने सायकल स्नेही होणे गरजेचे आहे. निलेशसारख्या तरुणांच्या जिद्दीला प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या संघर्षाला समाजाने साथ देणे हीच या सन्मानामागची खरी भावना असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुरलीधर दोनाडकर, प्रा. अरुण पालारपवार, डॉ. चंद्रकांत लेनगुरे, प्रा. उल्हास आखाडे, उपेंद्र द्रोहणकर, डॉ. योगेश पाटील, प्रा. संतोष संगनवार, प्रा. ज्ञानेश्वर धकाते, माधुरी बागडे-बोरकर, श्री. साळवे (बल्लारपूर), वैभव बारेकर, डॉ. शुभम मोंढे, प्रा. सुनिता विजय साळवे, भाविक ठक्कर, संजय आकरे, राजेंद्र गव्हारे आदींनी सहकार्य केले.

निलेशचा प्रवास केवळ १,८४३ किलोमीटरचा नाही; तो परिस्थितीवर मात करून स्वप्नांचा पाठलाग करणाऱ्या प्रत्येक तरुणासाठी प्रेरणेचा प्रवास ठरला आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विलास पारखी यांनी केले. सूत्रसंचालन मीरा बिसेन यांनी, तर आभार प्रदर्शन उदय धकाते यांनी मानले.

थोडक्यात

# शिष्यवृत्ती परीक्षेत स्पृहा शिनखेडेचे यश

## नागपूर पश्चिम तालुक्यात प्रथम, जिल्ह्यात पाचवा क्रमांक

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

रामदासपेठ येथील सोमलवार हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजची इयत्ता सातवीची विद्यार्थिनी स्पृहा तुषार शिनखेडे हिने



महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिने नागपूर पश्चिम तालुक्यात प्रथम क्रमांक, तर नागपूर जिल्ह्यात पाचवा क्रमांक पटकावला आहे. स्पृहाने यापूर्वीही विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ड्इउ ज्युनिअर सीझन-१७ मध्ये सहभागी होत तिने २५ लाख रुपयांची बक्षीस रक्कम जिंकली होती. तसेच विज्ञान विषयक विविध स्पर्धांमध्येही तिने सुवर्णपदक मिळविले आहे. या यशाबद्दल स्पृहाचे शाळेतील शिक्षक, आई- वडील, नातेवाईक व मित्रपरिवाराकडून अभिनंदन होत असून, तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत असून उच्च स्तरावरून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. स्पृहाच्या यशामुळे कुटुंबातील आनंदाचे निर्माण झाले आहेत.

# २७ वा रुद्र अभिषेक संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आपल्या सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेचे पालन करत, परशुराम सर्वभाष्य ब्राह्मण संघाने यावर्षीही, पवित्र श्रावण महिन्यात, श्री गोरक्षण सभा मंदिरात स्थापित शिव मंदिरात संपूर्ण विधींसह श्री रुद्राभिषेक पूजन विधिवत पार पाडले. आचार्य श्रीमती रजनी भांडारकर यांच्या नेतृत्वाखाली सौभाग्य मंडळाच्या सर्व महिलांनी विविध मंत्रोच्चार आणि स्तोत्रांचे पठण करून भगवान शिवाची अभिषेक पूजा केली. प्रमुख पाहुणे नरेंद्र जोग, मंजुषा जोग, डॉ. योगेश भार्गव, आरती भार्गव, सौरभ भार्गव आणि श्रीमती स्मृती भार्गव यांनी अभिषेक पूजा केली. अभिषेक पूजेनंतर भगवान शिवाला सजवण्यात आले, त्यानंतर आरती आणि महाप्रसाद अर्पण करण्यात आला. पवित्र नैवेद्य अर्पण करून कार्यक्रमाची सांगता झाली. संस्थेच्या मोठ्या संख्येने अधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेतला. संस्थेच्या अध्यक्षांनी सर्व उपस्थितांचे आणि श्री गोरक्षण सभेचे आभार व्यक्त केले.

# रक्तदान शिबिराद्वारे जीवन वाचविण्यासाठी इनर व्हील क्लब ऑफ नागपूरचा पुढाकार





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून इनर व्हील क्लब ऑफ नागपूर, रोटरी क्लब ऑफ नागपूर वेस्ट आणि रोटरॅक्ट क्लब ऑफ नागपूर वेस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत संजीवनी हॉस्पिटल, लक्ष्मीनगर, नागपूर येथे स्वातंत्र्यदिन सोहळा व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाची सुरुवात राष्ट्रीय ध्वजारोहण समारंभाने होणार असून, त्यानंतर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने या तीन सेवाभावी संस्थांनी एकत्र येत जीवनदान देण्याचा संकल्प केला आहे.

रक्ताचा एक युनिट तीनपर्यंत व्यक्तींचे प्राण वाचविण्यास उपयुक्त ठरू शकतो. अपघातग्रस्त रुग्ण, शस्त्रक्रिया होणारे रुग्ण, प्रसूतीदरम्यान रक्ताची गरज असलेल्या माता, थॅलेसेमियाग्रस्त मुले तसेच कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी रक्ताची सातत्याने आवश्यकता असते. रक्ताची निर्मिती कृत्रिमरीत्या करता येत नसल्यामुळे स्वेच्छेने रक्तदान करणारे दाते हेच असंख्य रुग्णांसाठी जीवनाची आशा ठरतात. इनर व्हील क्लब ऑफ नागपूरच्या अध्यक्षा पूजा साओजी यांनी नागरिकांना रक्तदानाचे आवाहन करताना सांगितले, या स्वातंत्र्यदिनी कोणाला तरी जीवनाची अमूल्य भेट देऊन स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करूया. आपल्या काही मिनिटांच्या वेळेमुळे दुसऱ्याला आयुष्यभराची आशा मिळू शकते. सर्व निरोगी व पात्र नागरिकांनी पुढे येऊन रक्तदान करावे, असे आम्ही आवाहन करीत आहोत.

सर्व पात्र रक्तदात्यांना अल्पोपहार व प्रशंसापत्र देण्यात येणार आहे. नागरिक, युवक, व्यावसायिक तसेच विविध सामाजिक संस्थांनी या समाजोपयोगी उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन स्वातंत्र्यदिनाचा उत्सव अधिक अर्थपूर्ण करावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# सर्वसामान्य गोरगरिब जनतेला उपचारासाठी मेयोमध्ये जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करु

## पालमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मेयोच्या हिरक महोत्सवी वर्षाचा प्रारंभ

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

ग्रामीण भागातील गोरगरिब जनतेसह शहरी भागातील अनेक कुटुंबांच्या आरोग्यासाठी इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने मोठे योगदान दिले आहे. येथील अनेक कुशल डॉक्टरांनी येथे येणाऱ्या रुग्णांच्या चेहऱ्यावर हसू फुलवून त्यांना गंभीर आजारातून बाहेरही काढले आहे. नागपूरच्या वैद्यकीय क्षेत्रातील ऐतिहासिक वाटचालीत मेयो चे अमूल्य योगदान असून या हिरक महोत्सवी वर्षात एआय आधारित अत्याधुनिक सेवा सुविधा देण्यासाठी शासन निधीची कमतरता पडू देणार नाही असे प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या हिरक महोत्सवी वर्षाच्या शुभारंभ समारोहात ते बोलत होते. येथील प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात आयोजित केलेल्या या कार्यक्रमास अधिष्ठाता डॉ. रवी चव्हाण, डॉ. सतिश देवपुजारी, डॉ. भावना सोनवणे, डॉ. राजीव खंडेलवाल, माजी आमदार डॉ. मिलींद माने व मान्यवर उपस्थित होते.

हिरक महोत्सवी वर्षाचा हा मोठा पल्ला आरोग्याच्या दृष्टीने मेयो ने बजावलेल्या कर्तव्यपूर्तीचा आहे. या वाटचालीला अधोरेखित करतांना हाती घेण्यात आलेल्या अनेक लोकाभिमुख उपक्रमांना व रुग्णांच्या सुविधेकरीता ज्या काही बाबी असतील त्या दृष्टीनेही लवकरच महाविद्यालयाच्या समिती सदस्यांसह चर्चा करुन व्यापक आराखडा तयार करु असे पालकमंत्री बावनकुळे यांनी सांगितले. या महाविद्यालयातून



घडलेली अनेक नामांकित डॉक्टरांची फळी आज देशविदेशात कार्यरत आहे. त्यांच्याशी महाविद्यालयाकडून संपर्क साधून रुग्णांवर उपचारासाठी आवाहन केल्यास तेही आपली सेवा उपलब्ध करुन देऊ शकतील असा विश्वास त्यांनी व्यक्त करुन अधिष्ठाता रवी चव्हाण यांच्या कार्यशैलीचा गौरव केला.

यावेळी हिरक महोत्सवाचे औचित्य साधून सुरु केलेल्या डीजीटल मॅमोग्राफी, पेन क्लिनीक, सेंट्रल क्लिनीकल लॅबरोटरीचा रिपोर्ट पेशंटच्या मोबाईलवर उपलब्ध करुन देणाऱ्या अँपचा शुभारंभ पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आला. अधिष्ठाता डॉ. रवी चव्हाण यांनी महाविद्यालयाच्या ऐतिहासिक वाटचालीचा आढावा आपल्या प्रास्ताविकात घेतला.

प्रीनेटल अर्थात गर्भावस्थेतील बालकाच्या हिमोग्लोबीनोपॅथीचे अचूक निदान करणारे हे भारतातील क्रमांक एकचे हॉस्पिटल असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले. कार्यक्रमाचे संचालन व आभार डॉ. गोपाल अग्रवाल यांनी केले.

# युरिया, डीएपीसोबत इतर खतांची किंवा कीटकनाशकांची खरेदी करण्याची सक्ती नको!

## जिल्हा प्रशासन आणि कृषी विभागाच्या सूचना

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** जिल्ह्यात युरिया व डीएपी खतांची विक्री करताना त्यासोबत इतर कोणतेही खत किंवा कीटकनाशक खरेदी करण्याची सक्ती करू नये, अशा सूचना जिल्हा प्रशासन आणि कृषी विभागाने दिल्या आहेत. शेतकऱ्यांना आवश्यक असलेली खते किंवा कीटकनाशके त्यांच्या मागणीनुसार उपलब्ध करून देणे आणि खतविक्री प्रक्रिया पारदर्शक ठेवण्याबाबत खत विक्रेत्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांमध्ये याबाबत जनजागृती व्हावी यासाठी जिल्ह्यातील खतविक्री केंद्रांवर लिंकिंगला नाही म्हणा असे संदेश असलेले पोस्टर्स लावण्यात आले आहेत. युरिया किंवा डीएपी खत खरेदी करताना त्यासोबत इतर कोणतेही खत किंवा कीटकनाशक घेण्याची सक्ती झाल्यास शेतकऱ्यांनी अशा लिंकिंगला स्पष्टपणे नकार द्यावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी खत खरेदी करताना अधिकृत पावती किंवा बिल घ्यावे. कोणत्याही प्रकारची सक्तीची विक्री किंवा लिंकिंग निदर्शनास आल्यास संबंधित खतविक्रेत्याची माहिती कृषी विभागाच्या ९१८५२३१०४७ या व्हॉट्सॲप क्रमांकावर द्यावी. अशा प्रकाराची प्रशासनाकडून तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात येईल. शेतकऱ्यांना आवश्यक असलेली खते किंवा कीटकनाशके त्यांच्या गरजेनुसार उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिकता आहे. युरिया किंवा डीएपी खतासोबत इतर खतांची किंवा कीटकनाशकांची सक्तीने खरेदी करण्यास भाग पाडणे योग्य नाही. खतविक्रेत्यांनी शासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. शेतकऱ्यांनीही कोणत्याही प्रकारची लिंकिंग होऊ नये आणि अशी बाब निदर्शनास आल्यास तत्काळ कृषी विभागाच्या निदर्शनास आणून द्यावी. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.

# त्या विद्यार्थीनींच्या हाकेला जिल्हा प्रशासनाची तत्पर साद

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी डोंगरगाव येथे जाऊन विद्यार्थीनींशी साधला संवाद, खेतापूर-नागपूर बससेवा सुरु



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



कुही तालुक्यातील खेतापूर हे दुर्गम क्षेत्रातील छाटेसे गाव. येथील मुली माध्यमिक शिक्षणासाठी ७ किलोमीटर अंतरावर असलेल्या डोंगरगाव येथे जाणे-येणे करतात. एसटी बसची सुविधा नसल्याने इयत्ता नववीमध्ये शिकणाऱ्या टीना वैकुंठे या विद्यार्थीनीने आपली व्यथा सामाजिक माध्यमांवर व्यक्त केली. गावाची एकूण परिस्थिती लक्षात घेता जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी तत्पर धाव घेऊन थेट खेतापूर गाठले. टीना व तिच्या सोबत शिकणाऱ्या गावातील मुलींशी त्यांनी थेट संवाद साधून बस समवेत इतरही अडचणी समजून घेतल्या. भेटी दरम्यानच त्यांनी राज्य परिवहन महामंडळाला सांगून लगेच खेतापूर ते नागपूर अशा एसटी बसचा टीनासह मैत्रिणींच्या हस्ते शुभारंभ करुन प्रशासनाच्या तत्परतेचा प्रत्यय दिला.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी गावाला प्रत्यक्ष भेटीत इतरही प्रश्न गावकऱ्यांकडून समजून घेतले. खेतापूर ते डोंगरगाव रस्ता दुरुस्तीच्या कामाचा आढावा घेऊन येत्या सप्टेंबर महिन्यापासून हे काम सुरु करण्याचे निर्देश त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले. सदर काम अमृतकाल योजनेंतर्गत समाविष्ट करण्याचेही त्यांनी सांगितले. एसटी बसच्या सुविधेसमवेत नागपूर महानगर पालिकेच्या बस सुविधेचाही खेतापूर गावाला सुविधा मिळण्याबाबत प्रयत्न करु असे त्यांनी सांगितले. गावातील गोपाळ समाजाचे झुडपी जंगल जमिनीवर असलेले अतिक्रमण न्यायालयाच्या निर्णयानुसार नियमाकुल करणे, पाळीव जनावरांवर होणारे वाघांचे हल्ले कमी करण्यासाठी वन विभागामार्फत नियोजन या बाबतही त्यांनी ग्रामस्थांना आश्वस्त केले. यावेळी आमदार डॉ संजय मेश्राम, तहसिलदार अमित घाडगे, सरपंच प्रदीप खोब्रागडे व ग्रामस्थ उपस्थित होते.

# नगरपंचायतीच्या "टेंडर"मध्ये "वंडर "

## ४० टक्के बिलोच्या निविदा रिजेक्ट, मात्र १ टक्का बिलोच्या मंजूर, फेरनिविदा प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर उपनगराध्यक्षांसह नगरसेवकांचे प्रश्नचिन्ह

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

नगरपंचायत अंतर्गत नाली, रस्ते आणि इतर बांधकामांसाठी अंदाजे अडीज कोटींच्या कामाच्या राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेवर आता संशयाचे सावट निर्माण झाले आहे. पहिल्या निविदेत कंत्राटदारांनी तब्बल ४० टक्के बिलो (कमी) दराने बोली सादर केल्यानंतर खुलासा मागविण्यात आला. मात्र खुलासा न आल्याने प्रक्रिया रद्द करून फेरनिविदा काढण्यात आली. विशेष म्हणजे फेरनिविदेत त्याच बांधकामांसाठी दर थेट १ टक्के बिलो (कमी) इतका राहिला आणि पुन्हा त्याच १५ कंत्राटदारांची निविदा मंजूर झाल्याने निविदा प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.



यासंदर्भात उपनगराध्यक्ष प्रकाश पंजलवार स्वच्छता व सार्वजनिक आरोग्य सभापती मिथिला तिडके व नऊ नगरसेवकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे १४ ऑगस्ट रोजी तक्रार अर्ज दाखल करून संपूर्ण निविदा प्रक्रियेची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

तक्रारीनुसार, पहिल्या निविदेत ४० टक्के कमी दराने निविदा सादर झाल्याने स्थायी समितीने कंत्राटदारांकडून खुलासा मागविला होता. मात्र खुलासा सादर न झाल्याने निविदा प्रक्रिया रद्द करून फेरनिविदा काढण्याचा निर्णय घेण्यात आला.

यानंतर २७ जुलै रोजी झालेल्या स्थायी समितीच्या सभेत फेरनिविदा मंजुरीसाठी ठेवण्यात आल्यात. या बैठकीस संबंधित सभापती वैयक्तिक कारणास्तव उपस्थित राहू शकणार नसल्याचे पूर्वीच कळविण्यात आले असतानाही निविदा मंजूर करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

४० टक्के कमी दरावरून थेट १ टक्के कमी दरावर आलेली बोली आणि त्याच कंत्राटदारांना मिळालेली मंजुरी हा निव्वळ योगायोग की निविदा प्रक्रियेतील संगनमत? असा सवाल तक्रारदारांनी उपस्थित केला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासन या तक्रारीची कितपत दखल घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

कंत्राटदारांनी पहिल्यांदा सादर केलेल्या निविदा ४० टक्के पर्यंत बिलो दराने होत्या. त्याच कामासाठी फेरनिविदा काढल्यानंतर कंत्राटदारांनी मात्र केवळ १ टक्का बिलो दराने निविदा सादर केल्या. 'दर एवढा कमी कसा?' असा सवाल उपस्थित करत स्थायी समितीने पहिल्या सभेत ४० टक्के बिलो दराच्या निविदा फेटाळून लावल्या. मात्र, त्यानंतर झालेल्या दुसऱ्या सभेत १ टक्का बिलो दराच्या फेरनिविदांना मंजुरी देण्यात आली. त्यामुळे निविदा प्रक्रियेतील या परस्परविरोधी निर्णयांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणात सरळ एक कोटी निधीवर डल्ला मारण्याचा संबंधितांचा प्रयत्न असल्याचा आरोप करण्यात आलं आहे.

# टायटन-सोनाटा कंपनीच्या बनावट घड्याळांचा साठा जप्त : ७८ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

**दै. सिंहवाणी वृत्त,**
**चंद्रपूर-धनंजय पांढरे**

चंद्रपूर शहरातील एकोरी वॉर्ड परिसरातील योगी वॉच सेंटर या दुकानावर पोलिसांनी कारवाई करून टायटन आणि सोनाटा कंपनीच्या नावाने तयार करण्यात आलेला बनावट घड्याळांचा साठा जप्त केला. या कारवाईत ७८ हजार २२५ रुपये किमतीचा बनावट मुद्देमाल पोलिसांच्या हाती लागला. याप्रकरणी दुकानमालका विरुद्ध कॉपीराइट व ट्रेडमार्क कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




टायटन कंपनीच्या उत्पादनांची बनावट करून त्यांची विक्री होत असल्याची माहिती कंपनीच्या अधिकृत प्रतिनिधींना मिळाली होती. त्यानुसार एसएनजी सॉलिसिटर एलएलपी कंपनीचे प्रतिनिधी गौरव तिवारी यांनी चंद्रपूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून कारवाईसाठी पोलिसांची मदत मागितली. कंपनीचे इन्व्हेस्टिगेशन ऑफिसर उन्मेश किशोर शहा यांच्या माध्यमातून मिळालेल्या माहितीनंतर पोलिसांनी ही कारवाई केली.

चंद्रपूर शहर पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी कंपनीच्या प्रतिनिधींसोबत एकोरी वॉडार्तील योगी वॉच सेंटर येथे पोहोचले. यावेळी दुकानमालक किशोर मध्युजी तेलरांधे (वय ५६) हे दुकानात उपस्थित होते. पोलिसांनी दुकानाची झडती घेतली असता टायटन व सोनाटा कंपनीच्या नावाने बनावट डायल, मशीन नसलेली घड्याळे, डायल केस, घड्याळांच्या चेन तसेच डब्यासह घड्याळे असा मोठ्या प्रमाणात साठा आढळून आला.

पोलिसांनी केलेल्या जप्तीनुसार सोनाटा कंपनीचे डायल १२० नग, टायटनचे डायल, मशीन नसलेली टायटन व सोनाटा घड्याळे, टायटन व सोनाटा कंपनीचे डायल केस, टायटनच्या २७ चेन, सोनाटाच्या ३४ चेन तसेच डब्यासह सोनाटा घड्याळे असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या सर्व मुद्देमालाची एकूण किंमत ७८ हजार २२५ रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

जप्त करण्यात आलेल्या वस्तूंची तपासणी करून त्या सीलबंद करण्यात आल्या. दुकानदाराने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी टायटन व सोनाटा कंपनीच्या नावाचा वापर करून बनावट वस्तू विक्रीसाठी साठवून ठेवल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी कॉपीराइट कायदा १९५७ मधील कलम ५१, ६३ व ६५ तसेच ट्रेड मार्क कायद्यातील कलम १०३ व १०४ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

प्रकरणाचा पुढील तपास चंद्रपूर शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार निशिकांत रामटेके करीत आहे.

थोडक्यात

### बेसा, बेलतरोडी आणि कुही येथील घनकचरा व्यवस्थापनाची जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी मोटरसायकलवर केली आकस्मिक पाहणी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
महानगरपालिकेच्या वाढत्या विस्तारासह नागपूर शेजारी असलेल्या बेसा- पिपळा-बेलतराडी व कुही नगरपंचायतीच्या कार्यक्षेत्रात घनकचरा व्यवस्थापनाची आकस्मिक पाहणी करुन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी वस्तुस्थिती समजून घेतली. या आकस्मिक पाहणीत स्वत:चे वाहन बाजुला ठेऊन दुचाकी वाहनाद्वारे घनकचरा व्यवस्थापनासह विविध नाल्यांची त्यांनी पाहणी केली.
बेसा-पिपळा-बेलतरोडी या नगरपंचायतीच्या क्षेत्रात ७५ हजार लोकसंख्या आहे. नागपुरातून वाहत जाणारे बहुतांश नाले याच नगरपंचायतीच्या हद्दीतून वाहत पुढे जातात. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने घनकचरा व्यवस्थापन हे अत्यंत महत्वाचे काम असून गावपातळीवर याची अंमलबजावणी कशी केली जाते याचा आढावा त्यांनी आज घेतला. ही नगरपंचायत हरीत ब्रँडने नावारुपास आली आहे. या हद्दीत सुमारे २२ टन घनकचरा गोळा होतो. यातील १३ टन ओला कचरा असून यापासून खत निर्मितीच्या दृष्टीने ४८ कम्पोस्ट पीट तयार आहेत. कुही नगरपंचायतीत १० हजार ७०० लोकसंख्या असून येथे दररोज दीड ते दोन टन कचरा संकलीत होतो.

## मौदा येथे तिरंगा रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
हर घर तिरंगा अभियानाच्या निमित्ताने मौदा येथे भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. तिरंगा हा आपल्या स्वातंत्र्याचा, शौर्याचा आणि राष्ट्राभिमानाचा प्रतीक असून, या रॅलीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना अधिक दृढ करण्याचा संदेश देण्यात आला.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राला एकत्र आणणारी हर घर तिरंगा आणि तिरंगा रॅली ही संकल्पना देऊन संपूर्ण देशात राष्ट्रभक्तीची अभूतपूर्व भावना निर्माण केली आहे. या रॅलीला नागरिक आणि तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सशक्त राष्ट्र घडविण्याच्या या संकल्पनेत सर्वांनी योगदान द्यावे, असे आवाहन याप्रसंगी उपस्थितांना केले.
यावेळी विधानपरिषद आमदार डॉ. राजीवजश पोद्दार, भाजपा जिल्हाध्यक्ष आनंद राऊत, माजी आमदार टेकचंद सावरकर, भाजपा जिल्हा महामंत्री अनिल निदान, राहुल किरपाण, भाजपा जिल्हा महिला अध्यक्ष प्रीति मानमोडे, भाजपा मौदा तालुका अध्यक्ष भगवान बावनकुळे, भाजपा मौदा तालुका प्रभारी तथा तालुका समन्वय समिती अध्यक्ष नरेश मोटघरे,मौदा शहराध्यक्ष रमेश कुंभलकर, चाचेर मंडळ अध्यक्ष रवींद्र चव्हाण, नगराध्यक्ष नगरपंचायत मौदा प्रसन्ना (राजाभाऊ) तिडके, माजी भाजपा तालुकाध्यक्ष मुकेश अग्रवाल, माजी जि प सदस्या राधा मुकेश अग्रवाल,जिल्हा युवा मोर्चा अध्यक्ष रामटेक ग्रामीण चेतन खडसे, उपाध्यक्ष वीरेंद्र पायतोडे तसेच नगरसेवक मोरेश्वर सोरते, राहुल पोटभरे,उमेश गभणे, राजू सोमनाथे, नगरसेविका पद्मावती चलसानी, श्रीमती पोटभरे, तहसीलदार निंबाळकर, गटविकास अधिकारी बहेकर, नगरपरिषद मुख्याधिकारी मेश्राम यांच्यासह माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महापौर यांच्या हस्ते आज मनपात राष्ट्रध्वजारोहण

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
भारतीय स्वातंत्र्याच्या ८०व्या वर्धापन दिनानिमित्त नागपूर महानगरपालिकेच्या वतीने शनिवार १५ ऑगस्ट रोजी सकाळी ८.०५ वाजता सिव्हील लाईन्स स्थित मनपा मुख्यालयातील हिरवळीवर राष्ट्रध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते राष्ट्रध्वजारोहण होणार आहे. कार्यक्रमाला उपमहापौर लीला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, विरोधी पक्षनेते श्री. संजय महाकाळकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन, अतिरिक्त आयुक्त अंकित, अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम, अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, एआयएमआयएमचे गटनेते शकील पटेल, इंडिअन मुस्लिम लीगचे गटनेते असलम खान मुल्ला, शिवसेना (उबाठा) गटनेते किशोर कुमेरिया, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अप) गटनेते आभा पांडे, बहुजन समाज पार्टीच्या गटनेत्या हर्षला जेस्वाल, शिवसेना गटनेते गणेश चार्लेवार, धरमपेठ झोन सभापती धनश्री देशपांडे, नगरसेविका योगिता तेलंग, माधुरी टेकाम, नगरसेवक विनोद कन्हेरे आणि अभिजित झा उपस्थित राहणार आहेत. नागरिकांनी देखील मोठ्यासंख्येत उपस्थित राहावे असे आवाहन मनपाचे उपायुक्त निर्भय जैन यांनी केले आहे.



# कळमेश्वरमध्ये देशभक्तीच्या जल्लोषात भव्य तिरंगा बाईक रॅली

### शेतकरी माझा दैवत, एमआयडीसीसाठी जाणाऱ्या जमिनीला योग्य मोबदलामिळवून देणार, सावनेर-कळमेश्वरमध्ये उद्योगांच्या माध्यमातून झेन झी पिढीसाठी मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती करणार : आमदार डॉ. आशिषराव देशमुख





**दै. सिंहवाणी वृत्त, कळमेश्वर**
हर घर तिरंगा अभियानाच्या माध्यमातून राष्ट्रध्वजाबद्दल अभिमान, देशभक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने सावनेर-कळमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांच्या पुढाकारातून कळमेश्वर येथे शुक्रवारी भव्य तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. हातात तिरंगा घेऊन, भारतमातेच्या जयघोषात सहभागी झालेल्या नागरिकांमुळे संपूर्ण कळमेश्वर शहरात देशभक्तीचा उत्साह संचारला होता.
चला... तिरंगा हातात घेऊया, राष्ट्रप्रेमाची एकजूट दाखवूया! या संदेशाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. युवक, युवती, शेतकरी, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी झाले.
यावेळी आमदार डॉ. आशिषराव देशमुख म्हणाले, तिरंगा हा केवळ आपल्या देशाचा ध्वज नसून तो स्वातंत्र्य, त्याग, एकता आणि राष्ट्राभिमानाचे प्रतीक आहे. भारताला २०४७ पर्यंत विकसित आणि जगात अग्रस्थानी असलेला देश बनविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने निष्ठेने व कर्तव्यभावनेने काम केले पाहिजे. आर्थिकदृष्ट्या सक्षम भारत आणि उज्ज्वल भारताच्या निर्मितीसाठी आपण सर्वांनी एकजुटीने पुढे जाण्याची गरज आहे.
झेन झी पिढीच्या उज्ज्वल भविष्यासाठी सावनेर-कळमेश्वर परिसरात मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती करण्याचा आपला संकल्प आहे, असे सांगताना ते म्हणाले, कळमेश्वर तालुक्यातील लिंगा परिसरातील कोलगॅसिफिकेशनचा प्रस्तावित मोठा प्रकल्प, सावनेर तालुक्यातील सुमारे ६,४०० एकर क्षेत्रातील मोठी एमआयडीसी तसेच खत प्रकल्पांसारख्या उद्योगांच्या माध्यमातून या भागात रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. युवकांना चांगले शिक्षण आणि स्थानिक पातळीवर रोजगार मिळावा, यासाठी दिवस-रात्र प्रयत्न सुरू आहेत. उद्योग आले तर रोजगार निर्माण होईल आणि प्रत्येक कुटुंबाची आर्थिक समृद्धी वाढेल.
यावेळी एमआयडीसीसाठी जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांच्या मोबदल्याचा मुद्दा उपस्थित करत आमदार देशमुख यांनी स्पष्ट भूमिका मांडली. शेतकरी हा माझा दैवत आहे. सावनेर-कळमेश्वर परिसरातील नऊ गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनी एमआयडीसीसाठी घेतल्या जात असतील, तर त्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य आणि जास्तीत जास्त मोबदला मिळालाच पाहिजे. बाजारभावापेक्षा योग्य व समाधानकारक मोबदला मिळवून देण्यासाठी शासनाकडे ठामपणे पाठपुरावा करू. शेतकऱ्यांच्या हिताशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.
महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या भावना लक्षात घेऊन जमिनीचा दर निश्चित करताना शेतकऱ्यांना न्याय मिळेल, असा जास्तीत जास्त योग्य दर निश्चित करावा, अशी मागणीही त्यांनी केली. शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळाला नाही तर त्यांच्या हक्कासाठी लोकशाही मार्गाने संघर्ष करण्यासही आपण मागे हटणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.
रॅलीदरम्यान 'जय हिंद! जय भारत!', 'भारत माता की जय!' अशा घोषणांनी कळमेश्वरचा परिसर दुमदुमून गेला. तिरंग्याच्या सन्मानार्थ आयोजित या रॅलीतून स्वातंत्र्य, राष्ट्रीय एकता, राष्ट्राभिमान आणि विकसित भारताचा संकल्प नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला. याप्रसंगी आमदार डॉ. राजीव पोतदार, मनोहर कुंभारे, अशोक धोटे, प्रिया मानकर, मीना तायवाडे, नितीन गेडाम यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, शासकीय अधिकारी-कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भारतीय जनता पार्टी, सावनेर-कळमेश्वर विधानसभा क्षेत्राच्या आयोजनातून झालेल्या या तिरंगा बाईक रॅलीने स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला कळमेश्वरमध्ये देशभक्तीचा उत्साह निर्माण करत 'राष्ट्र प्रथम आणि विकासासाठी एकजूट' असा संदेश दिला.

# ५० हजारांच्या लाच प्रकरणात मोठी अपडेट : सचिन कातुरेला ३ दिवसांचा पीसीआर

### लाचलूचपत तपासाची व्याप्ती वाढली, आरटीओमधील कथित नेटवर्कपर्यंत पोहोचण्याच्या हालचालींना वेग, कलसी आणि सोलंकर यांच्याशी संबंधित संपर्कांचीही तपासणी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर ग्रामीण आरटीओशी संबंधित कथित लाच प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई आता महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचली आहे. ५० हजारांची कथित लाच स्वीकारताना पकडण्यात आलेल्या सचिन पुरुषोत्तम कातुरे याला न्यायालयाने ३ दिवसांच्या पोलीस कोठडी रिमांडवर पाठवले आहे. कातुरेच्या अटकेनंतर आता अडइ चा तपास केवळ लाचेच्या रकमेसंदर्भात मर्यादित न राहता त्याचे कथित संपर्क आणि फ्लड शी संबंधित संभाव्य नेटवर्कच्या दिशेने पुढे जाण्याची शक्यता आहे.

**पीसीआरमध्ये कातुरेकडून अनेक प्रश्नांची उत्तरे शोधणार लाचलुचपत विभाग**

लाचलुचपत विभागासाठी पुढील तीन दिवसांची चौकशी महत्त्वाची मानली जात आहे. कथित ५० हजारांची रक्कम कोणत्या कामासाठी मागण्यात आली होती, ती कोणाच्या सांगण्यावरून घेण्यात आली आणि कातुरेचा आरटीओ मधील कोणत्या अधिकाऱ्यांशी तसेच वाहनमालक किंवा ट्रान्सपोर्टर्सशी संपर्क होता, याचा तपास केला जाऊ शकतो.
तपासादरम्यान मोबाईल फोन, कॉल डिटेल्स, चॅट, बँक व्यवहार आणि इतर आर्थिक व्यवहारांची तपासणी महत्त्वाची ठरू शकते. यामुळे कातुरेची भूमिका केवळ कथित मध्यस्थापर्यंत मर्यादित होती की त्यामागे आणखी मोठे नेटवर्क कार्यरत होते, याबाबत माहिती मिळण्याची शक्यता आहे.

**कलसी आणि सोलंकर यांच्या कथित संपर्कांवरही नजर**

या प्रकरणात कलसी आणि सोलंकर यांची नावेही चर्चेत आहेत. यापूर्वी या अधिकाऱ्यांवर ओव्हरलोड वाहनांकडून कथित वसुली केल्याचे आरोप झाल्याचे समोर आले होते. संबंधित पक्षांनी त्यावेळी हे आरोप निराधार असल्याचे सांगितले होते. आता कातुरेच्या अटकेनंतर तपासाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे कातुरे आणि या अधिकाऱ्यांमध्ये नेमक्या कोणत्या प्रकारचे संपर्क होते? त्यांच्यामध्ये कोणते व्यवहार किंवा संभाषण झाले होते का? याचा तपास होण्याची शक्यता आहे. मात्र, कोणत्याही अधिकाऱ्याच्या भूमिकेबाबत सध्या कोणताही निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. तपासादरम्यान ठोस कागदपत्रे, डिजिटल पुरावे किंवा आर्थिक व्यवहार समोर आल्यानंतरच पुढील कारवाईचे चित्र स्पष्ट होईल.

**ओव्हरलोड वसुलीच्या कथित नेटवर्कचीही चौकशी?**

नागपूरमध्ये ओव्हरलोड वाहनांबाबत वेळोवेळी कथित अवैध वसुलीचे आरोप समोर आले आहेत. त्यामुळे कातुरेच्या अटकेनंतर हे प्रकरण पुन्हा चर्चेत आले आहे. कातुरेचा कोणकोणत्या ट्रान्सपोर्टर्स आणि वाहनमालकांशी संपर्क होता, तसेच कथितरित्या कोणत्या अधिकाऱ्यांच्या नावाचा वापर करून पैशांची मागणी केली जात होती, याचा तपास करू शकते. कातुरेच्या चौकशीत आणि उपलब्ध डिजिटल अथवा आर्थिक पुराव्यांमधून कोणती ठोस कडी समोर आल्यास तपासाची व्याप्ती आणखी वाढण्याची शक्यता आहे.

**फक्त कातुरेपर्यंत कारवाई की संपूर्ण नेटवर्कचा पर्दाफाश?**

आता सर्वात मोठा प्रश्न म्हणजे एसीबीची कारवाई केवळ सचिन कातुरेपर्यंत मर्यादित राहणार की आरटीओशी संबंधित कथित संपूर्ण नेटवर्कपर्यंत तपास पोहोचणार?

## उमरेड उपविभागातील कर्जमाफीची स्थिती, आधार प्रमाणीकरणासाठी प्रशासनाची धावपळ

### उमरेड ७९३, कुही ८४७ तर भिवापूरमधील २२७ खातेदारांचे आधार प्रमाणीकरण प्रलंबित

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
महाराष्ट्र शासनाच्या पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर कर्जमाफी योजनेअंतर्गत उमरेड उपविभागातील उमरेड, कुही आणि भिवापूर तालुक्यातील पात्र शेतकरी खातेदारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीमध्ये उमरेड तालुक्यात २,२८०, कुही तालुक्यात २,७६० तर भिवापूर तालुक्यात ७११ खातेदारांचा समावेश आहे. मात्र, यापैकी काही खातेदारांचे आधार प्रमाणीकरण अद्याप पूर्ण झालेले नाही. उमरेड तालुक्यात ७९३, कुही तालुक्यात ८४७ आणि भिवापूर तालुक्यात २२७ खातेदारांचे आधार प्रमाणीकरण प्रलंबित आहे.
ही माहिती उमरेडचे उपविभागीय अधिकारी विज्ञासागर चव्हाण यांनी दिली. प्रलंबित आधार प्रमाणीकरण पूर्ण करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी, गटविकास अधिकारी, तहसीलदार आणि सहायक निबंधक यांची बैठक घेऊन दररोज विशेष कॅम्प आयोजित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार उमरेड उपविभागात आधार प्रमाणीकरण व इ्ड पूर्ण करण्याची कार्यवाही सुरू आहे.
कर्जमाफी योजनेच्या लाभार्थी शेतकऱ्यांनी तातडीने आधार प्रमाणीकरण पूर्ण करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. कर्जमाफीबाबत कोणतीही अडचण किंवा शंका असल्यास संबंधित तालुक्यातील सहकार विभागाच्या सहायक निबंधक कार्यालयाशी संपर्क साधावा. अडचणी लेखी किंवा ऑनलाइन स्वरूपात Grievance म्हणून नोंदविता येणार आहेत. शेतकऱ्यांनी संधी दवडू नये, आधार प्रमाणीकरण पूर्ण करून कर्जमाफीचा लाभ घ्यावा!

# शहरातील अतिक्रमणाचा सर्वे त्वरित पूर्ण करा!

### आयुक्त डॉ. विपीन यांचे सर्व विभागांना निर्देश



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
शहराच्या हद्दीतील सरकारी जागांवर तसेच रस्त्यांवर असलेल्या अतिक्रमणाचा सर्वेक्षण मनपा, जिल्हाधिकारी कार्यालय, नासुप्र, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी त्वरित पूर्ण करावा, असे निर्देश नागपूर जिल्हा अतिक्रमण कारवाई कृती दलाचे अध्यक्ष तथा मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी दिले. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत नागपूर जिल्ह्यातील अतिक्रमणे हटविण्यासाठी आयुक्त डॉ. विपीन यांच्या अध्यक्षतेखाली कृती दल गठीत करण्यात आला आहे. याबाबत बैठक आयुक्त डॉ. विपीन यांच्या अध्यक्षतेखाली आज (ता. १४) आयुक्त कार्यालयातील सभाकक्षात पार पडली. यावेळी अतिरिक्त आयुक्त अंकित, अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम, अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, पोलीस उपायुक्त (वाहतूक) आदित्य मिरखेलकर, म्हाडाचे मुख्य अधिकारी डॉ. विजय इंगोले, मुख्य अभियंता लिना उपाध्ये, नासुप्रचे अधीक्षक अभियंता भांडारकर, उपायुक्त निर्भय जैन, उपायुक्त मंगेश खवले, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, अधीक्षक अभियंता विजय गुरुबक्षानी, निगम सचिव डॉ. रंजना लाडे, महावितरणच्या कार्यकारी अभियंता प्रिती फुले, कार्यकारी अभियंता कमलेश चव्हाण यांच्यासह सर्व झोनचे सहाय्यक आयुक्त उपस्थित होते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता निता ठाकरे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे यांनी या बैठकीत ऑनलाईन सहभाग घेतला.
यावेळी बोलताना आयुक्त डॉ. विपीन यांनी सर्व विभागांनी समन्वयाने अतिक्रमण हटवावी कारवाई करण्याचे निर्देश दिले. पोलिस संरक्षणासाठी पोलिसांशी आधीच संपर्क साधावा. बांधकाम पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या जेसीबी किंवा इतर सामुग्री मनपातर्फे पुरविण्यात येईल. तसेच झोन स्तरावर अतिक्रमण कारवाई पूर्ण करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ नियुक्त करण्याच्या सूचना डॉ. विपीन यांनी सहाय्यक आयुक्तांना दिल्या. अतिक्रमण असलेल्या सर्व जागांचा तसेच रस्त्यावरील अतिक्रमणाचा जागेवर जाऊन किंवा एआयच्या सहाय्याने सर्वे पूर्ण करावा. तसेच मनपातर्फे अतिक्रमण हटविण्यासाठी दिलेल्या नोटीसची मुदत संपलेले बांधकाम तात्काळ तोडावे, असेही निर्देश त्यांनी दिले.

**खुल्या जागांवर कंपाउंडिंग करा**

खुल्या जागेवरील अतिक्रमण काढल्यानंतर मनपाने तात्काळ संरक्षण भिंतीचे काम करण्याचे तसेच काही ठिकाणी बोलार्ड लावण्याच्या सूचना देण्यात आल्या. खुल्या जागेवरील अतिक्रमणे काढल्यानंतर तेथे पुन्हा अतिक्रमण होणार नाही, याची काळजी अधिकाऱ्यांनी घ्यावी, अशी सूचना डॉ. विपीन यांनी यावेळी केली.

# मनपा मुख्यालयात 'हर घर तिरंगा' अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

सर्व कर्मचाऱ्यांना राष्ट्रध्वजाचे वाटप





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर महानगरपालिका मुख्यालयात 'हर घर तिरंगा' अंतर्गत कर्मचाऱ्यांना व उपस्थितांना आज (ता.१४) राष्ट्रध्वजाचे वाटप करण्यात आले. यावेळी 'भारत माता की जय',' वंदे मातरम' असे देशभक्तीपर घोषणा देत वातावरण निर्मिती करण्यात आली.
यावेळी महापौर निता ठाकरे, सत्तापक्ष नेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे, मनपा आयुक्त डॉ. विपीन, अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, उपायुक्त निर्भय जैन, मंगेश खवले, मुख्य वित्त अधिकारी सदाशिव शेळके, नगरसेवक देवेंद्र मेहर, कार्यकारी अभियंता राजीव गौतम, सुनील गजभिये, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, सुनील कांबळे, प्रमोद हिवसे, जितेश धकाते, यांच्यासह इतर कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते. राष्ट्रध्वजाचा सन्मान, देशभक्तीची भावना आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश जनमानसात पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.
तत्पूर्वी नागपूर महानगरपालिकेच्या वतीने कस्तुरचंद पार्क येथे आयोजित फाळणी भयावहता स्मृती दिन कार्यक्रमाच्या मध्यामातून विभाजन विभिषिकेच्या भयावह स्मृतींची माहिती देण्यात आली. माजी महापौर दयाशंकर तिवारी यांनी उपस्थितांना भयावह स्मृतींची माहिती दिली. यावेळी मनपाच्या स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, मनपाचे अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, मुख्य अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके, क्रीडा अधिकारी डॉ. पियूष अंबुलकर यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.
यावेळी ध्वज फडकवून भारताच्या फाळणीदरम्यान प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य निर्दोष नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. फाळणीच्या काळातील अमानुष अत्याचार, विस्थापन आणि असंख्य कुटुंबांच्या दुःखद आठवणींचे स्मरण करत, राष्ट्राची अखंडता, एकता आणि बंधुभाव अधिक दृढ करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

थोडक्यात

## महादुला कोराडी येथे तिरंगा रॅलीला उदंड प्रतिसाद




**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**
कोराडी भारतमाता चौक येथून तिरंगा रॅली चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री, म. राज्य. यांच्या नेतृत्वात शुभारंभ झाला. या तिरंगा रॅलीमध्ये भाजपा नागपुर जिल्हाध्यक्ष, आनंदराव राऊत, माजी नगराध्यक्ष महादुला तथा भाजपा नागपूर जिल्हा उपाध्यक्ष राजेश रंगारी, महादुला नगरपंचायतच्या नगराध्यक्षा हेमलता मनोज सावजी, सामाजिक कार्यकर्ते मनोज ठाकूर (सावजी), माजी सरपंच कोराडी नरेंद्र धनुले, भाजपा नागपूर जिल्हा महामंत्री अनिल निदान, नगरउपाध्यक्ष वैशाली पखिड्डे, भाजपाचे महादुला अध्यक्ष सचिन पाटील, सामाजिक कार्यकर्ते दीपक जैन, बाबुराव सोनवणे, नगरसेवक राज उईके, मोन्टू कुथे, प्रीतम लोहसारवा, गटनेते अभिजित ढेंगरे, भूषण ढेंगरे, शोएब शेख, अंकित तुरक, सावरकर ग्रामपंचायत सदस्य कोराडी, यांचेसह मोठ्याप्रमाणात सर्व शाळा कॉलेजचे युवक युवती देखील सहभागी झालेले होते. रॅलीला सुरुवात भारत माता चौक, तालुका क्रीडासंकुल, तायवाडे कॉलेज रोड, झेंडाचौक, महाराष्ट्र बँक चौक, महादुला टी पॉईंट, करेमोरे कॉम्प्लेक्स चौक ते पुन्हा पायदळ रॅली तालुका क्रीडा संकुलात आली, प्रत्येका जवळ तिरंगा ध्वज, फडकत होता मुलांनी गालावर तिरंगा स्टिकर्स लावलेले होते. प्रत्येक घरावर देखील तिरंगा मोठ्या डौलाने फडकत होता. भारत माता की जय, वंदे मातरम्‌च्या जयघोषाने परिसर दुमदुमला, यात सामाजिक शैक्षणिक संस्था, सेवानंद हायस्कूल, तायवाडे शारीरिक कॉलेज, विद्यामंदिर, प्रागतिक, क्रीडाप्रेमी, सामाजिकसंस्था सहभागी होत्या ठिकठिकाणी रस्त्यावर रॅलीचे स्वागत करण्यात आले. मोठ्या देशभक्तीमय सुरेल गीतांनी कार्यक्रमाची सांगता झाली.

## तिरंग्याच्या साक्षीने सायकल रॅलीतून पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश




**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर हर घर तिरंगा अभियानांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंडली येथे सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. तिरंगा हातात घेऊन सायकलवरून निघालेल्या विद्यार्थ्यांनी देशप्रेमासोबतच पर्यावरण संवर्धन, प्रदूषणमुक्ती आणि निरोगी जीवनशैलीचा अनोखा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचवला. सायकल चालवा, प्रदूषण टाळा; निसर्ग वाचवा, देश घडवा! अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. सायकल हे पर्यावरणपूरक वाहतुकीचे साधन असून त्यातून इंधनाची बचत, वायुप्रदूषणात घट आणि शारीरिक व्यायाम असे अनेक फायदे होतात, हा संदेश विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दिला.
शाळेच्या मुख्याध्यापिका कु. अनुराधा धुर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक शिक्षक निलेश जाधव यांनी रॅलीचे नियोजन व आयोजन केले. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना रुजविण्यासोबतच माझा देश - माझी जबाबदारी, माझा निसर्ग - माझी जबाबदारी ही जाणीव निर्माण करण्याचा या उपक्रमाचा उद्देश होता. या रॅलीत पालक तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांच्या हातातील तिरंगा, सायकली आणि पर्यावरणपूरक संदेश यामुळे गावातील नागरिकांचे लक्ष वेधले गेले. विद्यार्थ्यांनी दिलेला हा संदेश केवळ रॅलीपुरता मर्यादित न राहता प्रत्येक घरापर्यंत आणि प्रत्येक मनापर्यंत पोहोचावा, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. 'हर घर तिरंगा'सोबत हर घर पर्यावरणप्रेमी होऊ दे, प्रत्येक सायकलच्या चाकातून स्वच्छ भारताचा संकल्प घडू दे! विद्यार्थ्यांच्या माध्यमातून राष्ट्रप्रेमाला पर्यावरणप्रेमाची जोड देणारा हा अभिनव उपक्रम गावकऱ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरला.

## येसंबा येथे अंगणवाडीत गणवेश वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
आज शुक्रवार (ता. १४ ऑगस्ट) रोजी अंगणवाडी येसंबा येथे १५ ऑगस्ट निमित्त उपसरपंच धनराज हारोडे यांच्या हस्ते मुलांना गणवेश वाटप करण्यात आले. याप्रसंगी ग्रामपंचायत अधिकारी विनोद तागडे, ग्रा. पं. सदस्य देवानंद गजभिये, संगणक परिचालक मिनाक्षी कारोंडे, अंगणवाडी सेविका माया चकोले, मदतनीस कांता गजभिये उपस्थित होते.

## धरमपेठ झोन अंतर्गत अनधिकृत बांधकाम कारवाई

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर महानगरपालिकेच्या अतिक्रमण पथकाद्वारे आज, दिनांक १४ ऑगस्ट २०२६ रोजी सिव्हिल लाईन्स येथील 'स्वागत लॉन' (हिरामण थाळी) मधील अनधिकृत बांधकामावर अतिक्रमण धडक कारवाई करण्यात आली. ही कारवाई धरमपेठ झोनचे सहाय्यक आयुक्त व सिताबर्डी पोलीस स्टेशनचे पी.एस.आय श्री. विनोद जनबंधू सर, अतिक्रमण विभाग, एनडीएस धरमपेठ झोनचे अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत पार पडली. कारवाई सुरू असतानाच, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी बुधवार, दिनांक १९/०८/२०२६ पर्यंत सदर कारवाईला स्थगनादेश दिला.

## भव्य तिरंगा रॅलीने जरीपटका परिसर दुमदुमला

### फाळणी भयावहता स्मृती दिन कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
फाळणी भयावहता स्मृती दिनानिमित्त आज जरीपटका येथील जिंजर मॉलपासून आज (ता. १४) भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. या रॅलीचे नेतृत्व नगरसेवक विक्की कुकरेजा यांनी केले. रॅलीचा समारोप माजी महापौर दयाशंकर तिवारी यांच्या उपस्थितीमध्ये वसंत शाह चौकात झाला. देशभक्तीच्या घोषणांनी परिसर दुमदुमला होता. यात मोठ्या प्रमाणावर नागरिक सामील झाले होते.
यावेळी, दुर्बल घटक समितीच्या सभापती कु. लक्ष्मी हत्तीठेले, नगरसेविका श्रीमती प्रमिला मथरानी, नगरसेविका निरंजना पाटील, नगरसेविका सुषमा चौधरी, नगरसेवक शेषराव गोतमारे, नगरसेवक संजय चावरे, माजी आमदार डॉ. मिलिंद माने, माजी उपमहापौर संदीप जाधव उत्तर नागपूर भाजपचे प्रमुख संजय चौधरी, जितेंद्र ठाकूर, गणेश कानतोडे, अमित पांडे, उपायुक्त अशोक गराटे, क्रीडा अधिकारी डॉ. पियूष अंबुलकर उपस्थित होते.
या रॅलीत जवळपास ३०० मीटर लांब तिरंगा ध्वज या रॅलीचे विशेष आकर्षण होते. तिरंगे की आन रहे, भारत की शान रहे अशा घोषणा देत तरुण, तरुणी नागरिकांनी या रॅलीत उत्स्फूर्तपणे भाग घेतला. यावेळी बोलताना नगरसेवक विक्की कुकरेजा यांनी फाळणीच्या दुःखाचे कथन केले. पाकिस्तानमधून आलेल्या सिंधी बांधवांना या कटू प्रसंगाला सामोरे जावे लागले. याच फाळणीग्रस्त परिवाराचा मी सदस्य असल्याचे त्यांनी सांगितले. या रॅलीचा समारोप करताना माजी महापौर दयाशंकर तिवारी म्हणाले, १८५७ मध्ये झालेल्या स्वातंत्र्य युद्धात हिंदू व मुसलमान एकत्रितपणे इंग्रजांचा सामना केला. परंतु हिंदू-मुस्लिम एकत्रित राहिले तर राज्य करणे कठीण जाईल, हे लक्षात आल्यानंतर इंग्रज सरकारने फूट टाका व राज्य करा हे धोरण अंमलात आणले.

## चाचेर येथे १५ ऑगस्ट निमित्त अंगणवाडीतील ५ शाखेतील सर्वच बालकांना गणवेश, शूज, टाय, नॅपकिन वाटप

### सरपंच लुंबिनी कलारे यांच्या हस्ते वाटप, बालकांच्या चेहऱ्यावर आनंद



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
स्वातंत्र्याचा ७९ वा अमृत महोत्सव चाचेर येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने ग्रामपंचायत चाचेरच्या वतीने गावातील अंगणवाडी क्र. १, २, ३, ४, ५ मधील सर्व लहान बालक-बालिकांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. ग्रामपंचायतच्या १५ व्या वित्त आयोग निधीतून हा उपक्रम राबविण्यात आला. सरपंच लुंबिनी महेश कलारे यांच्या हस्ते व ग्रामविकास अधिकारी वसंता बावणे, ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या उपस्थितीत वाटप करण्यात आले.
यावेळी मुलांसाठी शर्ट-पॅन्ट, मुलींसाठी फ्रॉक, सर्व बालकांना नवीन बूट,शालेय गणवेशासोबत टॉय, स्वच्छतेच्या दृष्टीने नॅपकिन (रुमाल) वाटप करण्यात आले. साहित्य मिळाल्यानंतर बालकांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होते.
यावेळी बोलताना सरपंच लुंबिनी कलारे म्हणाल्या, "स्वातंत्र्य दिन हा केवळ ध्वजवंदनाचा दिवस नसून, आपल्या गावच्या भवितव्याला घडवण्याचा दिवस आहे. अंगणवाडीतील आमची चिमुकली मुले उद्याचे नागरिक आहेत. त्यांना चांगले शिक्षण, आरोग्य आणि सन्मान मिळाला पाहिजे. म्हणून ग्रामपंचायतीने हा छोटासा प्रयत्न केला आहे. यापुढेही बालकांच्या विकासासाठी ग्रामपंचायत नेहमीच कटिबद्ध राहील."
याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्यगण शैलेश कोपरकर, प्रकाश वाक्कलपूडी, सुरेंद्र टेम्भरे, योगेश निनावे, चंद्रकला धोटे, सुमन सोमकुवर, सविता जांभरे, नलू दरवई, रोशनी किरपाण, ममता चौरे, अंगणवाडी पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका, मदतनीस व मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंगणवाडी सेविकांनी केले.
गणवेश व शूज मिळाल्याने लहान मुलांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. पालकांनी देखील ग्रामपंचायतीच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

## गांगनेर (हिवरा) ते खंडाळा (गांगनेर) दरम्यान रेल्वे उड्डाणपुलाच्या कामाची गती वाढवा : उपसरपंच मोतीराम घरजाळे



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
गांगणेर (हिवरा) ते खंडाळा (गांगनेर) दरम्यान रेल्वे उड्डाणपुलाचे काम मागील दोन वर्षांपूर्वीपासून अत्यंत कासव गतीने सुरू असून, रेल्वे पट्याची संख्या दोन वरून तीन झाल्याने वारंवार रेल्वे गाड्यांचे आवागमन सुरू राहत असल्याने रेल्वे फाटक वारंवार बंद राहत असते त्यामुळे या दोन्ही गावातील व परिसरातील आवागमन करणारे दुचाकी धारक, चारचाकी धारक वाहन चालकासह शेतकरी वर्ग अत्यंत त्रस्त आहे. त्यामुळे दोन महिन्यापूर्वीपासून बंद असलेल्या रेल्वे ओव्हर ब्रिज च्या कामाला सुरुवात करून कामाची गती वाढवून काम लवकरात लवकर पूर्ण करावे अशी मागणी गट ग्रामपंचायत गांगनेर (हिवरा) चे उपसरपंच मोतीराम घरजाळे यांनी केली आहे.

# मरणातही सरणातूनी का त्रास होतो हा मला...!

### मृत्यूही महागला! सालेकसा येथे सरकारी जळाऊ लाकडाची तीव्र टंचाई, अंत्यसंस्कारासाठी लाकूड मिळत नसल्याने गरीब व गरजू कुटुंबांची मोठी अडचण, लाकूड पुरवठा तातडीने सुरू करण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा- राजु फुंडे**
सालेकसा वनपरिक्षेत्र कार्यालय (प्रादेशिक) यांच्या माध्यमातून शहर व परिसरातील नागरिकांना अंत्यसंस्कार तसेच विविध सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांसाठी शासकीय दराने उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या जळाऊ लाकडाचा पुरवठा सध्या बंद असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. विशेषतः कुटुंबातील एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर अंत्यसंस्कारासाठी लाकडाची तातडीने व्यवस्था करावी लागत असल्याने गरीब व गरजू कुटुंबांवर आर्थिक तसेच मानसिक संकट ओढवले आहे.
या गंभीर समस्येची दखल घेत नगराध्यक्ष विजय फुंडे यांनी वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांकडे तातडीने मागणी करून सालेकसा येथे शासकीय जळाऊ लाकडाचा पुरवठा पूर्ववत सुरू करण्यासाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करण्याचे आवाहन केले आहे.

**गरीब व गरजू कुटुंबांवर दुहेरी संकट**

सालेकसा वनपरिक्षेत्र कार्यालयामार्फत यापूर्वी शासकीय नियमानुसार नागरिक, गरीब व गरजू कुटुंबांना अंत्यसंस्कार तसेच सार्वजनिक कार्यक्रमांसाठी जळाऊ लाकूड उपलब्ध करून दिले जात होते. वन विभागाची ही जनहिताची सेवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी मोठा आधार ठरत होती.
मात्र, गेल्या काही दिवसांपासून सालेकसा येथील लाकूड डेपो डोंगरगाव येथील डेपोमध्ये स्थलांतरित करण्यात आल्याने सालेकसा परिसरातील जळाऊ लाकडाची उपलब्धता मोठ्या प्रमाणात प्रभावित झाली असून ही सेवा जवळपास बंद पडल्याची स्थिती आहे.

**दुःखाच्या प्रसंगी आर्थिक व मानसिक त्रास**



कुटुंबातील व्यक्तीचे निधन झाल्यानंतर अंत्यसंस्कारासाठी लाकूड तातडीने आवश्यक असते. अशा वेळी शासकीय स्तरावर लाकूड उपलब्ध नसल्यास नातेवाईकांना खासगी बाजारातून महागड्या दराने लाकूड खरेदी करावे लागते किंवा लाकडाची व्यवस्था करण्यासाठी इकडे-तिकडे भटकावे लागते. त्यामुळे दुःखाच्या प्रसंगात असलेल्या कुटुंबावर अतिरिक्त आर्थिक व मानसिक ताण निर्माण होतो.
सालेकसा तसेच आमगाव खुर्द परिसरात झपाट्याने शहरीकरण होत असल्याने अनेक नागरिकांकडे पूर्वीप्रमाणे जळाऊ लाकडाचा साठा उपलब्ध नसतो. त्यामुळे अचानक मृत्यू झाल्यास अंत्यसंस्कारासाठी शासकीय स्तरावर पुरेसा लाकूडसाठा उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक आहे.

**अंत्यसंस्कारासाठी लाकूड न मिळणे ही अत्यंत वेदनादायक बाब**

नगर पंचायत सालेकसाचे गटनेते संदीप डेकाटे म्हणाले, अंत्यसंस्कारासाठी लाकूड उपलब्ध न होणे ही नागरिकांसाठी अत्यंत कष्टदायक परिस्थिती आहे. वन विभागाने या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने प्रशासकीय कार्यवाही करावी आणि सालेकसा येथे जळाऊ लाकडाचा पुरेसा साठा उपलब्ध करून द्यावा. ही जनहिताची सेवा पुन्हा सुरू झाल्यास नागरिकांना मोठा दिलासा मिळेल आणि वन विभागाबद्दल जनतेचा विश्वासही अधिक दृढ होईल.

**दुःखाच्या प्रसंगी नागरिकांना लाकडासाठी भटकंती नको**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट)चे शहराध्यक्ष ब्रिजभूषण बैस म्हणाले, सालेकसा व आमगाव खुर्द परिसरात हळूहळू शहरीकरण होत आहे. त्यामुळे नागरिकांकडे जळाऊ लाकडाचा पुरेसा साठा उपलब्ध राहत नाही. अशा परिस्थितीत एखाद्या कुटुंबात अचानक मृत्यू झाल्यास अंत्यसंस्कारासाठी लाकडाची तातडीने आवश्यकता भासते. त्यामुळे शासकीय डेपोमध्ये पुरेसा लाकूडसाठा असणे गरजेचे आहे. दुःखाच्या प्रसंगी नातेवाईकांना लाकडासाठी भटकंती करावी लागू नये, यासाठी वन विभाग व स्थानिक नगर पंचायत प्रशासनाने तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात.

**सालेकसात नियमित लाकूड उपलब्ध करून देण्याची नागरिकांची मागणी**

सालेकसा परिसरातील नागरिकांनी वन विभागाच्या माध्यमातून जळाऊ लाकडाची नियमित व पुरेशा प्रमाणात उपलब्धता सुनिश्चित करावी, अशी मागणी केली आहे. अंत्यसंस्कारासारख्या संवेदनशील प्रसंगी कोणत्याही कुटुंबाला लाकडासाठी दर-दर भटकण्याची वेळ येऊ नये, यासाठी सालेकसा येथे पुन्हा शासकीय लाकूड डेपोची सुविधा प्रभावीपणे सुरू करण्याची गरज व्यक्त होत आहे. दुःखाच्या प्रसंगी आधार देणारी शासकीय सुविधा बंद पडू नये, तर ती अधिक सक्षमपणे नागरिकांच्या सेवेत उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा सालेकसा परिसरातील नागरिकांकडून व्यक्त होत आहे.